रविवार, 04 सप्टेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 37
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 04 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-37 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-16 ● PRICE-5



## सोनपावलांनी गौरींचे आगमन; घरोघरी वाजत-गाजत स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** विघ्नहर्ता गणरायाचे धूमधडाक्यात आगमन झाल्यानंतर सर्वत्र आनंदोत्सवास प्रारंभ झाला असून, या आनंदात आणखी वाढ करणाऱ्या गौरींचेही शनिवारी (दि.३) रोजी घरोघरी सोनपावलांनी आगमन झाले. गौरी आणताना 'गौरी कशाच्या पाऊली आली, सोन्या-मोत्याच्या पाऊली आली', असे म्हणत गौराईला वाजत-गाजत उत्साहाच्या वातावरणात घरी स्थापना झाली.

यासाठी महिला गेल्या काही दिवसांपासून विविध कामात मग्न होत्या. त्यामुळे शनिवारी महिला सकाळपासूनच गौरींच्या स्वागतासाठी आतूर झाल्या होत्या. गौराईचे पारंपरिक पद्धतीने आणि सोनपावलांनी आगमन झाल्यानंतर गौरीला सजविण्यासाठी, तिला साजशृंगार करण्यासाठी महिलांनी विशेष परिश्रम घेत आहेत. त्यामुळेच गौरींचे आगमन हा महिलांमध्ये उत्साह व चैतन्य निर्माण करणारा दिवस ठरला. गेल्या चार-पाच दिवसांपासून घराघरांमध्ये मिष्टान्न तयार करण्याची लगबगही सुरू होती. घराघरांत गौरींची उत्साहात पूजा करण्यात येत आहे. या गौरींना बाजूबंद, लक्ष्मीहार, सुवर्णजडीत कंबरपट्टे, बोरमाळ, हार तसेच सोन्याचे विविध प्रकारचे दागिने घालून सजवण्यात आले. दुसऱ्या दिवशी रविवारी (दि.४) गौरींचे पूजन करण्यात येणार आहे. यावेळी काही घरा घरांत पुरणाच्या पोळीच्या नैवेद्यासोबत जेवणाचा बेत असून, वेगवेगळ्या कुटुंबांतील परंपरेनुसार गोड, तिखटाचा नैवेद्य गौराईला दाखवण्यात येतो.

### महत्त्वाची बातमी

## काँग्रेस भारतातून नष्ट होतेय अन् जगातून कम्युनिस्ट; अमित शहा



आधुनिक केसरी न्यूज

**थिरुवअनंतपुरम :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेस आणि कम्युनिस्ट पार्टीवर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी कधीही गरिबांसाठी काम केले नाही. तसेच काँग्रेस भारतातून संपतेय, अशा शब्दांत शहा यांनी म्हटले आहे.

केरळमधील थिरुवअनंतपुरम इथे भाजपच्या अनुसुचित जाती-जमाती परिषदेत शहा बोलत होते. यावेळी त्यांनी भाजपनं SC-ST समाजासाठी केलेल्या कामांची माहिती दिली. तसेच काँग्रेस आणि कम्युनिस्ट पार्टीवर टीका करताना त्यांनी केवळ या समाजांचा व्होट बँक म्हणूनच वापर केल्याचा आरोप केला. शहा म्हणाले, देशातून काँग्रेस संपत चालली आहे. तर जग कम्युनिस्ट पार्टीपासून मुक्त होत आहे. जर केरळला भविष्य असेल तर ते केवळ भाजपसोबतच आहे. काँग्रेस आणि कम्युनिस्ट पार्टीने कधीही अनुसुचित जमाती आणि गरीबांसाठी काम केले नाही, त्यांनी यांना केवळ व्होट बँक असेच समजले.

# भारतीय अर्थव्यवस्था जगात भारी

## ब्रिटनला मागे टाकत बनली जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : भारताची अर्थव्यवस्था जगभरात वेगाने वाढत आहे. २०१४ पासून केलेल्या संरचनात्मक बदलांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेने आता युनायटेड किंग्डमला (ब्रिटन) मागे टाकले आणि जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे. या बदलांमुळे सध्याच्या विकास दरानुसार भारत २०२७ मध्ये जर्मनी आणि २०२९ पर्यंत जपानपेक्षा मोठी अर्थव्यवस्था बनेल. भारतीय स्टेट बँकेने जारी केलेल्या संशोधन अहवालात मोठे अंदाज बांधण्यात आले आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावाचा सामना केल्यानंतर भारताच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा दिसून येत आहे. २०१४ पासून भारतीय अर्थव्यवस्थेने ७ स्थानांची झेप घेतली. २०१४ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था क्रमवारीत १० व्या स्थानावर होती.**

भारतीय स्टेट बँकेच्या आर्थिक संशोधन विभागाने अहवाल दिला की डिसेंबर २०२१ मध्ये ब्रिटनला मागे टाकून भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे. तर २०२९ पर्यंत ही जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असेल.

या काळात भारतीय अर्थव्यवस्था सात स्थानांनी वाढली असून २०१४ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था क्रमवारीत १० व्या स्थानावर होती. एसबीआयचे समूह मुख्य आर्थिक सल्लागार सौम्या कांती घोष म्हणाले की, सध्याच्या वाढीच्या दरानुसार भारताने २०२७ मध्ये जर्मनीला आणि २०२९ मध्ये जपानला मागे टाकले पाहिजे. ही एक मोठी उपलब्धी असेल.

**भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढेल**

२०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर १३.५ टक्के असल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे. या



आर्थिक वर्षात प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. तसेच २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी भारताचा जीडीपी वाढीचा दर सध्याच्या ६.७ टक्क्यांवरून ७.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

याशिवाय जगातील अनिश्चिततेच्या दरम्यान ६ टक्के ते ६.५ टक्के वाढ भारतासाठी 'नवीन सामान्य' असेल, असे अहवालात म्हटले आहे.

### भारताने ब्रिटनला मागे टाकले

दुसरीकडे, ब्लूमबर्गच्या अहवालात ब्रिटनला मागे टाकून भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनली आहे. यासह ब्रिटनची सहाव्या स्थानावर घसरण झाली आहे. एका दशकापूर्वी भारत सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये ११ व्या क्रमांकावर होता, तर ब्रिटन पाचव्या क्रमांकावर होता. पण कोरोना संसर्गाने चित्र पूर्णच बदलले आणि भारताची अर्थव्यवस्था हळूहळू विकसित होत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचा वाटा ३.५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे, जो २०२७ पर्यंत ४ टक्क्यांपर्यंत जाऊ शकतो. २०१४ मध्ये ते २.६ टक्के होते. सध्या जागतिक अर्थव्यवस्थेत जर्मनीचा वाटा ४० टक्के आहे.

### चर्चेतली बातमी

## प्रश्न विचारल्याने भाजप आमदार भडकले



आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू :** कर्नाटकमध्ये भाजप आमदाराचे एका महिलेसोबत गैरवर्तन समोर आले आहे. आमदार अरविंद लिंबवली यांनी महिलेला अश्लील शिवीगाळ करत गैरवर्तन केले. दरम्यान, मुसळधार पावसानंतर बंगळुरूच्या वरथूरमध्ये पीडित महिलेने आमदाराला तक्रार पत्र देण्याचा आणि काही समस्यांबद्दल बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भाजप आमदार अरविंद लिंबवली संतप्त झाले. भाजप आमदार अरविंद लिंबावली यांचा एका महिलेसोबत गैरवर्तन केल्याचा व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ते महिलेला शिवीगाळ करत तिच्याकडून कागद फाडताना दिसत आहेत. महादेवपुरा येथील भाजप आमदारापर्यंत काहीतरी सांगण्यासाठी ही महिला पोहोचली होती. मात्र अरविंद लिंबावली तिच्यावर चिडले. त्या महिलेच्या हातात एक कागद होता आणि तो आमदाराला दाखवण्याचा प्रयत्न करत होती, मात्र आमदाराने तो हिसकावून फाडला. यानंतर त्यांनी पोलिसांना महिलेला ताब्यात घेण्याचे आदेश दिले.

## पैसे भाजपचे काम 'आप' चे; मोदींच्या गुजरातममध्ये केजरीवालांचा कानमंत्र

आधुनिक केसरी न्यूज

**सुरत :** गुजरातमध्ये आगामी काळात होणाऱ्या विधानसभेसाठी केजरीवालाच्या पक्षाने कंबर कसल्याचे दिसून येत आहे. गुजरातमधील विजयासाठी आम आदमी पक्षाने आपली सर्व ताकद पणाला लावली असून, विजयी मोहोर उमटवण्यासाठी केजरीवालांनी गुजरातला अनेक दौरे केले आहे. मात्र, आजच्या गुजरात दौऱ्यामध्ये त्यांनी दिलेल्या कानमंत्राची जोरदार चर्चा सुरू असून, तुम्ही भाजप सोडू नका, भाजप तुम्हाला पैसे देते ते घ्या मात्र, काम आपचे करा असा कानमंत्री केजरीवाल यांनी मोदींच्या गुजरातमध्ये दिला आहे.

आमच्या पक्षाला भाजपचे मोठ मोठे नेते नको तर, त्यांच्या पन्नाप्रमुखांची आणि कार्यकर्त्यांची गरज असून, भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने आम आदमी पार्टीमध्ये सामील होत असल्याचा दावादेखील केजरीवाल यांनी केला आहे. यावेळी मी कृतघ्न नाही. तुमच्या सर्व मागण्या मी महिनाभरात पूर्ण करेले अशी ग्वाही उपस्थितांना संबोधित करताना दिली. भाजपला त्यांचा पराभव दिसून येत असल्यानेच आमच्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांवर हल्ले केले जात आहे. मात्र, आम्ही



घाबरणाऱ्यांमधले नाही.

**सुरतमध्ये 12 पैकी 7 जागा 'आप' जिंकेल**

केजरीवाल म्हणाले, पक्षातर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात आमचा पक्ष सुरतमध्ये 12 पैकी 7 जागा जिंकेल असे स्पष्ट चित्र आहे. वेळ कमी आहे, त्यामुळे सर्वांनी आपापल्या स्तरावर प्रचार करावा असे आवाहनही केजरीवाल यांनी जनतेला केले आहे. 27 वर्षे भाजपने कर्मचाऱ्यांसाठी काहीही केलेले नसून निवडणुकीच्या तीन महिने आधी त्यांना पुन्हा लॉलीपॉप देतील अशी टीकाही त्यांनी केली.

## आता वाहतूक पोलिसांवरच होणार कारवाई

### ई-चलान मशिन ऐवजी खासगी मोबाईल वापरल्यास दंड

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील सर्व वाहन चालकांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. वाहतुकीच्या नियमांचा भंग झाल्यास तुमच्यावर कारवाई करणाऱ्या पोलिसांनाच आता वाहतूक पोलीस प्रोटोकॉलचा भंग केल्यास कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. राज्याचे अपर पोलीस महासंचालक कुलवंत के. सारंगाल यांनी या संबंधित परिपत्रक जारी केले असून वाहनचालकांवर कारवाई करताना पोलिसांनी खासगी वाहन वा त्यांच्या खासगी मोबाईल न वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. असे न झाल्यास वाहतूक पोलिसांनाच दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

वाहन चालकांना दंडात्मक कारवाई करताना फोटो काढण्यासाठी स्वतःच्या खाजगी मोबाईलचा वापर करू नये. जर कोणी खाजगी मोबाईलचा वापर केला तर कारवाई होणार. काही अधिकारी आणि अंमलदार ई-चलान मशिनद्वारे कारवाई ना करता आपल्या खासगी मोबाइलवर फोटो काढतात अशा स्वरुपाच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी फक्त चलान मशिनद्वारेच फोटो काढणे अपेक्षित आहे. असे न झाल्यास संबंधित पोलिसांवर कारवाई होणार. वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करताना स्वतःच्या



खाजगी मोबाईलवर वाहनाचा फोटो वा चित्रीकरण करून काही कालावधी नंतर ई चलान मशिनमध्ये फोटो अपलोड करतात. तसंच गाडीचे संपूर्ण फोटो न टाकता फक्त नंबर प्लेटचे फोटो टाकतात. त्यामुळे गाड़ी कोणता आहे ओळखणे अशक्य होते.

पोलीस अधिकारी अंमलदार यांचेकडील ई चलान मशिनबाबत काही समस्या, अडचणी असल्यास तशी तक्रार द्यावी अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

# उगवतीचे रंग





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## गणेशोत्सवाच्या निमित्ताने...

आधुनिक केसरी

त्याशिवाय निष्कर्षाला पोहचू नका. विशाल उदार सांगते की जीवनातील सुखदुःख आपल्या उदरात सामावून घ्या. मोठी सोंड म्हणजे एखाद्या व्यक्तीची वा गोष्टीची चांगले किंवा वाईट दुरूनच ओळखण्याची क्षमता दर्शवते. तसेच संकटांना घाबरू नका. धैर्याने सामोरे जा हे ही ती सांगते.

गणपतीच्या पायामध्ये पैंजण आहेत. कमरेला मेखला आहे. गणपती ही कलेची देवता आहे. तो चौदा विद्या आणि चौसष्ट कलांची देवता आहे. तो संगीतात निपुण आहे. संगीतामध्ये गायन, वादन आणि नृत्य यांचा समावेश होतो. या तीनही कलांमध्ये तो प्रवीण आहे. म्हणून कोणत्याही कलाप्रकारांचे सादरीकरण करताना श्रीगणेशाला आधी वंदन केले जाते. नाटक, सिनेमा आणि निरनिराळ्या लोककला यांचे सादरीकरण करताना आधी श्री गणेशाचे स्मरण केले जाते.



श्रीगणेशाचे वाहन उंदीर आहे. हेही आपल्याला थोडे विचित्र वाटते. पण ते सुद्धा मानवी मनाचे प्रतिक आहे. उंदीर हा प्राणी अत्यंत हुशार, चपळ आणि चंचल असतो. तो एका ठिकाणी कधीच थांबत नाही. मानवी मनही तसेच चंचल आहे. ते सतत इकडून तिकडे धावत असते. गणपती उंदरावर स्वार झाला आहे म्हणजे मानवी मनावर त्याने नियंत्रण मिळवले आहे असा त्याचा प्रतिकात्मक अर्थ घ्यायला हरकत नाही.

मुळात गणेशोत्सवच प्रतिकात्मक आहे. या साऱ्या प्रतिकांचा अर्थ समजावून घेऊन आपण तो साजरा करायला हवा. पण आज गणेश उत्सव अनेक अर्थांनी त्याच्या मूळ उद्देशापासून दूर गेला आहे. एखाद्या मोठ्या शहराच्या चौकात उभे राहिले तर चारी बाजूला हाकेच्या अंतरावर चार चार गणेश मंडळे आपल्याला दिसतात.

(क्रमशः)

# आनंदी पहाट



## आनंद म्हणजे आपल्या अंतर्मनाची स्थिती

आधुनिक केसरी

आनंद ही आंतरिक भावना आहे. आनंद ही एखाद्या व्यक्तीची अभिव्यक्ती असते. आनंद हा अनेकदा आपल्याला कष्ट सहन करायला लावून आपली परीक्षा घेत असतो. त्यानंतर आपल्याला तो अर्थ आणि उद्देशाशी जोडतो. आपल्याला अनेकदा आनंदाचा पाठलाग करायला लागतो, पण खरे तर आनंद आपल्या अंतरंगातच दडलेला असतो. मूलतः खरे प्रेम आनंद देत असते, ते प्रेम आपल्या प्रियजनांवरील, आप्तेष्टांवरील, मित्रपरिवारावरील, आपण करत असलेल्या कामावरील, आपल्या स्वतःवरील असू शकते. त्यासाठी आपले अटल, अतूट आणि अतुलनीय प्रेम असणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

खरा आनंद म्हणजे आपल्या अंतर्मनाची स्थिती, जी सतत स्वतःवर प्रेम करण्याने देखील निर्माण होऊ शकते. खरोखर आनंदी राहण्यासाठी आपल्याला इतर लोकांची किंवा भौतिक गोष्टींची गरज नसते. काही व्यक्तींचे विचार नकारात्मक घटनांपेक्षा सकारात्मक घटनांना अधिक प्रतिसाद देतात. परिणामी, काही व्यक्ती नेहमी फक्त आनंदीच असू शकतात. आनंदामुळेच शांती प्राप्त होत असते. त्यासाठी आपले प्रेम शुद्ध असले पाहिजे कारण आपल्या प्रेमातील शुद्धता हीच सुख आणि शांतीची जननी असते.

आयुष्यात जगण्याच्या पलीकडचे जीवन जगणे जमले कि, आनंदाला उधाण येऊ लागते. ते कसे जगायचे ह्याचे सूत्र शिकून घ्यावे लागते. आपल्या जन्मापासून सुरु होणाऱ्या प्रवासांत आपली जीवनाची सुरुवात आपल्या रडण्यापासून होत असते. आपल्या आयुष्याचा शेवट मात्र इतरांच्या रडण्याने होत असतो. ह्या जन्मापासून मरणापर्यंतचा प्रवास आनंदाने, धीराने, धडाडीने, कौशल्याने, जिद्दीने, धडपडीने, धावपळीने, सुखाने, समाधानाने आणि आंतरिक शांतीने व्हावा लागत असतो. त्यासाठी आपल्या जीवनाचा अर्थ समजून घेण्याची आपल्याला जाणीव व्हावी लागत असते.

# संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-37

## आत्मविश्वास देऊ या...

आधुनिक केसरी

कितीही मोठी संकटे आली तरी न डगमगता त्या संकटाला तोंड द्या व त्यामध्ये यशस्वी होणे म्हणजे आपला आत्मविश्वास वाढला आहे असे समजा. भगवद्गगीतेत त्यालाच कर्मयोग असे म्हणतात .आणि खरा कर्मयोगी हा कधीही आत्महत्या करत नाही. शेतकरी आत्महत्या, सासूरवासाला कंटाळून आत्महत्या, रागाच्या भरात आत्महत्या, नापास होण्याच्या भीतीने आत्महत्या, कर्जाला कंटाळून आत्महत्या, भांडणातून आत्महत्या,, काय आहे हे ? इतका स्वस्त आहे का आपला आत्मा, आपले जीवन. त्याची तुम्ही इतक्या सहज हत्या करता? आत्महत्या करण्यास ही कारणे पुरेशी नाहीतच. "महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती" लव्हाळे यासारखे चिवट असावे आपण. झऱ्याच्या रस्त्यात चढ-उतार आहेत म्हणून तो थांबत नाही. तर मंजुळ स्वर गात पुढे जातो. मग आपण तर बुद्धिवान माणसे आहोत. कुठल्याही समस्येवर सहज तोडगा काढून समस्या सोडवू शकतो. आई-वडिलांनी आधी प्रत्येक गोष्टीत स्वतः त आत्मविश्वास निर्माण करा .आणि मग आपल्या मुलांमध्ये निर्माण करा. अतिआत्मविश्वास पण नको .अति आत्मविश्वासाने कधी कधी काहीच होत नाही. झोळी रिती राहते. आत्मविश्वास असा निर्माण करावा की मुलं, माणसं कधी आत्महत्या करणारच नाही. आयुष्याकडे ते आनंदाने पाहतील. मानव जन्म खूप दुर्लभ आहे. सुदैवाने तो आपल्याला मिळाला आहे. त्याचा सदुपयोग करू या .असा आत्मविश्वास आपल्या मुलांमध्ये निर्माण करावा. त्यासाठी जगातील रुग्णालय, रस्त्यावर राहणारी लोक, काळ्या उन्हात दगड फोडणारे ,ओझी उचलणारे लोक ,मंदिर या ठिकाणी मुलांसह आपण भेटी द्याव्यात. म्हणजे जीवन जगण्याचा खरा अर्थ या लोकांकडून कळतो .आपण किती सुखी आहे व संकटावर कशी मात करू शकतो असा आत्मविश्वास मुलांमध्ये निर्माण करू या...

## गणपती आणि संगीत या नात्याबद्दल रोचक माहिती

आधुनिक केसरी

हिन्दू धर्माचं नृत्य, कला, योग आणि संगीत यासह खोल नातं आहे. हिन्दू धर्माप्रमाणे ध्वनी आणि शुद्ध प्रकाश याने ब्रह्मांडाची रचना झाली आहे. भारतात संगीताची परंपरा अनादी काळापासून आहे.

जवळपास हिंदूंच्या सर्वच देवी-देवतांचे आपले स्वतंत्र वाद्य यंत्र आहे. विष्णूंकडे शंख तर शिव यांच्याकडे डमरु आहे. नारद मुनी आणि सरस्वती यांच्याजवळ वीणा आहे तर भगवान श्रीकृष्णांकडे बासरी. देवर्षी नारद यांच्या हातात सदैव एकतारा असतो. खजुराहो असो वा कोणार्क येथील मंदिर, प्राचीन मंदिरांच्या भिंतीवर गंधर्वांच्या मूर्तींचा समावेश आहे आणि त्यांच्याकडे सर्व प्रकाराचे वाद्य यंत्र असल्याचे दर्शवले गेले आहे.

सामवेद त्या वैदिक स्तोत्रांचा संग्रह आहे जे गीतमय आहे. संगीताचे सर्वप्रथम ग्रंथ चार वेदांपैकी एक सामवेद आहे. याच आधारावर भरत मुनी यांनी नाट्यशास्त्र लिहिले आणि नंतर संगीत रत्नाकर, अभिनव राग मंजरी लिहिले गेले. जगभरातील संगीताच्या ग्रंथांचे सामवेद हे प्रेरणा आहे.

गणपतीचे वाद्ययंत्र ढोल : गणपतीची मूर्ती आणि त्यांच्या चित्रांमध्ये वीणा, सितार आणि ढोल वाजवताना दर्शवले जाते. कुठे-कुठे त्यांना बासरी वाजवताना देखील दाखवतात. तसे तर गणपती संगती प्रेमी आहे. तरी बहुधा त्यांना ढोल आणि मृदंग वाजवताना चित्रित केले जाते. ढोल सागर ग्रंथानुसार ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांनी ढोलची निर्मिती केली होती. विष्णूंनी तांबा धातू गळ्याला लावला आणि ब्रह्मा यांनी त्या ढोलमध्ये ब्रह्म कनौटी लावली आणि ढोलच्या दोन्ही बाजूला सूर्य आणि चंद्र या रुपात कातडे लावले. जेव्हा ढोल तयार झाला तेव्हा भगवान शंकरांनी आनंदी होऊन नृत्य केले तेव्हा त्यांच्या घामातून एक कन्या 'औजी' ची निर्मिती झाली तिला ढोल वाजवण्याची जवाबदारी देण्यात आली. म्हणतात की औजीने ढोल आलटून पालटून चार शब्द-वेद, बेताल, बाहु आणि बाईल यांचे निर्माण केले होते.

## साधनात पूर्ण भाव व तळमळ पाहिजे



आधुनिक केसरी

आपल्या स्वभावानुसार प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने भगवंताची ओळख करून घेता येईल. मारूतीने दास्यत्वाने भक्ती केली. दशरथाने पुत्राप्रमाणे देवाला मानले. भगवंत माझा कसा होईल याचा आपण विचार करावा. भगवंताच्या प्राप्तीसाठी भक्ती हे सर्वात श्रेष्ठ साधन सांगितले आहे. मनुष्य जे जे प्रेम व्यसनात लावतो ते प्रेम भगवंताकडे लावले तर सर्व काम होते. हट्टी आणि व्यसनी माणसे एक प्रकारे चांगली. त्यांचे मन त्यांना सांगत असते की व्यसनापायी आपल्या मुला-बाळांचेही नुकसान होते आहे. पण आपले व्यसन ते हट्टाने सोडीत नाहीत. हाच हट्ट किंवा निश्चय भगवंताकडे लावला की परमार्थ झाला ! माझे गुणदोष मी देवाला वाहिले की अर्पणभक्ती होते. आपण देवाची भक्ती करतो. परंतु त्या भक्तीत खरे प्रेम येत नाही; याचे कारण म्हणजे आपली दृष्टी चारी दिशांना फाकलेली असते. ती प्रथम एकाग्र करावी. थोडे करावे, पण एकाकार होऊन करावे.

परमार्थ कंटाळवाणेप्रमाणे करू नये. आपल्या भावनेला व्यक्त व्हायला योग्य दिशा कशी मिळेल इकडे लक्ष द्यावे. परमात्मा पंढरपुरात आहे असे साधुसंत म्हणत आले, परंतु आपल्याला तो दगडच दिसतो, हा दोष कुणाचा ? आपल्या भावनेचाच. जशी भावना ठेवू तशी कृती होते. भगवंताजवळ आपला पूर्ण भाव ठेवावा. दिवा थोडा बाजूला झाला की वाट चुकते; म्हणून सतत भगवंताकडे नजर ठेवून वागावे. साधनावर सतत जोर द्यावा. तालासुरावाचून प्रेम येत नाही असे थोडेच आहे ? मी ज्याच्यापुढे भजन म्हणतो, तो ते ऐकतो या समजुतीने म्हटले म्हणजे झाले. भगवंताचाच मी आहे असे म्हणवून घ्यावे, त्याची कृपा केव्हा होईल ही तळमळ बाळगावी, आणि मी जे करतो ते मनापासून करतो की नाही हे पाहावे. झाल्यागेल्याचे दुःख करू नका, उद्याची काळजी करू नका, आणि आजचे अनुसंधान चुकवू नका. भगवंत साक्षात पुढे उभा आहे असे समजून नामस्मरण करावे. प्रत्येक नामात 'भगवंत कर्ता' असे म्हणावे, म्हणजे अभिमान वाट अडवणार नाही. लाभहानीचे सुखदुःख न वाटणे ही खरी भक्तीची प्रगती होय. देहाच्या कर्तुत्वाच्या मर्यादा सांभाळून, विषयातली वृत्ती भगवंताकडे लावणे, हेच खरे सीमोल्लंघन होय. जो अत्यंत आकुंचित आणि स्वार्थी आहे, तसेच जो 'माझ्या सुखाकरीता सर्व जग आहे' ही बुद्धी ठेवतो, तो मनुष्य अभिमानी समजावा. मनुष्य जितका स्वार्थी, तितका तो पराधीन असतो. पाचजणापासून सुख मिळवण्याचा मार्ग म्हणजे प्रपंच, आणि एकापासून सुख मिळवण्याचा मार्ग म्हणजे परमार्थ होय.

बोधवचन : 'भगवंत आहे' या भावनेपासून साधकाने सुरूवात करावी , आणि 'भगवंत आहेच' या भावनेमध्ये समाप्ती करावी .

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# अष्टविनायक दर्शन यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

अष्टविनायक शब्द च आपल्याला सांगतो की आठ विनायक (गणपती). अशा या आठ गणपती च्या मंदिरांना मिळून अष्टविनायक म्हंटले जाते. गणपतीची ही आठ मंदिरे अतिशय निसर्गरम्य अशा ठिकाणी वसलेली असून, ही मंदिरे पुण्याच्या आस-पास च्या परिसरा मध्ये आहेत. आजकालच्या या धका धकीच्या युगात आपण अष्टविनायक गणपती दर्शन केलेत तर मनाला अगदी प्रसन्न आणि शांत वाटते.

असे म्हणतात की अष्टविनायक गणपती दर्शन यात्रा ही खाली दिलेल्या क्रमाने व शास्त्रोक्त पद्धतीने केल्यासच ती सफल होते. अष्टविनायक दर्शन यात्रेची सुरवात ही मोरगाव च्या मोरेश्वर गणपती पासून करावी व 8 गणपतींचे दर्शन झाल्या नंतर पुन्हा मोरगाव च्या गणपतीचे दर्शन घ्यावे लागते. प्रवास सुरू झाल्यानंतर संपूर्ण अष्टविनायक यात्रा संपन्न होई पर्यंत परत घरी येऊ नये किंवा पाहुण्यांकडे अथवा मित्र / मैत्रिणीं कडे देखील जाऊ नये.

**१) मोरगाव चा मयुरेश्वर गणपती**

तुम्ही पुणे किंवा मुंबई तून अष्टविनायक यात्रा आरंभ करत असाल तर मोरगाव ल येण्यासाठी तुम्हाला पुण्यातून पुणे – हडपसर – सासवड – जेजूरी मार्गे मोरगाव ला जावे लागेल. हडपसर मधून आतमध्ये सासवडच्या दिशेने गेल्यावर रस्ता थोडा खराब आहे. पुण्यातून मोरगाव पर्यंतचे अंतर ६८ कि.मी. आहे. सुंदर अशा मयुरेश्वर गणपतीच्या या मंदिर प्रांगणात आकाराने मोठा आणि भव्यदिव्य असा नंदी आहे. मंदिरापासून जवळच म्हणजे २५ कि.मी. वर जेजूरी असून खंडोबाचे दर्शन देखील तुम्ही घेऊ शकता. ३ दिवसा मध्येच जर यात्रा पूर्ण करायची असेल तर जेजूरी अष्टविनायक यात्रे दरम्यान करू नये.

**२) सिद्धटेक चा सिद्धीविनायक गणपती**

मोरगाव वरुन सिद्धटेक ला जाण्या साठी चौफुल्या ला म्हणजेच पुणे – सोलापूर हायवे ला यावे लागेल. सिद्धटेक ला जाण्याचा मार्ग मोरगाव – चौफुला (पुणे सोलापूर हायवे) – पाटस – दौंड (शहर)-सिद्धटेक. हे एकूण अंतर ७० कि.मी. असून मंदीरा जवळ भीमा नदी आहे. आता मंदिरापर्यंत गाडी जाते, पूर्वी बोटीने नदी ओलांडावी लागत असे. अतिशय सुंदर असे हे मंदिर असून मंदिराची प्रदक्षिणा जवळ पास १ कि.मी. ची आहे. या मंदिरा पासून जवळच विष्णूचे देखील सुंदर असे मंदिर आहे. अतिशय नयनरम्य असे हे ठिकाण असून सिद्धीविनायकाचे दर्शन घेतल्यावर मन प्रफुल्लित होते.

**३) पाली चा बल्लाळेश्वर गणपती**

सिद्धटेक वरून पालीच्या दिशेने निघल्यानंतर प्रवास लांब चा आहे, जवळ जवळ २५० कि.मी. चा हा प्रवास असून अंतर जारी जास्त असले तरी रस्ता चांगला आणि जवळ जवळ २०० कि.मी. अंतर हे हायवे ने आहे.मार्ग पुढील प्रमाणे सिद्धटेक – दौंड (शहर) – पाटस (पुणेसोलापूर हायवे) – पुणे – येरवडा – मुंबई हायवे – निगडी मार्गे पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे – उरसे चा टोलनाका – खालापूर टोल नाक्याच्या अलीकडूनच डाव्या बाजूला पाली कडे रोड जातो – पाली. हायवे सोडून पाली कडे जाण्यासाठी वळल्या नंतर वाटेत छान असा निसर्ग अनुभवायला मिळेल. उन्हाळ्याच्या दिवसात जर तुम्ही यात्रा करत असाल तर वाटेत करवंद खायला मिळतील. पाली मध्ये तुम्ही मुक्काम करु शकता इथे मंदिर ट्रस्ट तर्फे राहण्याची उत्तम सोय केलेली आहे. आणि कमी खर्चात रूम उपलब्ध होते.

**४) महड चा वरदविनायक गणपती**

पाली मध्ये मुक्काम केल्यानंतर महड च्या वरदविनायक गणपतीच्या दिशेने जाताना अंतर अवघे १ तासाचे आहे. सकाळी सकाळी महड च्या गणपतीचे देखील दर्शन होईल, साधे आणि सुंदर असे हे मंदिर असून वरद विनायकाचे दर्शन घेतल्यावर सुखमय वाटते.

**५) थेऊर चा चिंतामणी गणपती**

महड वरून पुन्हा पुण्याच्या दिशेने निघाल्यावर परत त्याच रस्त्याने येताना वाटेत लोणावळा लागेल, तिथे तुम्ही खरेदी वगैरे करू शकता. त्यानंतर सरळ पुण्यातून हडपसर आणि मग पुणे सोलापूर हायवे ने सरळ आल्यावर थेऊर फाट्यावरून थेऊर गाठावे. हे अंतर १२५ कि.मी. इतके असून जवळ जवळ ३ तासांचा हा रूट आहे. चिंतामणी गणपती मंदिर हे वाड्यामध्ये स्थित आहे. मंदीरा मध्ये मोठी घंटा आहे. छान असे हे मंदिर असून चिंतामणीचे दर्शन घेतल्यावर तुमच्या सर्व चिंता मिटवण्यासाठी चिंतामणीचा तुम्हाला आशीर्वाद मिळेल.

**६) लेण्याद्री चा गिरिजात्मज गणपती**

थेऊर वरुण निघाल्या नंतर लेण्याद्री कडे जाण्यासाठी या मार्गाचा अवलंब करा. थेऊर – हडपसर – येरवडा – मुंबई हायवे – कासारवाडी (नाशिक फाटा) – नारायणगाव – नारायण गावातून डाव्या बाजूला वळल्यावर थेट लेण्याद्री कडे जाणारा रोड आहे. वाटेत तुम्हाला ओझर लागेल परंतु तिथे न थांबता सरल आधी लेण्याद्री करावे. लेण्याद्री चे गिरिजात्मज गणपतीचे मंदिर हे उंच डोंगरावर लेणी स्वरुपात स्थित आहे.

**७) ओझर चा विघ्नहर गणपती**

जर तुम्ही ३ दिवसांची अष्टविनायक यात्रा करत असाल तर तुमच्या अष्टविनायक यात्रेचा हा शेवटचा दिवस असेल, सकाळी लवकर उठून तुम्ही ओझर च्या विघ्नहर गणपतीचे दर्शन घ्यावे. जर तुम्ही ओझर मध्येच मुक्काम केला असेल टर उत्तम, कारण तुम्हाला सकाळची गणपतीची आरती सापडू शकते. छान असे वाड्या सारखे वाटणारे हे मंदिर असून अतिशय नयन रम्य असा हा परिसर आहे.

**८) रांजणगाव चा महागणपती**

ओझर वरुन निघाल्यावर तुम्हाला अष्टविनायक गणपती दर्शन यात्रेतील शेवटच्या म्हणजेच रांजणगाव च्या महागणपतीच्या दिशेने जायचे आहे. मार्ग पुढील प्रमाणे, ओझर – नारायणगाव – राजगुरूनगर – पाबळ – शिक्रापूर – रांजणगाव. हे आंतर जवळ जवळ १०० किलोमीटर चे असून अडीच ते तीन तासांचा रूट आहे. महागणपतीचे मंदिर हे हायवे ला लागूनच आहे इथे तुम्ही दुपारचे जेवण देखील करू शकता. मंदिर परिसर छान आणि स्वच्छ आहे.

# डिजिटल माध्यमातून बातम्या तातडीने वाचकांपर्यंत पोहोचतात : संजय पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डिजिटल माध्यमाने गेल्या दोन दशकांत अभूतपूर्व प्रगती केली आहे. डिजिटल माध्यमातून बातम्या तातडीने वाचकांपर्यंत पोहोचतात. परिणामी वाचकांचाही ओढा डिजिटल माध्यमांकडे वाढतो आहे. वाचकांना एका क्लिकवर तात्काळ बातम्या मिळत असल्याने वृत्तपत्र संकेतस्तळांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे. वाचकांची वाढती पसंती, पेजव्ह्यूज आणि प्रतिस्पर्ध्यांपेक्षा वेगवान राहण्याच्या स्पर्धेतून वृत्तपत्र संकेतस्थळाच्या कामात गेल्या काही वर्षात आमूलाग्र बदल झाले असल्याचे मत छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे जनसंपर्क अधिकारी संजय पाटील यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात शुक्रवारी त्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. या वेळी त्यांनी पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली.



पुढे बोलताना संजय पाटील म्हणाले की, डिजिटल माध्यमात पत्रकारिता करताना केवळ बातमीचे ज्ञान असून पुरेसे नाही. इंटनेटच्या महाजालात दर सेकंदाला माहितीची भर पडत असते. त्यात आपली बातमी वाचकाला प्राधान्याने दिसावी यासाठी बातमीवर करावे लागणारे तांत्रिक संस्कार किती महत्त्वाचे आहेत, याकडे लक्ष दिले पाहिजे. वृत्तपत्र आणि टेलिव्हिजन पत्रकारितेचा एक साचा निश्चित झालेला असून त्यानुसारच दैनंदिन पातळीवर काम केले जाते. मात्र वृत्तपत्राच्या संकेतस्थळाचे काम म्हणजे कॉपी-पेस्ट असा ढोबळ समज आजही अनेकांचा असून तो चुकीचा आहे. तातडीने बातमी वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे आव्हान, व्हिडीओची वाढती मागणी, वाचक पसंतीनुसार बातमीचे सादरीकरण आणि सोशल मीडियातील कल्पक मांडणी, यांचा विचार करून पत्रकाराला संकेतस्थळासाठी काम करावे लागते. वृत्तपत्र आणि त्याचे संकेतस्थळ यांच्यातील समन्वयाच्या अभावाकडेही लक्ष वेधले आहे, असे शेवटी ते म्हणाले.

यावेळी राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, उपाध्यक्ष छब्बुराव ताके, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, सतिश पाटील, अनिल कुलथे आदींची उपस्थिती होती.




# तापी नदीच्या काठावरील गावांच्या पुनर्वसनाचा निर्णय घ्या

## आमदार जयकुमार रावल यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत चर्चेतून मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तापी काठावरील गावांचे पूनर्वसन करण्याचे आदेश असतांना अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे ते अद्याप प्रलंबित आहे. यावर तातडीने मार्ग काढून किमान ज्या गावांना जमिनी अधिग्रहीत झाल्या आहेत. त्यांना प्लॉट वाटप करण्यात यावेत अशा सुचना माजी मंत्री आमदार जयकुमार यावेळी रावल यांनी केली. जिल्हाधिकारी शर्मा यांनी दिवाळीपूर्वी प्लॉट वाटप करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे आश्वासन दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी तापी नदीच्या काठावरील जसाणे, हिसपूर, आच्छी, जुने कोडदे, नेवाडे, वरपाडे यासह १९ गावांचा पूनर्वसनाच्या स्थितीबाबत तसेच वाडी शेवाडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या वाडी तसेच देवी गावाच्या समस्यांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी माजी मंत्री आमदार जयकुमार रावल, अप्पर जिल्हाधिकारी गोंविदा दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी संजय गायकवाड, उपजिल्हाधिकारी हेमांगी पाटील, उपविभागीय अधिकारी प्रमोद भामरे, उपअधिक्षक भूमिअभिलेख तहसिलदार सुनिल सैंदाणे, अपर तहसिलदार आशा गांगुर्डे, कार्यकारी अभियंता आदीसह माजी जि.प. सदस्य कामराज निकम, भाजपाचे जिल्हाध्यक्ष नारायण पाटील, जि.प.सदस्य वीरेंद्र गिरासे, पंकज कदम, धनजंय मंगळे तापी नदीच्या काठावरील गावांचा पूनर्वसनाचा प्रश्न १९७२ पासून प्रलंबित आहे. अनेक अधिकारी बदलतात परंतू या विषयावर कुणीही रस घेवून काम करीत नसल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे. त्यासाठी प्रमुख अधिकाऱ्यांची एक वर्किंग कमिटी स्थापन करावी अशी मागणी आमदार रावल यांनी केली. देविदास पाटील, नाना गिरासे, पं.स.सदस्य रणजित गिरासे उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी शर्मा, आमदार रावल यांनी तापी काठावरील कोणत्या गावांना जमिनीचे संपादन होवून प्लॉट वाटप होण्याच्या स्थितीत आले आहेत. कोणती गांवे आहे त्याचा ठिकाणी राहण्यास इच्छुक आहेत याची माहिती घेतली. जिल्हाधिकारी शर्मा यांनी याच विषयांवर पून्हा एकदा बैठक होवून अंतिम निर्णय घेतला जाईल असेही बैठकीत सांगितले.

# गवळीचा नाला परिसरात अपेरिक्षा-दुचाकीचा अपघात; तीन जण गंभीर

आधुनिक केसरी न्यूज



**देव्हारी :** सोयगावपासुन अवघ्या तीन कि.मी.अंतरावर गवळणीचा नाला म्हणून प्रख्यात असलेल्या लघु तलाव परिसरात वळनावर शनिवारी (ता.३) अपेरिक्षा क्र. एम.एच.१९ एक.ई.९९०४ व मोटारसायकल एम.एच.२० डी.एल.९३७८ घडकल्याने यात दोन तरुणांना गंभीर मार लागला असून सोयगाव ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी जळगाव सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, शनिवारी सकाळी अपेरिक्षा चालक रमेश देविदास जाधव वय ३४ लिहातांडा ता.सोयगाव येथील महिला शेतमजुर घेवून जरंडी येथील प्रगत शेतकरी प्रदिप पाटील शेतीकामासाठी जात असतांनाच समोरुन जरंडीकडून मोटारसायकल स्वार एकनाथ शंकर तोरे वय २२, संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे कर्मचारी भगवान सिताराम उसरे सोयगाव कडे येत असतांना वाहनांची समोरासमोर धडक झाली. यात महाविद्यालयलयाचे भगवान उसरे, एकनाथ तोरे यांना डोक्यात, हातापायावर जबर मार लागल्याने सोयगाव ग्रा.रु.वैद्यकीय अधिकारी डॉ.शाम गायकवाड यांनी प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी जळगाव जिल्ह्या सामान्य रुग्णालयात जाण्यासाठी रेफरपत्र दिले. भगवान उसरे यास नातेवाईकांनी पुढील उपचारासाठी बुलढाणा येथे नेले असल्याची माहीत नातेवाईकांनी दिली. अपेरिक्षा चालक रमेश जाधव यासही मार लागला असुनही स्वःता पोलीस ठाण्यात हजर झाला. पुढील तपास सोयगाव पोलीस करीत आहेत.

अपघातात जखमी महिला शेतमजुर संगिता चव्हाण वय ३०, पुजा चव्हाण वय ३०, दिपाली चव्हाण वय १५, देवकीबाई राठोड वय ६०, वैजंताबाई चव्हाण वय ६०, पुष्पाबाई चव्हाण वय १८ आदी जखमीवर प्रथमोपचार करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली आरोग्य विभागाची १०८ सेवेचा पुरता बोजवारा उडाला

राज्य शासन दिवसेंदिवस सर्वसामान्यांच्या हीतासाठी सतत प्रयत्नशील असते मात्र अधिकारी या संतांच्या भुमित एहिक सुखापोटी व अभिलाषेने मानुसपण विसरत चालला आहे. सुखासाठी वाटेल ते करायला तयार आहे. त्यामुळेच समाजात अशांती, अविश्वास, संघर्ष, मानसिक ताण निर्माण होत आहे. शनिवारी अपघात झालेवर लागलीच पुणे बिव्हीसी स्थित १०८ कंट्रोल रुम मध्ये घटनास्थळावरुन अपघाताविषयी लागलीच सकाळी ८:५० पुर्वी माहीत दिली. मात्र ए इमर्जन्सी सेवा उशीर होउनही मिळत नसल्याने, माणूस पण जपण्यासाठी मदतीचा हात म्हणून नागरीकांनी मोटारसायकल च्या सहाय्याने जखमींना सोयगाव ग्रा.रु.पोहचवण्याचे धैर्य केल्याने वेळेवर उपचार मिळाले, अन्यथा उपचाराअभावी गंभीराचे प्राण गमवावे लागले असते. शासनाची आरोग्य विभागाची १०८ सेवा घटनास्थळी पोहोचलीच नाही. मात्र ग्रा.रु.पुढील उपचारासाठी सामान्य रुग्णालयात जळगावसाठी उपलब्ध झाली. १०८ चे चालक व वैद्यकीय अधिकारी यांचेवर कारवाई करावी अशी संतप्त नातेवाईकांनी केली आहे.

# चिकलठाण येथील 28 वर्षानंतर वर्ग मित्र आले एकत्र; जुन्या गोष्टीला दिला उजाळा

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील चिखलठाण येथील हायस्कूलमधील १९९३ सालच्या दहावीच्या बॅचमधील वर्गमित्रांची शाळा भरली. तब्बल २८ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी एकमेकांची आपुलकीने खुशालीची चौकशी करीत वर्गमित्रांमधील नाते आणखी घट्ट केले. तसेच एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची ग्वाही दिली इयत्ता दहावीनंतर प्रत्येकाचा शिक्षणाचा मार्ग वेगळा होतो. काहीजण आपापल्या क्षेत्रात उंची गाठत असतांना मैत्री मात्र मागे पडत गेली

याच नात्याची वीण घट्ट करण्यासाठी स्नेहमिलनाचा कार्यकम ठरवुन कन्नड, औरंगाबाद, सिल्लोड, वैजापूर, पुणे व चिखलठाण येथे नोकरी, व्यवसायाच्या माध्यमातून निमित्ताने विखुरलेले ७३ वर्गमित्र सोशल मीडियाच्या औरंगाबादेत एकत्र आले. कार्यक्रमात वर्गमित्र राजेंद्र परसे यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर सर्वांनी एकमेकांच्या सुख-दुःखात मदतीसाठी धावून जाण्याचा निर्धार केला. एकमेकांशी हितगूज करताना प्रत्येकाने आपला व्यवसाय, नोकरी व शेती व्यवसायातील अनुभव सांगितले.

# सोयगाव परिसरात पी.एम. किसान योजनेतील लाभार्थ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी

## तहसीलदार रमेश जसवंत व सोयगाव कृषी विभाग यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात १ सप्टेंबर २०२२ शेतकरी बांधवांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत व कृषी विभाग सोयगाव यांनी दिल्या आहेत. महत्वकांक्षी योजना असून या योजने मार्फत शेतकरी बांधवांना प्रति हप्ता रु. २०००/- इतके अनुदान वाटप केले जाते. सदरील योजनेचा लाभ मिळणेसाठी यापुढे शेतकऱ्यांचे ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे.

सदरील ई-केवायसी केलेल्या शेतकऱ्यांचे केंद्र शासनाकडुन १२ वा हप्ता वितरीत केला जाणार आहे. सदरची ई-केवायसी लाभार्थ्याला स्वतः मोबाईलवरुन अथवा जवळच्या ग्राहक सेवा केंद्रावर जावून करता येईल. ग्राहक सेवा केंद्रावर ई-केवायसी दर प्रती बायोमॉक्ट्रीक रक्कम रुपये १५/- मात्र केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात आला आहे.

तसेच लाभार्थी यांनी स्वतः मोबाईल व्दारे ई-केवायसी करणेबाबतची कार्यपध्दती यासोबत जोडुन पाठविली आहे.

परिसरातील देव्हारी, टिटवी, नादातांडा, मोलखेडा, फर्दापूर, बनोटी, डाभा, सावळदबारासह आपण आपल्या ग्रामपंचायत

**महत्वाकांक्षी योजना असून या योजने अंतर्गत शेतकरी बांधवांना प्रति हप्ता २००० रुपये इतके अनुदान वाटप केले जाते. सदरील योजनेचा लाभ मिळणेसाठी यापुढे शेतकऱ्यांचे ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. सदरील ई-केवायसी केलेल्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून १२ वा हाफ्ता वितरित केला जाणार आहे आणि शेवटची तारीख ७/९/२२ आहे सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी याची दक्षता घ्यावी.**
**मानसिंग भोळे, कृषी सहाय्यक सोयगाव**

क्षेत्रातील शेतकऱ्यांचे वरिल प्रमाणे ई-केवायसी करून घेणे. शेतकऱ्यांसाठी शेवटची दिनांक ७/९/२०२२ पुर्वी ई-केवायसी न केल्यास केंद्र शासनाकडुन दिनांक २५/०९/२०२२ रोजी वाटप होणारा पुढील हप्ता त्या शेतकऱ्यांना मिळणार नाही, याची शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी अशे आवाहन कृषी विभाग सोयगाव यांनी केले आहे.

केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही मधे कोणत्याही प्रकारचा शेतकरी वंचित राहू नये हे शासनाचे धोरण आहे.

# नवनियुक्त काँग्रेस तालुकाध्यक्ष संतोष शेजुळ यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** सावंगी गटाचे जि.प.सदस्य संतोष शेजुळ यांची काँग्रेस कमिटीच्या औरंगाबाद तालुकाध्यक्ष पदांवर नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून, काँग्रेस सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे व फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा काँग्रेस कमिटीचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष डॉ.कल्याण काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडीनंतर सावंगी गटातील पळशी, बकापूर व कृष्णापुरवाडी आदी ग्रामपंचायत कार्यालयातील कमिटींच्या वतीने शेजुळ यांचा भव्य असा सत्कार करण्यात आला असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. संतोष शेजुळ हे सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असतात. विकासकामे, आरोग्य, शिक्षण आदी बाबींबरोबर सर्वसामान्यांच्या समस्या ओळखून त्या तात्काळ मार्गी लावण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या याच कामाची पोच-पावती म्हणून त्यांची काँग्रेस कमिटीच्या औरंगाबाद तालुकाध्यक्ष पदी वर्णी लावण्यात आली असून, त्यांच्या रुपाने प्रथमच एवढ्या मोठ्या पक्षाच्या महत्वपुर्ण पदांवर काम करण्याची संधी मातंग समाजातील एका तरुणाला मिळाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल राजकीय, सामाजिक कला व क्रीडा आदी सर्वच क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. येणाऱ्या काळात पक्षवाढीसाठी व जि.प. व पंचायत समिती निवडणूकीमध्ये काँग्रेस पक्षाचा विजय करण्यासाठी मूठ बांधून कामाला लागेल व संपूर्ण औरंगाबाद तालुका पिंजून काढील असे प्रतिपादन नवनियुक्त तालुकाध्यक्ष संतोष शेजुळ यांनी केले आहे.

# अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**श्रावण, भाद्रपद महिन्यांत सणांची जरा जास्तच रेलचेल असते. याच काळात गौरीपूजन म्हणजे महालक्ष्मीचा सणही येतो. महालक्ष्मीनिमित्त शहरात नोकरी-व्यवसायाला असलेली मंडळी आपापल्या गावी जातात. आमच्याकडे महालक्ष्म्या असल्यामुळे गावी जावे लागेल, नाही गेलो तर कसे चालेल? लोक काय म्हणायचे ते म्हणतील, पण आपल्यालाही वर्षभर करमले पाहिजे ना! ही यामागची धारणा. धारणा चूक किंवा बरोबर या अर्थाने तपासण्यापेक्षा सकारात्मक किंवा नकारात्मक दृष्टीने तपासल्या तर काही अर्थबोध होऊ शकतो.**

भारतीय संस्कृतीत स्त्रीला महत्त्वाचे स्थान आहे. परकीयांच्या आक्रमनानंतर दुसऱ्याकडे पाहून किंवा अन्य काही कारणामुळे स्त्रीकडे पाहण्याचा किंवा तिच्या समाजातील स्थानाचे अवमूल्यन निश्चितच झाले; परंतु फार प्राचीन काळापासून इथली स्त्री स्वतंत्र, स्वाभिमानी आणि स्वतःचे निर्णय स्वतः घेणारी राहिली आहे. कारण भारतीय तत्त्वज्ञान केवळ ब्रह्माचा उद्घोष करत नाही तर माया आणि ब्रह्म याशिवाय हा निसर्ग पूर्णत्वास जाऊ शकत नाही, ही यामागील धारणा होती. सांख्य दर्शनात प्रकृती आणि पुरुष या संबंधाने आलेले विवेचन मुळातून समजून घेतल्यास त्याची सत्यता पटेल. त्यामुळे स्त्रीशक्तीला आवाहन करणे, तिची प्रतिष्ठा जपणे आणि उपासना करणे हे ओघाने आलेच. स्त्रियो देवः स्त्रियः प्राणाः स्त्रिय एव हि भूषणम, ही स्त्रीकडे पाहण्याची आमची दृष्टी आहे. त्याचाच परिपाक म्हणून आम्ही गौरीपूजन करत आलो आहोत. माणूस केवळ आहार, निद्रा, भय आणि मैथून याच चक्रात फिरत राहिला तर आत्मोद्धार कसा व्हायचा? समाजाचे अध्यात्मिक अंगाने उन्नयन घडवून आणण्यासाठी विविध प्रकारच्या सण उत्सवांची सुरुवात झाली. कारण केवळ विज्ञानाची कास धरून समाज रुक्ष, यांत्रिक आणि निरस होण्याची शक्यता असते. यंत्राला प्रेम, करुणा, मानवता किंवा परोपकार या गोष्टी ज्ञात नसतात. आणि समाज म्हणून त्याचे असणे या वैशिष्ट्यांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. नराचा नारायण होऊ शकतो ते फक्त आध्यत्मिक अंगाने आणि माणसाकडील उच्च विचारसरणीमुळे. हा विचार समाजात सातत्याने रुजला पाहिजे, यातून सण उत्सवांची निर्मिती झालेली आहे. यातही हे जग फक्त पुरुषांच्या कर्तृत्वानेच निर्माण झाले असे नसून यात समस्त स्त्री वर्गाचा देखील तेवढाच वाटा आहे, हा अध्यात्मिक विचार मुळातून समजून घेतला पाहिजे. अलीकडे आपण अध्यात्म असा शब्द उच्चारला तरी काहींच्या कपाळावर लगेचच आठ्या पडायला सुरुवात होते. त्यात त्यांची काही चूक नाही. कारण अध्यात्माच्या नावाखाली पसरत चाललेली अंधश्रद्धा, अतार्किकता, शब्दप्रामाण्यास आलेले महत्त्व आणि एकूणच




भोंगळपणा हाच त्यांच्या निदर्शनास आलेला असतो. आपण आज आधुनिक काळात जगत आहोत तर याभोवती जमा झालेली जळमटे दूर सारून शुध्द, निर्लेप आणि तर्कपूर्ण अध्यात्मशास्त्र उलगडून दाखवले तर निश्चितच काही फायदा होऊ शकतो. गौरीपूजन हे आपल्या मनातील स्त्रीविषयक दृष्टिकोनाचे सकारात्मक रूप होय. धनधान्य, संपत्ती, ऐश्वर्य, सुख, समाधान आणि मांगल्य आपल्या जीवनात यावे, कोण्याही जीवाचा न घडो मत्सर ही भावना वाढावी आणि समस्तांचे कल्याण व्हावे, हा उद्देश यामागे होता. त्यातील पावित्र्य आज आपण घालवून बसत चाललो आहोत म्हणून मूळ उद्देशावर टीका केली पाहिजे असे नव्हे. कलंकित चंद्राची उपमा देताना माऊली ज्ञानेश्वरांनी त्याचे शुद्धीकरण करून चंद्रमे जे अलांछन, असे म्हटले होते. हे प्रतिभाज्ञान समाजात रुजले, विकसित झाले तर मनातील किल्मिष दूर होऊन व्यापक विचाराने आपण व्यवहार साधू शकतो. मनाची निर्मळता संशयास थारा देत नाही आणि अशा निःसंशय मनातच प्रेम वास करू शकते. म्हणुनी संशयाहुनी थोर, आणिक नाही पाप घोर, हा विनाशची वाघूर, प्राणियाशी असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. आपल्या असण्याची मूल्ये आपल्या भूमीतच शोधली पाहिजेत. युरोपीय किंवा बाह्य जगाच्या तुलनेने आपले स्वत्व आपण शोधू शकत नाही. इथल्या आचारधर्मावर सडकून टीका करणारे सुद्धा भारतीय जीवनविषयक तत्त्वज्ञान किती प्रगल्भ आणि परिपक्व आहेत याबद्दल गौरवोद्‌गार काढतात. तत्त्वज्ञानातील ही प्रगल्भता जगण्याच्या पातळीवर यावी, म्हणून प्रयत्न करण्याची गरज आज येऊन ठेपली आहे. अन्यतः पुराणातील वांगी पुरणातच शोभून दिसतात, त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग होत नाही. आजच्या प्रगल्भ विचारांच्या अभ्यासू युवकांनी समाजाला नवा दृष्टिकोन दिला तर मानवी कल्याणाला सुरुवात होईल, अन्यतः केवळ काही साजरे करायचेच म्हणून तर आजपर्यंत आपण तसे करतच आलो आहोत. ही मानवी कल्याणाची, प्रेमपूर्वक वर्तनाची आणि सहिष्णुतेची आपल्या मनातील आशा गौरीपूजनाच्या निमित्ताने फलद्रूप होत असेल तर काही अर्थ आहे, अन्यतः नेहमीच येतो


## बोंबाबोंब कशासाठी?

**गोरीपुजनाच्या निमित्ताने जगातील समस्त स्त्रीवर्गाविषयीचा दृष्टिकोन निकोप झाला तरी आपण भरून पावलो. या जगातील फक्त एक स्त्री वगळून बाकी समस्त माझ्या माता-भगिनी आहेत, हा भाव मनी रुजला पाहिजे. आपल्याकडून स्त्री दाक्षिण्य विषयक निकोपता वाढली पाहिजे आणि आदिशक्ती मायेच्या रूपाने असणारी स्त्री या जगात निर्भयपणे, उन्मुक्तपणे वावरली पाहिजे, असे सामाजिक, सांस्कृतिक आणि एकूणच जीवनव्यवहार विषयक वातावरण आपण बनवू या. तेव्हाच कोठे या गौरीपूजनाला काही अर्थ प्राप्त होईल.**

पावसाळा अशी आपली अवस्था ठरलेलीच आहे.
हा संसार, भवसागर दुर्घट आहे हे सर्वांनाच माहीत असले तरी, त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मात्र आपणास सापडत नाही. आपल्यातील करुणेचा विस्तार झाल्याशिवाय या जीवास सुख प्राप्त होणार नाही. कारण अंतःकरणातील करुणाच माणसातील अनुबंध जोडण्यास मदत करतो. हा जुळलेला अनुबंध आणखी दृढ व्हावा, अशी याप्रसंगी आशा बाळगू या.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# कायद्यांना माणुसकीची जोड हवी



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**एक जेष्ठ नागरिक आपली पेन्शन उचलायला बँकेत गेले. काऊंटरवर त्यांनी विड्रावल स्लीप आणि पासबुक दिले. कॅशियर ने त्यांना टोकन दिले आणि बसायला सांगितले. एक तासानंतर त्यांचा टोकण नंबर आला. ते काऊंटरवर गेले तर त्यांना तुम्हाला पैसे मिळणार नाहीत. तुम्ही जिवंत असल्याचे प्रमाणपत्र घेऊन या असे सांगण्यात आले. त्यांनी आपले आधारकार्ड आणि पॅनकार्ड ओरिजनल दाखवले, तरी ते ऐकायला तयार नव्हते. शेवटी नाईलाजाने ते 73 वर्षांचे काका काठी टेकवत, स्वतः ला सांभाळत निघून गेले. तीनचार दिवसांनी ते परत बँकेत आले. त्यांनी पैसे काढायची स्लीप, पासबुक आणि जिवंत असल्याचे प्रमाणपत्र दिले. त्या कॅशियर ने मख्खपणे फक्त स्लीप घेतली आणि बाकी मागितले तर दाखवा असे सांगून टोकण दिले आणि बसायला सांगितले.**

एक सव्वा तासाने टोकण नंबर आला. ते आजोबा काऊंटरवर गेले तर तो कॅशियर म्हणाला काका हे ठिक आहे. पण आपण मागचे वर्षी पण जिवंत होतात हे रेकॉर्ड वर नाही आहे. ते दिल्याशिवाय तुम्हाला पैसे देता येणार नाहीत. मग ते आजोबा भडकले, म्हणाले मी प्रत्यक्ष तुमचे समोर उभा आहे. माझे ओरिजनल आधार कार्ड, पॅनकार्ड देखिल मी दाखवत आहे. यापेक्षा मी जिवंत असल्याचा दुसरा पुरावा आजून काय हवाय आपणास. तीथे जमलेली मंडळी ही हसायला लागली. तरी तो कॅशियर मख्खपणे निर्विकार पणे म्हणाला ते सगळे मला समजते, पण कायद्याने रेकॉर्ड वर आम्हाला सर्व ठेवावे लागते. नाहीतर ऑडिटर रिमार्क मारतात आणि आम्हाला भोगावे लागते. मी कांही नाही करू शकत. काय करावे हे त्या आजोबांना कळत नव्हते, ते काकुळतीला येऊन विणवत होते. म्हणाले आहो मी एकटा राहतो. बायको कधीचीच देवाघरी गेली मला सोडून, मुलं परदेशात असतात. औषधी संपली आहेत, मी तीन दिवस झाले या जिवंत असण्याच्या प्रमाणपत्रासाठी भटकतो आहे.

माझ्या वयाचा तरी विचार करा. मी आज जिवंत आहे याचे प्रमाणपत्र आणले आहे नां. म्हणजे मी मागच्या वर्षीही जिवंत होतो हे सिध्द होत नाही काय आणि मग मागचे वर्षी का नाही आडवलेत मला त्यासाठी. आज जिवंत आहे हे येवढे लिहून आणून देऊन ही असे काय करताय. पण ते कॅशियर ऐकायला तयार नव्हते.

कांही लोक त्यांना घेऊन मॅनेजर कडे गेले तर ते म्हणाले. मी हे सर्व समजू शकतो. पण नियमाला मी अपवाद नाही करू शकत. तुम्ही मागचे वर्षीही जिवंत होतात हे प्रमाणपत्र तुम्हाला आणावेच लागेल. दरवर्षी कशाला सांगावे लागावे. गेली दहा बारा वर्षे तुम्ही पेन्शन उचलताय नां, मग. शेवटी तीन दिवसात हवे असलेले प्रमाणपत्र आणून देतो, असे लिहून घेऊन, त्यांना मॅनेजर कडे आणणाऱ्या लोकांपैकी दोघांच्या साक्षीदार म्हणून सह्या घेऊन त्यांना औषधांपूरते पैसे काढायची परवानगी देऊन तोडगा निघाला. वर त्या आजोबांना दम देण्यात आला की तीन दिवसात न दिल्यास खाते वापरू देणार नाही. हे झाले इथले.



जेथून जिवंत असल्याचे सर्टीफिकेट मिळवायचे होते तेथील मजा तर वेगळीच आहे... ते आजोबा परत दोन वेळा सर्टिफिकेट घ्यायला म्हणून संबंधीत ऑफिस मध्ये गेले. तीन दिवसांपूर्वीच हयातीचा दाखला घेतलेला होता म्हणून थोडा परिचय झालेला होता, त्यामुळे ते ऑफिसर ओळखतील असे समजून आजोबा तीथे गेले.

तो अधिकारी आधी खेकसला. परवाच तर दिले तुम्हाला जिवंत असल्याचे प्रमाणपत्र मग आता परत काय ? काका म्हणाले आहो त्या बॅंकेने मागचे वर्षी पण मी जिवंत होतो याचा ही पुरावा म्हणून तसे सर्टिफिकेट मागितले आहे. ते म्हणाले तसे देता येत नाही. कारण मागच्या वर्षी तुम्ही जिवंत होतात याचा आज काय पुरावा आहे तुमचे कडे? आणि बॅकडेटचे सर्टिफिकेट देण्याची आमचेकडे पध्दत नाही. तुम्ही माझे समोर उभे आहात हे ठीक आहे पण मागचे वर्षी जिवंत होतात हे यावरून सिध्द होत नाही. ते आजोबा म्हणाले आहो साहेब मी बॅकडेटेड मागतच नाही आहे. आजच्याच डेटचे द्या फक्त त्यात लिहा आमचे माहीती नुसार हे मागचे वर्षी पण जिवंत होते. तो ऑफिसर एकदम खेकसला, आहो मी ऐकुन घेतो म्हणून तुम्ही काहीही बरळाल काय?

मी आज कोणत्या आधारावर तुम्ही मागचे वर्षी पण जिवंत होतात हे ठरवू. आहो आमचे ऑडिटर फाडून खातील मला. माझी नोकरी जाईल. माझी मुलं मुली अजून लहान आहेत हो, त्यांचे शिक्षण चालू आहे. माझी नोकरी गेली तुमच्या मुळे तर मी काय खाऊ, संसार कसा चालवू. बायको मुलांचे कसे संगोपन करू. मी असली रिस्क नाही घेणार तुमच्या तुटपुंज्या पेन्शन साठी, जा तुम्ही. ते आजोबा काकुळतीला येऊन बोलले आहो हवे तर माझ्या शेजाऱ्यांना मी घेऊन येतो, ते सांगतील तुम्हाला गेली वर्षभर ते मला जिवंत असल्याचे पहात आहेत ते. ते ऑफिसर बघले नाहीत. ते म्हणाले ते लाख म्हणतील हो, पण तो काय पुरावा नाही होऊ शकत. कागदोपत्री पुरावा हवाय. ते आजोबा रडकोंडीला आले, विनवण्या करायला लागले इतर ही लोक साहेबांना म्हणायला लागले आहो साहेब द्या की त्यांना प्रमाणपत्र. उगाच कशाला ताणताय त्यांना या वयात. आहो तुम्हीपण निवृत्त झालात की तुम्हालाही हे फेस करावेच लागणार आहे.

शेवटी ते आजोबा म्हणाले साहेब, गेली वर्षभर मी माझे बँक खाते वापरत आहे, तेंव्हा तुम्ही कोणी अडवले नाही मग आजच का ही अडवणूक. हे तुम्ही तुमच्या बॅंकेत जाऊन बोला, आम्हाला बोलून काय उपयोग. हताश होऊन ते आजोबा परत बॅंकेत जायला निघाले. तीथे गेले तर बॅंकेचे एन्ट्री डोअर बंद होते. मागच्या दाराने ते कसेबसे शाखेत गेले तर सेक्युरिटीवाला म्हणाला आहो आजोबा वेळ संपली आहे. उद्या या. तरी त्यांनी विनंती करून मॅनेजरला भेटायचा हट्ट धरला. शेवटी कशीबशी मॅनेजरची भेट झाली. ते ही म्हणाले उद्या या. आजची वेळ संपली. एव्हाना आजोबा थोडे धिट झाले होते. ते म्हणाले साहेब काय बोलताय तुम्ही ट्रॉन्झॅक्शन आवर्स संपले असतील. पण बॅंकेची वेळ तर साडेपाच पर्यंत आहे ना. मी पैसे काढायला नाही आलेलो. मला तुमचेशी बोलायचे आहे. मी तीथे गेलो होतो मागच्या वर्षाचे सर्टिफिकेट मागायला तर ते म्हणाले तुम्ही मागचे वर्षी जिवंत होतात याचा कागदोपत्री पुरावा घेऊन या. माझ्या शेजारी राहणारे तीनचार लोक सांगत होते की काका आमचेच बिल्डिंग मध्ये शेजारीच राहतात, गेली पन्नास वर्षे आम्ही त्यांना ओळखतो. ते मागच्या वर्षी पण जिवंत होते. हवे तर त्यांचे सह आम्ही ही शपथपत्र स्टॅम्प पेपरवर करून देतोत. पण ते ऐकायला तयार नाहीत.

आपण या शाखेत गेली तीन चार वर्षे आहात. मी नियमीत खाते वापरतो. त्यावेळी मला कोणीही हयातीचा दाखला मागितला नाही. मग आत्ताच का ही अडवणूक. ते म्हणाले खाते तुमचे आहे तुम्ही हवे तसे वापरू शकता. पॅनकार्ड नंबर, आधारकार्ड नंबर दिलात की झाले. तुम्हाला आम्ही सांगितले होते की पेन्शन खाते स्वतंत्र ठेवा आणि ईतर व्यवहार वेगळ्या खात्यातून करा म्हणजे हा प्रश्न येणार नाही. फक्त पेन्शन खात्यालाच हयातीचा दाखला द्यावा लागतो. शेवटी त्यांच्या शेजारी राहणारे सुपरक्लासवन ऑफिसर आणि एक उद्योजक त्यांचे मदतीला आले. त्यांनी काकांसाठी स्वतः चे ॲफेडेविट करून दिले. आणि ते मागच्या वर्षीही जीवंत होते हे आमचे म्हणने खोटे निघाल्यास आम्ही काकांनी त्यांचे खात्यातून काढलेल्या पैशांची आम्ही जबाबदारी घेतो. शिवाय त्यांच्या पेन्शन ची रक्कम खात्यात ठेऊन इतर रक्कम ते काढतील. असे लिहून देऊन शेवटी हा विषय मिटला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

शताब्दी महोत्सव विशेष

# ।। मिरज निवासी सदगुरु ओम मालती आई ।।



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**या वर्षी ओम मालती आईंच्या जन्मशताब्दीचा महोत्सव साजरा केला जात आहे. त्या निमित्ताने सहा, सात, आठ सप्टेंबर रोजी मिरज तपोवनात निरनिराळे कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. तसेच अनेक संतही उपस्थित राहणार आहेत. त्यांची प्रवचने होणार आहेत. सत्संग, भजन, महाप्रसादाचा, लाभ होणार आहे. तसेच विविध कार्यक्रमात सुधाकर तळणीकर व अर्चना खासनीस यांच्या गायनाचाही कार्यक्रम आहे. तसेच साधकांचे स्वरचित मनोगत स्वरचित काव्याच्या स्वरूपात ऐकायला मिळणार आहे. तसेच 20 सप्टेंबरला पुणे व जळगाव तपोवनात जन्मशताब्दी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.**

सांगली जिल्ह्यात मिरज ते म्हैसाळ या मार्गावर मिरज पासून साधारणपणे सात ते आठ किलोमीटर अंतरावर ओम मालती आई तपोवन आहे. निसर्गरम्य वातावरणात येथे भावमंदिर, साधक निवास, शांती निवास, तसेच सद्गुरु आईची समाधी आहे. नारळाची झाडे असंख्य प्रकारची फुले यांनी तपोवनचा परिसर अतिशय प्रसन्न आणि चैतन्यमय असून साधकांना ऊर्जा प्राप्त करून देणारा असा आहे.

1991 सालात गुढीपाडव्याच्या दिवशी या ठिकाणी तपोवनाचे भूमिपूजन करण्यात आले म्हैसाळ येथील एक दानशूर शेतकरी श्री बसगोंडा बसर्गी यांनी सव्वा एकर जमीन संस्थेला दान दिली परंतु लवकरच काम करावे अशी अट घातली. त्याप्रमाणे वर्षभरात बरेचसे काम झाले. आता त्यानंतर हळूहळू टप्प्याटप्प्याने साधक निवास, महिलांसाठी निवास, अन्नपूर्णा भवन, मारुती मंदिर, अशा एकेक गोष्टी साकारात गेल्या आज अनेक हजाराच्या संख्येने साधक वर्ग आहे.

20 सप्टेंबर 1923 साली मिरज येथे ब्राह्मणपुरीतील करमरकर घराण्यात ओम आईचा जन्म झाला. परमपूज्य आईचा विवाह मिरज येथीलच श्री गणेश हरी बाळ यांच्यासोबत झाला. हे दोन्ही घराणे धर्मपरायण आणि इतिहास प्रसिद्ध होती. श्री गणेश बाळ हे नोकरी मुळे दिल्लीतच होते. 1956 मध्ये मे महिन्यात बाळ कुटुंब दिल्लीहून ऋषिकेशला शिवानंद आशीर्वाद पंधरा दिवस राहायला गेले. त्यांना स्वामी शिवानंदांने एक पुस्तक दिले आणि बेटा तू हे पुस्तक जरूर वाच, ये जरूर पढना, असे सांगितले आणि या पुस्तकातूनच आईंना ध्यानाची प्रेरणा मिळाली 1962 च्या अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आईनी गुरुदेव शिवानंदांना प्रत्यक्ष अनुग्रह देण्याचा आग्रह केला परंतु स्वामींनी आईंना विचारले तुला आणखी काय हवे आहे? तेव्हा आई म्हणाल्या, मला सुगृहिणी, सुमाता, पत्नी राहुन अध्यात्मिक प्रवास पूर्ण करायचा आहे। तेव्हा गुरुदेव मंजूर असे म्हणाले। माझ्या हातून दुसऱ्याचे दुःख दूर व्हावे. या कार्यात मला आपले आशीर्वाद लाभावेत तसेच प्रपंच सांभाळून साधना करण्यासाठी आशीर्वाद द्यावेत. ओम आई नेहमीच म्हणतात प्रपंच सोडून कोणी सुखी आहे का ? तेव्हा प्रपंच सोडण्याचा आव आणू नका. पोटात आसक्ती आणि ओठात विरक्ती नकोय .जीवनाला कंटाळू नका. आणि कर्तव्याला चुकू नका. तुम्हाला गुरुला प्राप्त करायचे नाही तर गुरुंनी जे प्राप्त केले आहे ते प्राप्त करायचे आहे. म्हणून गुरु मधील व्यक्तीं न पाहता तत्व पाहायला शिका. एका ठिकाणी निष्ठा ठेवा. 1962 पासून गुरु आदेशा नुसार अध्यात्मिक मार्गदर्शन करीत आहेत. ध्यानात भगवान विष्णूने दृष्टांत देऊन विष्णूयाग करायला सांगितले. त्यानुसार विष्णूयागाचा कार्यक्रम वैकुंठ चतुर्थीला मिरज येथे होतो.

ऋषिकेश परतताना परमपूज्य स्वामी शिवानंदाने आईना एक पुस्तक दिले ते म्हणजे "शिवानंद योगत्रयी".

आणि आईना सांगितले बेटा तू हे पुस्तक जरूर वाच आणि ते पुस्तक वाचूनच आईंना ध्यानाची प्रेरणा निर्माण झाली. परमपूज्य आईंना ध्यानातून स्वामीजींचे मार्गदर्शन मिळू लागले होते, आणि त्यातून त्यांच्या शंका निरसन होत होते. ध्यान आणि जप या दोन गोष्टींवर जास्त भर आहे संसारात राहून ओम आईंनी कठोर साधना केली, आणि गुरु साधनेचा आनंद प्राप्त करून घेतला. याचवेळी त्या कुटुंबासाठीही तेवढ्याच तत्पर असायच्या. कोणा एकाची साधन गाथा या ग्रंथात सुरुवातीच्या काळातील साधनेच्या मार्गातील अनेक गोष्टी त्यांनी सांगितलेल्या आहेत.

पूज्य आईचे चिरंजीव श्री हेमंत दादा बाळ हे नोकरी निमित्त जळगाव येथे होते.त्या दृष्टीने आई त्यांच्याकडे बराच काळ राहत असत .त्याचवेळी तिथे जाधव मावशींच्या( रुक्मिणी जाधव) संपर्कातून बराच मोठा साधक वर्ग मिळाला तसेच जळगावलाही ओम मालती तपोवन उभारले गेले. पुण्याच्या साधकांनीही तपोवन साठी पिरंगुट जवळ उरिवडे येथे जागा मिळवली व 2007 मध्ये दासनवमीच्या दिवशी तेथेही तपोवनाचे कामकाज सुरू झाले .आज जळगाव, पुणे, आणि मिरज, या तीनही ठिकाणी ओम आईचे तपोवन वास्तु झालेल्या आहेत. तीनही ठिकाणी सत्संग होत असतात.

आईंचे मुख्य ठिकाण मिरज हे आहे, त्यामुळे तेथेच आईंची समाधी आहे. मिरज येथे वर्षभरात गुरुपौर्णिमा, महाशिवरात्र, अक्षय तृतीया, दासनवमी, जन्माष्टमी, तसेच विष्णूयाग असे कार्यक्रम होत असतात. यांना मुंबई, पुणे, ठाणे, मिरज, सांगली , सातारा, दिल्ली, बडोदा, नागपूर, अमरावती अकोला, जळगाव, जामनेर,













भुसावळ, पाचोरा ,अशा ठिकाणाहून साधक वर्ग हजेरी लावत असतात. मिरज तपोवनात अमृत महोत्सवाचा तसेच सहस्त्रचंद्र दर्शनाचा कार्यक्रमही मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरा झाला. होता कोविडच्या काळात सुद्धा ऑनलाईन सत्संग सुरू होता त्याचा सुद्धा अनेक साधकांनी लाभ घेतला.

तपोवनच्या कामकाजात आईच्या दोन्ही कन्या मेधाताई गुळवणे, तसेच शोभाताई लिमये आईंचे चिरंजीव श्री हेमंत दादा बाळ यांचा सक्रिय सहभाग असतो. शोभाताई लिमये मिरज तपोवनाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत.. मिरज,जळगाव,पुणे, येथे तपोवनचे कामासाठी अनेकांनी आपला सहभाग दिला ,तसेच पद्मजा फेणाणी अजित कडकडेंच्या कार्यक्रमातून देणग्या मिळवण्यास मोठे सहकार्य केले.

ह्या वर्षी ओम आईच्या जन्मशताब्दीचा महोत्सव साजरा केला जात आहे. त्या निमित्ताने सहा-सात -आठ सप्टेंबर 2022 रोजी मिरज तपोवनात निरनिराळे कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. तसेच अनेक संतही उपस्थित राहणार आहेत. त्यांची प्रवचने होणार आहेत. सत्संग, भजन, महाप्रसादाचा, लाभ होणार आहे. तसेच विविध कार्यक्रमात सुधाकर तळणीकर व अर्चना खासनीस यांच्या गायनाचाही कार्यक्रम आहे तसेच साधकांचे स्वरचित मनोगत स्वरचित काव्याच्या स्वरूपात ऐकायला मिळणार आहे. तसेच 20 सप्टेंबरला पुणे व जळगाव तपोवनात जन्मशताब्दी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

ओम आईनी 23 नोव्हेंबर 2009 रोजी समाधी घेतली त्यांचे समाधी मंदिर आहे मिरज येथेच आहे.

तपोवन गेल्या काही वर्षापासून मोठ्यांचे व लहान मुलांचे निवासी अध्यात्मिक शिबिर घेतले जाते तसेच दरवर्षी

दिंडी काढली जाते. आतापर्यंत जळगाव ते मिरज तपोवन, जळगाव तरसोद नशिराबाद (झिपरू अण्णा समाधी) जळगाव -मुक्ताईनगर तसेच पुण्याहून, अक्कलकोट येथून गोंदवल्याहून दिंडीचे आयोजन केले गेले होते.

तपोवनात सत्संग आध्यात्मिक मार्गदर्शन, नाम साधना, योगाचे वर्ग, होतात. तसेच रक्तदान शिबिर. आजूबाजूच्या खेड्यावर आश्रम शाळांना मदत करणे, सांगली मिरज परिसरातील हुशार विद्यार्थ्यांचा सत्कार करणे त्यांना शाळेसाठी उपयोगी वस्तू देणे शाळेचा ड्रेस घेणे अशा प्रकारचे सेवा कार्यही सेवा केले जाते. तसेच अन्नदानही केले जाते.

आईची ग्रंथसंपदा मोठी आहे .त्यात कोणा एकाची साधन गाथा, सिद्धगाथा, कमलपर्ण तू परिवारीही, कालाय तस्मे नमः, आजच्या युगाची गीता, विष्णुसहस्रनामाचा सुलभ अर्थ, आकाशगंगा, आकाशात पतितम तोयम, चिदगंधा, आणि अजून बरेच काही मार्गदर्शन व ओम यांची महती परिचय करून देणारे ग्रंथ आहेत तसेच दर तीन महिन्याने तपोवन च्या वार्ता असणारे अंतरनास संदेश हे त्रैमासिकही काढले जाते.

एका अक्षय तृतीयेला आम्हीही ओम आईच्या समावेत ऋषिकेश येथे सर्व कार्यक्रमांचा,महाप्रसादाचा लाभ घेतला आहे. तसेच पाच-सहा दिवस गंगास्नान करायला मिळाले आहे. तो आईचा 45 वा दीक्षाही होता. आपणही कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकता. तसेच ग्रंथसंपदा घेऊन तपोवनास देणगीही देऊ शकता. यासाठी ओम मालती तपोवन, मिरज म्हैसाळ रस्ता, पोस्ट-म्हैसाळ. 416 409 जिल्हा सांगली. संपर्क मोबा..9823959654, 9420829904 येथे संपर्क साधावा.

# शिक्षक हेच जीवनरक्षक



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**स्वतः एकाच जागी राहून असंख्य पांथस्थ विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक वाटाड्या ठरणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भारताचे माजी राष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस ५ सप्टेंबर शिक्षकदिन म्हणून साजरा केल्या जातो. गेल्या दोन वर्षातील लॉकडाऊनच्या संकटकाळातही शिक्षक विद्यार्थ्यांचे हित लक्षात ठेवून शिक्षण अविरत चालू ठेवण्यासाठी वेगवेगळ्या ऑनलाईन संकल्पनाच्या माध्यमातून झटत होते. पुढची पिढी फक्त शिक्षक घडवू शकतो हे अनेक वेळा त्यांनी सिद्ध केले आहे.**

साधारणतः आपल्याला शाळेत शिकविणाऱ्या व्यक्तीला आपण शिक्षक असे म्हणतो तसे पाहिल्यास भारतीय संस्कृतीत १४ विद्या ६४ कला आहेत. गायन, वादन, वाचन, शिल्पकला, धातुकला, चित्रकला, विणकाम, नाट्यकला इ. ह्या विद्या आणि कला अंगीभूत असून त्या इतरांपर्यंत सक्षमतेने पोहचवून त्याला त्यात कुशल करणारा व्यक्ती म्हणजे शिक्षक. त्याच्याकडे असणारी विद्या किंवा कलागुणात स्वतःच्या कर्तृत्वाची भर घालून त्याचे संगोपन व संवर्धन व्हावे यासाठी प्रसार करणारे हे व्यक्तिमत्व स्वतः आपल्याच जागेवर राहून विद्यार्थ्यांना ध्येयापर्यंत पोहवते. जीवनाच्या पावलोपावली मार्गदर्शक ठरणारा हा हा वाटाड्या वंदनीय आहे.

आपल्या मेंदूची वाढ जशी फॉरमेटिव्ह इअर्स मध्येच पूर्ण होते त्याचप्रमाणे या दरम्यान शिक्षकाने शिकविल्या गुणांवर किंवा आपण आत्मसात केलेल्या गुणांवर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा पाया रचल्या जातो. अर्थातच नंतरच्या शिक्षणाने, अनुभवाने आणि संगतीने त्याचं फाईन ट्युनिंग होतं. व्यक्तिमत्त्वाचा मूळ ढाचा मात्र सुरवातीच्या शिक्षणाने पक्का होत असल्याने ते शिक्षण व त्यादरम्यानचे शिक्षक यांचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व असते.

शालेय जीवनात उत्तम गुण मिळविणारा विद्यार्थी नेहमी शिक्षकाला प्रिय असतोच पण आपल्या विद्यार्थ्यांना गुणांच्या मागे न धावता गुणवत्तेची कास धरायला शिकविणारा तोच खरा शिक्षक.

आपल्याला आपल्या शालेय, विद्यालयीन व महाविद्यालयीन जीवनात काही दर्जेदार, गुरुजन मिळतात. ते आपल्याला कधी मारत, ठोकत, प्रेमाने तर कधी रागाने शिकवत संस्कार करुन आपल्याला कार्यक्षम बनवितात. म्हणूनच शिक्षकाला परमेश्वराची उपमा दिल्या जाते.

**।। गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।।**
**।। गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः ।।**

विद्यार्थ्यांच्या मनात स्वयंप्रेरणा जागविणे, त्यांना स्वतःतील क्षमतेविषयी असणाऱ्या न्यूनगंडावर मात करायला शिकविणे, गुणवत्ता विकसित करणे तसेच आपल्या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक, व्यावसायिक, व्यवस्थापकीय, नेतृत्व, सामाजिकता, खेळ यातील गुणवत्तेला चालना देऊन त्यांची योग्य सांगड घालून विद्यार्थ्याला स्वतःचे करिअर साठी कार्यक्षम बनविणे हे सर्व एका शिक्षकाचे आणि सोबतच पालकांचे कर्तव्य असते. विद्यार्थ्यांकडून सर्वोत्तम काढून घेऊन त्याला योग्य निर्णय घेण्यासाठी कार्यक्षम बनविण्यात त्याच्या शिक्षकाचा सर्वात मोलाचा हातभार असतो.

विद्यार्थ्यांकडून सर्वोत्तम काढून घेऊन त्याला योग्य निर्णय घेण्यासाठी कार्यक्षम बनविण्यात त्याच्या शिक्षकाचा सर्वात मोलाचा हातभार असतो. आज ५ सप्टेंबर निमित्त गुरूजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिक्षक दिन साजरा करतात.

आपले आयुष्य घडविण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माझ्या खालिल ओळी तमाम शिक्षकांना समर्पित

**आई वडीलानंतर तुम्हीच आहेत दुसरे देव।**
**शिक्षण तुमचे असताना नाही कशाचे भेव।।**
**तीन अक्षरी शब्द पण त्यात आहे जीवनाचे सार।**



**शिकविले आम्हा कधी लाडाने कधी देऊन मार।।**
**कितीही शिकलो असलो तरी तुमच्यामुळेच घडलो।**
**जीवनाच्या कठीण परीक्षेत यशस्वी तुम्हामुळे ठरलो।।**
**खरं सांगतो गुरुजी आज तुम्ही मला आठवता।**
**आठवण येऊन तुमची मनात पुन्हा साठवता।।**

अक्षरओळखण्या पासून तर शब्दांची मांडणी करून त्या शब्दांना बोलावं कसं ते माणसाचे खरं चारित्र्य घडवणाऱ्या व्यक्तींमधील सर्वात महत्वाचे असतात ते शिक्षक. कलेत, परिस्थितीत, विचारात असो वा ज्ञानात कुणाच्या जीवनाला कलाटणी देणं खरंतर खूप कठीण काम आहे. कारण कुणी कसं जगाव,वागावं,काय बनावं हे स्वातंत्र्य असतांना आपल्या जीवनात शिक्षक हा एकमेव व्यक्ति असतो जो आपले अंगभूत गुण ओळखतो आणि आपल्याला यशाची सुत्र सांगतो.

खरं तर शिक्षकाचं महत्व माणसाला किंवा प्रत्येक विद्यार्थाला अशा घडीला समजतं जेव्हा तो चारही बाजूनी स्पर्धेत उतरतो. स्पर्धेला सामोरे जातांना त्याला जाणवतं की मी माझ्या ज्या गुणांमुळे या स्पर्धेत जिंकलोय ते गुण याच व्यक्तिने माझ्यात रुजवलेत. या जाणीवेने त्याला खरा शिक्षक कळतो कारण माणुस विचारांने, ज्ञानाने, गुणांने, सजगतेने मुख्यत्व प्रामाणिकतेने घडतो. मात्र ही घडवणूक केवळ शिक्षक करू शकतो आणि या साऱ्या गोष्टींच मुळ असत शासन, शिस्त,तत्वबद्धता! शिस्तीने माणसातला, विद्यार्थ्यातला प्रामाणिकपणा,कष्ट करण्याची जिद्द वाढते.

आपल्याला कागदावर शाईच्या मुलाम्यातील गुणांचा विद्यार्थी न बनवता गुणांनी परिपुर्ण, सच्चा विद्यार्थी बनवलं अशा सर्व शिक्षकांना आपण विसरू शकत नाही. आजही या शिक्षकांची आठवण आली की गहिवरून येते. शिक्षकदिनाच्या निमित्ताने आपल्या जडणघडणीत सामील असलेले आईवडिल, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, विद्यालयीन शिक्षक आणि आताही आपल्याला जीवनशाळेत मार्गदर्शन करणाऱ्या सर्वच शिक्षकांना साष्टांग नमस्कार करून कृतज्ञता व्यक्त करू या.

तुकारामनीती
भाग 24

# शब्दांची रत्ने करुनी अळंकार । तेणे विश्वंभर पूजियेला ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मागील सहा महिन्यात आपण तुकाराम नीती या नियमित सदरामध्ये तुकोबांच्या गाथ्यातील विविध प्रकरणांचा आणि त्या अंतर्गत अभंगांचा विचार करत आहोत. संत तुकारामांचे अभंग म्हणजे रत्नांची खाण असून त्यात अनेक प्रकारची आकर्षक, रंगीबेरंगी, मौल्यवान विचाररत्ने हाती लागताहेत. तुकोबांच्या संपूर्ण जीवन संघर्षाचे आणि गाथ्याचे अवलोकन केले असता, संत तुकारामांना हे सगळं का लिहावं वाटलं असेल ? एकही दिवस शाळेत न जाता हे सगळं कसं जुळून आलं असेल ? असे एक अनेक प्रश्न उपस्थित होतात. आज घडीला आपल्या भोवताल अनंत संसाधने अंगाखांद्यावर लोळण घेत असतांना एखादे लीळाचरित्र, तुकाराम गाथा अथवा ज्ञानेश्वरी का निर्माण होत नसावी ? याचे उत्तरही आपल्या सर्वांनाच शोधावे लागेल, नव्हे नव्हे ते शोधणे आपल्या सर्वांसाठी मोठे आव्हान आहे ! ही सगळीच माणसं ज्या भट्टीतून आली ती भट्टी म्हणजे प्रचंड संघर्ष, स्वतःच्या जीवापेक्षाही ईश्वरनिष्ठा, अंतर्मनाच्या आवाजाला कुठेतरी वाट मोकळी करून देण्यासाठी ही माणसं लिहिती झाली असावीत. त्याचबरोबर जगण्याचे आणि तक्रारींचे सर्वच उपाय कुंठीत झाले आहेत, परिणामी 'आता कुणाकडे जावे ?' 'आपले कुणीच ऐकणार नाही का ?' त्या जोडीला प्रचंड संघर्ष, दुष्काळ, आप्तेष्टांचे मरण हे सगळं पाहून जीवन नश्वर आहे अशी धारणा झाल्यानंतर या लोकांनी कोण्याही मर्त्य माणसांकडे मर्त्य गोष्टींची मागणी न करता त्यांची निष्ठा जिथं आहे तिथेच जाऊन मागावे असा त्यांच्या अंतर्मनातून आवाज आला असावा, परिणामी ते लिहिते झाले आणि त्यातून हे सर्वश्रेष्ठ पारमार्थिक, निकं वाङ्मय उदयास आलं, ज्याने हजारो श्रोते-वाचकांच्या जीवनाला नवविचारांचा विशाल आयाम आणि अर्थ प्राप्त झाला !**

संतश्रेष्ठ तुकोबांच्या जीवनात भजन-कीर्तन याशिवाय दुसरी उपलब्धीच शिल्लक राहिली नव्हती. मात्र त्यांचे भजन-कीर्तन कुठेही कार्यक्रम करून किंवा कुठेतरी जनलोकात उभे राहून नव्हते, तर ते एकांतात लोकांत शोधून अंतर्मनाचा आकांत ईश्वरासमोर ठेवत असावेत. याचाच परिपाक म्हणजे

**शब्दांची रत्नें करूनी अळंकार । तेणें विश्वंभर पूजियेला ॥ 1॥**
**भावाचे उपचार करूनी भोजन । तेणें नारायण जेवविला ॥ धृ ॥**
**संसारा हाती दिलें आंचवण । मुखशुद्दी मन समर्पिलें ॥ 2॥**
**रंगली इंद्रियें सुरंग तांबूल । माथां तुळसीदळ समर्पिलें॥ 3॥**
**एकभावदीप करूनि निरांजन । देऊनि आसन देहाचें या ॥ 4॥**
**न बोलोनि तुका करी चरणसेवा । निजविलें देवा माजघरी ॥ 5॥**
(शा.अ.गाथा अ.क्र. 504)

हा अलौकिक, अप्रतिम, अनुभूतीपूर्ण अभंग होय. या सर्वोच्च अनुभूतीस्थळी पोहोचून तुकोबांच्या या अभंगातून तुकोबांचे एकांतातील संकीर्तन दृगोचर होते आहे. ही तुकोबांची सर्वोच्च मानस पूजा असून या अभंगामागील तुकोबांचा भावाविष्कार क्षितीजासम विशालकाय असून तो अणूपेक्षाही लहान भासतो आहे ! या सर्वच अवस्थेचा विचार केला असता तुकोबा पूर्णतः लोकांतातून एकांतात गेले होते हे कळते ! त्याचे कारण म्हणजे त्यांच्या ईश्वरपूजा आणि पाप-पुण्याच्या सर्वच संकल्पना वैश्विक विचारांमध्ये परिवर्तीत झाल्या होत्या हे सहजतेने लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

वर्तमानात लोक विविध सुवर्णालंकार वापरून आपल्या लौकिक श्रीमंतीचे प्रदर्शन करत असतात. तूकोबांनी आपली संपत्ती कर्जखतांच्या रूपाने लोकांना म्हणजेच ईश्वराला दान दिली आणि वेड्यासारखे ते स्वतः शब्दांचीच रत्ने घेऊन समाजमनाला स्वच्छ करण्यासाठी फुकट वाटत फिरत होते ! वर्तमानात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात सुरु असून जिकडे तिकडे आरत्या, प्रसाद आणि कार्यक्रमांची रेलचेल असतांना गणेशोत्सव म्हणजे काय ? पूजा म्हणजे काय ? आरती म्हणजे काय ? हे सगळेच मुलभूत प्रश्न बाजूला गेले असून याला केवळ उत्सव आणि फोटो शेशनचे स्वरूप आलेले आहे ! उत्सव झाला पाहिजे यात दुमत नाही परंतु गणेशाची पूजा म्हणजे काय ? हे विसरल्यास मग गणेशोत्सवाचा मूळ उद्देश दुर्लक्षित राहील, त्याच अनुषंगाने विचार होणे क्रमप्राप्त आहे. तुकोबांचे अभंग कालातीत आहेत. त्या अभंगांना जसा पारखी मिळेल तसे मूल्य प्राप्त होणार आहे.

ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या।
**जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥**
**देवा तूंचि गणेशु। सकलमती प्रकाशु।**
**म्हणे निवृत्ती दासु। अवधारिजो जी॥**

ज्ञानेश्वरी सारखा गीतेवरील सर्वोत्तम भाष्य किंवा टीका असलेला महान ग्रंथ गणेशाच्या स्तवन आणि त्याच्या अर्थापासून प्रारंभ होत असून कोणत्याही कार्यारंभी श्री गणेशाची स्तुती करून त्याच्याकडे पुढील कार्य सुरळीत पडण्यासाठी शक्ती मागितली जाते. गणपती म्हणजे अद्याक्षर ! त्याच पद्धतीने जगद्गुरू तुकोबाराय आपल्या शब्दांनीच श्री पांडुरंगाचे स्तवन करून त्याचे शब्द त्यालाच अर्पण करतात ! शब्दांनाच अक्षरब्रह्म म्हटले जाते, ते याच दृष्टीने ! या जगात केवळ शब्दच अमरत्वाचं वरदान घेऊन आले असून त्या द्वारेच आपण वैश्विक मुल्ये जसे कि; वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, दया, माया, समभाव यांची रुजवणूक, जपणूक करू शकतो.

पूजा, दर्शन, भक्ती या शब्दांना उच्च अर्थ आहेत हे आपण जाणले पाहीजे ! शुक्ल यजुर्वेदाच्या कण्व शाखेच्या संहितेचा चाळिसावा अध्याय म्हणजे ईशावास्यउपनिषदया ग्रंथात काही महत्वपूर्ण श्लोक आले असून त्याचे सुंदर विश्लेषण विनोबा भावेंनी केलेले आढळून येते. या ईशावास्य उपनिषदातील दुसऱ्या श्लोकात

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतँ् समाः।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥**

ईश्वर म्हणजे कुणी एखादी जड अथवा चेतन वस्तू-मूर्ती नसून संपूर्ण चराचरांत त्याचे अस्तित्व सामावले आहे. त्याला शोधणे किंवा त्याचे पूजन करणे म्हणजे कोणतेही बाह्य अवडंबर न करता स्वतः मध्ये त्याचे अस्तित्व पावलोपावली जाणवून घेणे म्हणजेच पूजा किंवा दर्शन होय ! वरील श्लोकाचा सरळ अर्थ म्हणजे, "ईश्वर तत्व अविचल असून ते मनापेक्षाही वेगवान आहे. ते तत्व दूर आणि जवळही नसून ते मानवी शरीरात जड-चेतन अवस्थारुपाने कार्यान्वित आहे. ईश्वर तत्व निर्मोही असून आनंद-शोक यापासून अलिप्त आहे. ईश्वर तत्व सर्वव्यापी असून ते देह रहित, स्नायू रहित, छिद्र रहित, निष्पाप आहे. ते सर्वजयी आणि चराचरांतून अभिव्यक्त होत आहे. त्याला केवळ ज्ञानाच्या



आधारेच जाणता येऊ शकते. मृत्यु-भय यापासून मुक्ती देणारे ते अखंड तत्व सर्वत्र भरून प्रवाही आहे."

ईशावास्यउपनिषदातील हा श्लोक आणि संत तुकारामांच्या वरील अभंगाचे अवलोकन केले असता, तूकोबांनी उपनिषदांतील तेच ईश्वर तत्व आपल्या अभंगातून मांडलेले दिसून येते. त्याच तत्वाला ते आपल्या जीवनातील एका एका अवस्थेला ईश्वराधीन करतात. हीच खऱ्या अर्थाने ईश्वराची मानस पूजा आहे. आपण ईश्वराचे दर्शन घेणे किंवा पूजा करणे म्हणजे कसलाही देखावा न करता आपल्या जीवनातील नश्वर तत्वांना ईश्वराधीन करणे होय ! ईश्वराला नैव्यद्य म्हणजे आपला सरळ-प्रांजळ भाव त्याला समर्पित करणे होय. त्याला याच नैव्यद्याची गरज आहे हे लक्षांत घ्यावे. आपण किती पक्वान्न केले किवा लाडू-पेढे-नारळ अर्पण केले पण आपला जीवरूपी भाव जर आपल्या भोवतालच्या लोकांत किंवा बाहेर ठेवलेल्या पादत्राणात गुंतला असेल तर तुम्ही देव दर्शन नाही स्वतःच्या खेटराचे दर्शन घेऊन मंदिरातून बाहेर याल ! म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या एका लोकप्रिय अभंगात

**मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव ।**
**देव अशानं भेटायचा नाही रे॥**
**देव बाजारचा भाजीपाला नाही रे...**

अशा परखड ओळी लिहून थोतांड, कर्मकांड, अवडंबर माजवणाऱ्या लोकांना सणसणीत चपराक देतात. त्याचबरोबर प्रस्तुत अभंगात संसाराला केवळ 'आंचवन' म्हणजेच संसार केवळ चूळ भरण्यासारखा क्षणिक व्यवहार असून त्यात जास्तकाळ अडकून बसता कामा नये. ती केवळ एक मुखशुद्धीची प्रक्रिया असून त्याद्वारे केवळ मन शुद्ध होणे अपेक्षित आहे. हे संसाराचे भोजन झाल्यानंतर जीवरूपी शिवाला शुद्ध आत्मरंगाचा तांबुल (विडा) देऊन वर एक तुळशीचे पान समर्पित केले म्हणजे संसाररूपी भोजन रुचेल आणि पचेल सुद्धा ! एवढा उच्च कोटीचा आणि शुद्ध विचार जगद्गुरू तुकोबाराय मांडत असतांना ते आपल्याला कुणी ओळखावे अथवा मानावे यासाठी आग्रही नाहीत. तरीही काही आमचे वारकरी त्यांच्या विशिष्ट नावाविषयीच का आग्रही असतील ? असा प्रश्न पडल्याशिवाय रहात नाही. तुकोबांची ही मानसपूजा आपणा सर्वांनाच अंतर्मुख करायला भाग पाडते. त्या ईश्वर तत्वाला काय हवे आहे ? शेवटी त्या तत्वाला तुकोबा आपल्या देहासनावर विराजीत करून शुद्ध-सात्विक भावाच्या निरांजनाने औक्षण करतात ! अशी मानसपूजा झाल्यानंतर तुकोबा मौनवृत्त धारण करून त्या अलौकिक ईश्वर तत्वाला आपल्या 'माजघरात' म्हणजेच हृदय सिंहासनावर शांत झोपवतात ! अगदी संतश्रेष्ठ जनाबाईंच्या

**हृदयबंदी खाणा केला । आंत विठ्ठल कोंडीला॥**

या अलौकिक भावावस्थेला तुकोबाराय सहजतेने जाऊन पोहोचतात !

खरंच, या अवस्थेला आपल्याला पोहोचता येईल का? तुकोबांची मानसपूजा आपल्याला जमेल का? असे एक ना अनेक प्रश्न माझ्यासमोर उपस्थित होतात. मात्र मला खात्री आहे की; भविष्यात माझ्यासह सर्वांचे नक्कीच तुकोबांच्या या अभंग-अनुभूतीत रुपांतर होईल ! ही अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो ! जय तुकोबाराय !

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# ‘ गौराई माझी लाडाची ...’



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**श्रावण आणि भाद्रपद हे दोन महिने गृहिणींसाठी अतिशय आनंदाचे असतात. श्रावणात रक्षाबंधन, पोळा, हरतालिका असे सण येतात तर पाठोपाठ येणारा भाद्रपद महिना गणेशाला घेऊन येऊन येतो. प्रतिवर्षी या गणेशापाठोपाठ ज्येष्ठा गौरींचेही आगमन होते. आणि अवघे घर या गौरी गणपतीच्या मंगल आगमनाने हर्षभरित होऊन जाते. ज्येष्ठा गौरी हा महिलांचा अतिशय आवडता सण. या दिवशी गौरी माहेरी येतात. गौरी म्हणजेच पार्वती. गौरी म्हणजेच साक्षात महालक्ष्मीचे रूप. गणेशापाठोपाठ येणारी गौरी म्हणजे गणेशाची आई पार्वती. कोणी त्यांना गणपतीची बहिण तर कोणी गणपतीची पत्नीही म्हणत्तात. पण नाते काहीही असले तरी गौरी म्हणजे माहेरवाशीण या गोष्टीबद्दल सगळ्यांचेच एकमत असते.**

गृहिणी वर्षभर या सणाची वाट पहात असतात. आजकाल धावपळ आणि धकाधकीच्या जीवनात पूर्वीसारखे सर्व व्रतवैकल्ये करणे कठीण आहे. शिवाय कुटुंबे लहान झाली आहेत. घरातील सदस्य आता नोकरीनिमित्त वेगवेगळे राहत असले तरी या सणासाठी सगळे कुटुंबीय एकत्र येतात. कारण ‘ गौराई माझी लाडाची..’ हे नक्कीच. म्हणून घरातील स्त्रिया किमान महिन्याभरापासून या सणाची तयारी करीत असतात. प्रत्येक कुटुंबात या महालक्ष्मीच्या परंपरा वेगळ्या आहेत. पण त्यामागील श्रद्धा, आदरभाव आणि उद्देश सारखाच. प्रेम सारखेच. जवळपास सर्वच समाजात ज्येष्ठा गौरीचे पूजन वेगवेगळ्या स्वरुपात केले जाते. काही ठिकाणी उभ्या गौरी असतात. मुखवटे मातीचे, शाडूचे किंवा पितळी असतात. तर काही लोकांकडे नदीतील पाच किंवा सात खडे आणून त्यांचे पूजन केले जाते. काही ठिकाणी तेरड्याची किंवा तुळशीच्या झाडाची गौरी म्हणून पूजा केली जाते. काही ठिकाणी धान्याच्या राशीवर मुखवटे ठेवून त्यांचे पूजन केले जाते. शेतकऱ्यांच्या घरात आलेले धान्य हे त्यांची लक्ष्मीच असते.

अनुराधा नक्षत्रावर या गौरींचे आगमन होते किंवा त्यांना आवाहन केले जाते. ज्येष्ठ नक्षत्रावर त्यांचे पूजन केले जाते आणि मूळ नक्षत्रावर त्यांचे विसर्जन केले जाते. ज्येष्ठ नक्षत्रावर पूजन होते म्हणून त्यांना ज्येष्ठा गौरी असे म्हणतात. अर्थात गौरीचे आगमन होताना ती एकटी येत नाही, तर तिच्याबरोबर तिची सखी असते. एकीला ज्येष्ठा तर दुसरीला कनिष्ठा असे म्हणतात.

गौरीला घरात आणताना घरातील दुसरी सुवासिनी किंवा कुमारिका त्या गौरी आणणाऱ्या स्त्रीच्या पायावर दूध पाणी घालतात. अक्षता टाकून त्यांना ओवाळले जाते. त्यांची प्रतिस्थापना करण्यापूर्वी त्यांना सर्व घरभर फिरवून आणले जाते. म्हणजेच घर दाखवले जाते. गौरीची म्हणजेच पर्यायाने लक्ष्मीची कृपादृष्टी आपल्या घरावर राहावी हा त्यामागील उद्देश असतो. गौरी सोन्याच्या पावलांनी येतात म्हणजेच समृद्धी घेऊन येतात. गौरीसाठी दरवर्षी नवीन साड्या घेतल्या जातात. ती माहेरवाशीण असल्याने तिला कोठलीच कमी पडू नये. तिच्या आनंदात कोणतीच उणीव असू नये हा उद्देश असतो. तिला भरजरी, काठपदराच्या साड्या नेसवल्या जातात. आणि नंतर या साड्या घरातील गृहिणी प्रसाद म्हणून नेसतात. असेच दागिन्यांचेही आहे. गौरीसाठी दरवर्षी दागिन्यात नवी भर यथाशक्ती घातली जाते. खरेच आपल्या प्रथा आणि परंपरा किती अर्थपूर्ण आहेत ! गौरीपूजनाच्या निमित्ताने गौरीसाठी म्हणून घेतलेल्या साड्या घरातील गृहिणी प्रसाद म्हणून वापरतात. या निमित्त्ताने घरातील गृहिणींचाही सन्मान होतो. त्याही घरातील लक्ष्मीच असतात. त्यांच्यामुळेच घराला घरपण येते. या दिवशी कुमारिकेला सुद्धा महत्व असते. कुमारिका ही गौरीचेच रूप समजले जाते. म्हणून घरातील मुलगी जरा नटली की आपण म्हणतो की गौरीसारखी नटलीस. गौरीसारखी छान दिसतेस.

गौरींच्या स्वागताला कोणतीही कमी ठेवली जात नाही. ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणे जो तो हा



सण साजरा करतो. घरातील लहान थोर सगळे मिळून गौरीच्या पुढे मनोहारी आरास करतात. त्यांच्यासाठी निरनिराळे पदार्थ बनवले जातात. पहिल्या दिवशी साधे जेवण असते. भाजी भाकरीचे. अंबाडी, शेपू किंवा मेथीची भाजी आणि भाकरी असा बेत असतो. दुसऱ्या दिवशी मात्र पुरणपोळीचा आणि सोळा भाज्यांचा नैवेद्य दाखवला जातो. जेवण झाल्यावर गौरीला ‘ गोविंद विडा ‘ दिला जातो. तो सोळा पानांचा असतो. याशिवाय काही ठिकाणी दिवाळीच्या फराळाच्या पदार्थासारखे अनेक पदार्थ करतात. गौरी ही माहेरवाशीण असल्याने तिला आपल्या आवडीचे पदार्थ खाण्यास मिळावे हा उद्देश असतो. त्यानिमित्ताने आपणही ते पदार्थ प्रसाद म्हणून भक्षण करतो. या दिवशी सवाष्णीला बोलावून जेऊ घालतात. तिची ओटी भारतात. संध्याकाळी स्त्रिया हळदीकुंकू करतात. झिम्मा फुगडीसारखे खेळही खेळतात. गाणी म्हणतात. अत्यंत आनंद आणि उल्हासाचे वातावरण असते. दुसऱ्या दिवशी जेव्हा महालक्ष्मीचे पूजन होते, साड्या नेसवल्या जातात तेव्हा त्यांच्या मुखावर एक वेगळेच तेज, वेगळीच प्रभा झळकत असते. ते पाहून घरातील मंडळीना आणि गृहिणींना कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. तुकोबांच्या शब्दात सांगायचे तर ‘ याचसाठी केला होता अट्टाहास..’ घरातील सदस्यांच्या मनातील भाव जणू त्यांच्या मुखावर प्रतिबिंबित होतात. भाव तसा देव असे आपण म्हणतो ते खरेच आहे. पहिल्या दिवशी त्यांच्या मुखावर माहेरी आल्याचा आनंद, दुसऱ्या दिवशी माहेरचा पाहुणचार घेतल्याने येणारे तेज झळकते आणितिसऱ्या दिवशी म्हणजे विसर्जनाच्या दिवशी त्यांचे मुखमंडल काहीसे म्लान भासते. कारण त्या पुन्हा सासरी जाणार असतात. त्या दिवशी घरातील सदस्यांच्या सुद्धा डोळ्यांच्या कडा ओलावतात.

राक्षसांपासून आपल्या सौभाग्याचे रक्षण व्हावे म्हणून देवतांनी श्री महालक्ष्मीला साकडे घातले होते. महालक्ष्मीने राक्षसांचा वध करून देवताना सौभाग्य प्रदान केले. आपलेही सौभाग्य अखंड राहावे म्हणून स्त्रिया महालक्ष्मीचे मनोभावे पूजन करतात. एक कथा अशीही आहे की नरांतक नावाच्या राक्षसाने एकवीस हजार स्त्रियांना बंदी बनवले होते. गणपतीने त्यांना सोडवण्यासाठी रिद्धी, सिद्धी आणि त्यांच्या मैत्रीणीना एकत्र आणून त्यांची सेना तयार केली. आणि तो सेनानायक बनला. नरांतकाशी भयंकर युद्ध झाले. या युद्धात गणपतीने त्याचा अंत केला. या युद्धात सात स्त्रियांनी विशेष पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याची आठवण म्हणून सात खडे आणून त्यांची पूजा करण्याची पद्धत पडली असावी.

अशा या गौरींचे आज आगमन होते आहे. तुमच्या आमच्या घरात गौरींचे सोनपावलांनी आगमन होवो आणि त्या सुखसमृद्धी घेऊन येवोत ही त्यांच्या चरणी प्रार्थना !

# "नैना बरसे रिमझिम रिमझिम..."

आधुनिक केसरी

**चांदव्याचा प्रकाश आपल्या गजऱ्यात माळून आपल्या मनातल्या प्रियकराला, 'तेरा मेरा प्यार अमर...' ऐकवणारी 'असली नकली'तली सालस, सोज्वळ रेणू, आणि तिचे ते टप्पोर पाणीदार डोळे, लोभस हासू आणि चांदव्याहून गोड नाजूक चेहरा... यातलं, नक्की काय सुंदर होतं? मला तर ते सौंदर्य म्हणजे मधुघट वाटतात अमृतरसाचे!**




साधना हे नुसतं नाव जरी ऐकण्यात आलं, तरी आमच्या फैजपूर गावचं श्रीराम सिनेमा थियेटर नकळतपणे माझ्या डोळ्यांसमोर उभं राहातं. साधना मनात भरली ती तिथंच! जेमतेम पंधरा वर्षांचा असेल मी तेव्हा. लंगोटी यार राजू, किशोर, सुरेश, बालू यांच्यासोबत १९७४ला मी तिचा 'आरजू' श्रीराम थियेटरमध्येच पाहिला होता. आमच्या राजूला त्यावेळी साधनाने वेड लावलं होतं.
राजूलाच काय; खरं सांगायचं झालं तर साधनाच्या सौंदर्यानं वेडा न झालेला रसिक त्यावेळी शोधूनही सापडला नसता. मित्रांसोबतचे ते उनाड दिवस काळजाच्या गाठोडीत असे काही जावून बसले की, गाठोडं केव्हाही सोडलं तरी त्यातल्या आठवणी मनाला तोच तो सतरंगी आनंद देवून जातात.
शेजारच्या; चार कि. मी.वर असलेल्या सावदा या गावी आम्ही पाच, सहा मित्र रात्री ९ते १२ चा शो बघायला जायचो. चांगले आणि गाजलेले सिनेमे तिथल्या कमल थिएटरला आधी लागायचे. खरं तर, सावद्याच्या त्या रस्त्यावर फटाका नाला या एके ठिकाणी रात्रीच्या वेळी भुता-खेतांची भीतीही वाटायची. तरी जायचो सायकलींवर. सीट, डबल सीट, शौकच तेवढा तगडा होता !
आमच्या गावचं थियेटर एवढं काही पॉश नव्हतं. बाल्कनीत होत्या बऱ्यापैकी मऊ खुर्च्या, स्टॉलमध्ये मात्र शाळेतल्यासारखे लाकडी बेंच असायचे. त्यासोबत ढेकणंही असायची आंदण म्हणून! पण तरीही तेव्हाचे सिनेमे आम्ही 'चवीनं' पहात असू! इंटरव्हलमध्ये भग्या भाऊंचे १०/१५ पैशाचे चणे घ्यायचो. भट्टीवर शिजवलेले रस्सा असलेले मसाला चणे इतके काही छान लागायचे की, त्यांची चव आठवून तोंडाला आजही पाणी सुटतं. आता वाटतं, ती चव नुसतीच चण्याची होती? का आमच्या कुमार स्वप्नांना पंख देणाऱ्या त्या सुवर्णकाळाची ?
कधी कधी रात्रीचा शो पाहिल्यानंतर घरी परतताना गल्ल्यांमधील खाटेवर झोपलेल्या माणसांचे घोरण्याचे चित्र-विचित्र आवाज ऐकायला यायचे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये बहुतेक माणसं तेव्हा अंगणातच खाटा टाकून झोपायची. घर लहान, मुलं जास्त! घर आलं की गल्लीतले कुत्रे आम्हाला अंधारातही बरोबर ओळखायचे. पायात घुटमळायचे. चाहूल लागून, 'आला रे..' बाबाही झोपेतच बरळल्यासारखे म्हणायचे. बाजूच्या रिकाम्या खाटेवर आडवं व्हायच्या आधी, मायनं ठेवलेल्या मडक्यातलं गार पाणी प्यायला हात आपसूक खाटेखाली जायचा. ग्लासभर पाणी प्याल्यावर खाटेवरल्या वाकळवर द्यायचं अंग सोडून! मायच्या कुशीतच झोपल्यासारखी वाकळही छान उब द्यायची. मायच्याच लुगड्याची ना! खाटेवर पडल्या पडल्या मग, मोजता न येणाऱ्या त्या चांदण्यात शुक्राचा तारा शोधता शोधता सिनेमात पाहिलेल्या नटीचा चेहरा फेर धरायचा.
जाणत्या-अजाणत्या त्या वयात पाहिलेली 'आरजू'तली साधना तीही अशीच जावून बसलीये मनाच्या सांदी कोपऱ्यात! पहेलगामच्या नजाऱ्यावरही मात करणारा तिचा तो नुरानी मुखडा... मोठ्ठ्याशा माळरानावर श्वेत सलवार-कमीज घालून गाणं गात विमनस्क भटकणारी ती, अन विरह रसात भिजलेलं लताचे 'बेदर्दी बालमा...' चे ते कातर स्वर... व्वा! सॅल्यूट करावा वाटतो हे




गाणं लिहिणाऱ्या, गाणाऱ्या, संगीत देणाऱ्या आणि दिग्दर्शन करणाऱ्या सगळ्याच दिग्गज कलाकारांना! साधनाने तर आपल्या जबरदस्त अभिनयाने हे गाणं चिरंजीवच करुन टाकलंय. असं म्हणतात की, हसरत जयपुरींनी हे गाणं कश्मीरमधील त्या स्पॉटवर जावून लिहिलं होतं. 'आरजू'तलं साधनाचं प्रेयसीचं रुप आम्हाला इतकं भावलं होते की, हा चित्रपट तेव्हा आम्ही लागोपाठ तीन दिवस पहिला होता.
साधनाचं रुप मला सर्वात जास्त भावलं ते कृष्ण-धवल चित्रपटांत. ती कोणत्या चित्रपटात जास्त सुंदर दिसलीये हे सांगणं मात्र कठीणय. सौंदर्याची परिभाषा म्हणजे निव्वळ बांधेसूद देह, दाग दागिने वा उंची पेहराव हे अजिबातच नाही. अभिजात सौंदर्य हे या सगळ्यांच्या परे असतं. 'हम दोनों'तलं आजवरलं ते सगळ्यात रोमँटिक, हळुवार गाणं - 'अभी ना जाओ छोड़कर...' हे साधनाशिवाय कुणी विचार करू शकेल? क्षणाक्षणाने बदलणारे तिचे ते अप्रतिम भाव आणि देहातून उद्धृत होणारी तरल स्पंदन, एखाद्या अस्सल प्रेयसीलाही अभिनीत करता येणं शक्य नाही.
चांदव्याचा प्रकाश आपल्या गजऱ्यात माळून आपल्या मनातल्या प्रियकराला, 'तेरा मेरा प्यार अमर...' ऐकवणारी 'असली नकली'तली सालस, सोज्वळ रेणू, आणि तिचे ते टप्पोर पाणीदार डोळे, लोभस हासू आणि चांदव्याहून गोड नाजूक चेहरा... यातलं, नक्की काय सुंदर होतं? मला तर ते सौंदर्य म्हणजे मधुघट वाटतात अमृतरसाचे! कधी कधी डोक्यात येतं, साधनाला घडवताना तो विधाता बावरला कसा नाही?
गावच्या जत्रेत आपल्या मदभऱ्या अदांसोबत, हातात खंजिरी घेवून डफ आणि ढोलकीच्या तालावर गिरक्या घेत घेत, 'झुमका गिरा रे...' म्हणणारी 'मेरा साया'तली निशा, आणि 'नैनों में बदरा छाये...' गाणारी 'मेरा साया'चीच करारी गीता, हजारों चाहत्यांना आजही वेड लावीत आहे. 'मेरे मेहबूब'ची पर्दा नशी हुस्ना, 'आरजू' तली उषा, 'वक्त'मधली मीना... साधनाच्या सगळ्याच तर रुपांनी मोहिनी घातली होती आम्हा रसिक चाहत्यावरती !
कराचीतल्या एका सिंधी कुटुंबात ०२ सप्टेंबर १९४१ला साधनाचा जन्म झाला होता.
फाळणीनंतरच्या दंगली दरम्यान साधनाचं कुटुंब मुंबईला राहायला आलं. आपल्या आई-वडिलांची एकुलती एक असलेल्या साधनाचं बालपण तसं लाडातच गेलं. अभिनेत्री नुतन ही साधनाची प्रेरणास्थान होती. वयाच्या १५व्या वर्षी १९५५ला आलेल्या राज कपूर, नर्गिसच्या 'श्री ४२०' मधील 'मूड मूड के ना देख...' या गाण्यात ती कोरस गर्ल होती. त्या नंतर १९५८ला आलेल्या 'अबाना' या सिंधी चित्रपटात साधनाने नायिकेच्या (शीला रमाणी) धाकट्या बहिणीची भुमिका केली होती. बऱ्यापैकी हिट झालेल्या या चित्रपटाचा रिविव्ह तेव्हा एका फिल्मी मासिकात छापून आला होता. त्या रिविव्हसोबतचा साधनाचा फोटो पाहून त्यावेळीचे हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे निर्माते, शशाधर मुखर्जी यांनी साधनाला लागलीच 'लव इन सिमला'च्या मुख्य भुमिकेसाठी साईन केलं. सिने क्षेत्रात नवीनच पदार्पण करणारा त्यांचा मुलगा, जॉय मुखर्जी या त्या चित्रपटाचा नायक होता. विशेष म्हणजे या चित्रपटाचे निर्देशक आर. के. नय्यर हे सुद्धा त्यावेळी नवीनच होते. 'लव इन सिमला'च्या यशाने साधना रातोरात स्टार झाली आणि आर. के. नय्यरच्या प्रेमातही पडली. त्यावेळी ती अवघी सतरा वर्षांची होती.
साधनाच्या यशस्वी चित्रपटांचा आलेखच इतका बोलका आहे की, बावीस तेवीस वर्षांच्या आपल्या कारकिर्दीत तिने तेहतीस चित्रपटांत भुमिका साकारल्या आणि त्यातले सत्तावीस हिट झाले. 'परख', 'हम दोनों', 'प्रेमपत्र', 'मनमौजी', 'असली नकली', 'मेरे मेहबूब', 'वह कौन थी', 'वक्त', 'मेरा साया', 'एक मुसाफिर एक हसीना', 'राजकुमार', 'ग़बन', 'आरजू', 'बद्तमीज', 'अनिता' साधनाच्या कसदार अभिनयाने नटलेले हे सगळे चित्रपट कर्णमधुर संगीत आणि अर्थपूर्ण गाण्यांमुळे तुफान गाजले.
साधना ही भारतीय सिनेमातील पहिली अभिनेत्री होती जिने १९६५ला आलेल्या 'वक्त' या मल्टी स्टारर चित्रपटापासून घट्ट चुडीदार-कुर्ता या पेहरावाचा ट्रेंड सुरु केला. तिचं रुंद कपाळ झाकण्यासाठी आर. के. नय्यर यांनीच ऑड्रे हेपबर्नच्या केशरचनेवरुन तिची हेअर-स्टाईल केली होती. पुढे जावून ती हेअर-स्टाईल साधना कट म्हणून फेमसही झाली. तिचे बहुतेक चित्रपट कथानक आणि त्यातील अप्रतिम संगीतासाठी ओळखले जातात. मात्र दिग्दर्शक राज खोसला यांना साधनाच्या चेहऱ्यात एका क्षणी गुढ़ता जाणवली आणि पुढे जावून तीच त्यांनी 'वह कौन थी'मध्ये वेगळ्या रुपात सादर केली. 'वह कौन थी' प्रचंड गाजला. 'नैना बरसे रिमझिम रिमझिम...', 'जो हमनें दास्ताँ...', आणि 'लग जा गले...', इतक्या वर्षांनंतरही ही सगळी गाणी कालातीत असल्यासारखी आजही वाजताहेत. अर्थात; राजा मेहंदी अली खान यांचे आशय संपन्न शब्द, मदन मोहन यांचं श्रवणीय संगीत आणि राज खोसलांचं खिळवून ठेवणारं निर्देशन हे सगळंच 'वह कौन थी'ला अभिजात चित्रपटांच्या श्रेणीत घेऊन गेलं.
आपल्या वडिलांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच साधनाने १९६६ला आर. के. नय्यर यांच्याशीच लग्न केलं. संसारात ती छान रमली सुद्धा! एक वेळ तर असं वाटायला लागलेलं की, चित्रपटसृष्टीतून ती निवृत्त होते की काय? मात्र नवऱ्याला आलेल्या आर्थिक अडचणींमुळे तिला पुन्हा या क्षेत्राकडे वळावं लागलं. आपल्या पाक कौशल्यासाठी सुद्धा ती परिचित होती. थॉयराईडच्या आजारामुळे पुढे तिच्या डोळ्यांवर परिणाम झाला. उपचारासाठी ती बोस्टनला जावूनही आली. त्यानंतरही आलेल्या 'इंतकाम', 'एक फुल दो माली' आणि १९७४साली बॉक्स ऑफिसवर हिट ठरलेला 'गीता मेरा नाम' या चित्रपटांतल्या तिच्या भुमिकांचं कौतुक झालं.
एक अभिनेत्री म्हणून सुरु केलेली आपली कारकीर्द तिला अभिनेत्रीवरच संपवायची होती. त्यामुळे १९७४नंतर पुढे कोणतीही चरित्र भुमिका न स्विकारता तिने चित्रपटसृष्टीतून कायमची निवृत्ती घेतली. पुढे काही वर्ष आपल्या नवऱ्याच्याच कंपनीत काम केलं. बॉलीवूडचा सुवर्णकाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १९६०च्या दशकातली सर्वांत लोभस आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीच नाही तर, सर्वात जास्त मानधन घेणाऱ्या नायिकांपैकी साधना एक होती. एकोणीसशे साठ आणि सत्तरचं दशक हे जसं तिच्या उत्कृष्ट अभिनयासाठी ओळखलं जातं, तसंच त्या दोन दशकात गाजलेल्या हिंदी चित्रपटांसाठी सुद्धा!
साधनाला मिळालेली गाणी सुद्धा इतकी मधुर-मदिर होती की, कुठलं आठवावं आणि कुठलं नाही! 'ओ सजना बरखा बहार आयी...', परख / 'मैं तो तुम संग नैन मिला के...' मनमौजी / 'आ जा आयी बहार दिल है...' राजकुमार / 'कौन आया की निगाहों में...' वक्त / 'नैनों में बदरा छाये...', 'तू जहाँ जहाँ चलेगा...' मेरा साया'. कित्ती अशी गाणी आहे ज्यावर साधना आपल्या अभिनयाचा अमिट ठसा उमटवून गेलीये. एकोणतीस वर्षांच्या सुखी सहजीवनानंतर १९९५ला झालेल्या आपल्या नवऱ्याच्या निधनामुळे साधना एकाकी झाली आणि एकटीही पडली. तरी कुठल्याही प्रसिद्धीचा सोस न ठेवता उर्वरित आयुष्याला ती सामोरी गेली.
राज खोसला दिग्दर्शित देव आनंद सोबतचा 'साजन की गलियाँ' हा तिचा चित्रपट कधी पूर्ण होवू शकला नाही. तिला मिळालेले पुरस्कार म्हटले तर, 'वह कौन थी' आणि 'वक्त' चित्रपटांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून दोन वेळेस तिचं 'फिल्म फेअर' पुरस्कारांसाठी तिचं नामांकन झालं होतं. आणि तिने दिलेल्या अभिजात चित्रपटांसाठी २००२या वर्षीचा 'आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमी'चा पुरस्कार तिला मिळाला होता. उतारवयात झालेल्या कर्करोगामुळे २५ डिसेंबर २०१५ला ऐन ख्रिसमसच्या दिवशीच साधनाने या जगाचा निरोप घेतला.
अजूनही; एखाद्या कातरवेळी वाटून जातं - साधना कुठंच गेली नाहीये, ती इथंच आम्हा रसिकांच्या आसपासच आहे. आणि याची साक्ष देण्यासाठीच की काय, कधी कधी झाडापानांतून, पावसाच्या सरीसरींतून ती मला बरसताना दिसते. तर कधी आम्हा रसिकांच्या आवडीचं -
'नैना बरसे रिमझिम रिमझिम...' गाताना दिसते.

**संदर्भः विकिपिडीया, यु-ट्युब, इंटरनेट मुव्ही डेटाबेस.**

## लग्न मुलाचे होईल का...?



आठवतो मज काळ पुर्वीचा,
लग्न मुलीचे होत नसे ।
किती झिजववले उंबरठे तरी,
मुलगा शोधुन मिळत नसे ।
कुठे मिळाला एखादा तर,
वरबापाच्या खुशामती ।
तोंड वाकडे करुन त्याने,
बळे म्हणावे व्हा पुढती ।

अमर्याद तो हुंडा आणि,
लग्नासोबत अंदन ही ।
किती लागले वधु पित्याने,
सहन करावे चंदन ही ।

पुन्हा म्हणावे पदर पसरुनी,
चुकभूल ही माफ करा ।
लेक समजुनी तुमची आता,
नीट तिचा सांभाळ करा ।

गोरी असावी नाजुकसी ती,
तना मनाने अधु नको ।
ऐटीत तेंव्हा मुले बोलती,
मजला ऐशी वधु नको ।

काळा सोबत चित्र बदलले,
मुलीची संख्या होतेय कमी ।
आता मुलाच्या लग्नाची हो,
कोण कशी देईल हमी...?

गावो-गावी आता आढळती,
बिन लग्नाची खूप मुले ।
दुर्मिळ झाल्या मुली मुलांना,
वनवासाचे दिवस आले ।

सिथील झाल्या सर्व अटी अन,
सिथील झाले वर ही आता ।
फिरु लागले बाप मुलांचे,
शोधायाला वधूपिता ।

असे जरी ती काळीसावळी,
उंच असो की खुजी असो ।
मुली वाचुनी दुसरे द्याया,
बापा जवळी काही नसो ।

तरीही मुलाचे बाप बोलती,
करून घेतो मी सारे ।
तुज खर्चाची नको काळजी,
फक्त तुझी मुलगी दे रे ।

सापडले जर स्थळ एखादे,
हजार त्यांच्या अटी परी।
ऐकुन सारे असे वाटते,
भीक नको कुत्रे आवरी ।

जॉब असावा पर्मनंट अन,
त्यास स्वतःचा फ्लॅट हवा ।
दारी असावी फोरव्हीलर अन्,
मुलगा मात्र एकुलता ऐक हवा ।
किमान त्याला वर्षाकाठी,
हावे आठ लाखाचे पॅकेज तरी ।
आणि नसावी जास्त माणसे,
घरात कोणीही दुसरी ।

गर्भातच मारीले मुलीला,
त्याचा हा परीनाम घडे ।
कृत कर्माची बाधा भवली,
भोग राहीला उभा पुढे...।

तुम्हीच सांगा असे वागुनी,
पुन्हा काळ तो येईल का...?
घर चालत हो ठिकाण येवुन,
लग्न मुलाचे होईल का...?
लग्न मुलाचे होईल का.....??

-अशोक मिरगे, (नि.ना.तहसीलदार),
मु. पो. ता.अंबाजोगाई, जि. बीड,
मो. 9421278312.

## भजन गणेशाचे



विनायका रे जगउद्धारका, अधिनायका गणराया ।
सुखदायका तू स्वामी अनंता, नेशी वाहूनी दुःख विलया ।।1।।

गजानना जय गजानना, मूषक आरुढा गजानना ।
गजानना जय गजानना, मूषक आरुढा गजानना ।।
ईशानपुत्र, गौरीसूत, पती गणांच्या महेश्वरा ।
वंदितो प्रथम बुद्धीदैवता, श्रेष्ठ कलांच्या ईश्वरा ।।
हो श्रेष्ठ कलांच्या ईश्वरा ।।2।।

गजकर्णा,धूम्रवर्णा, विश्वविनायक पिंगाक्षका ।
सुखदाता, दुःखत्राता, नमो तुज विघ्ननिवारका ।।
नमो तुज विघ्ननिवारका ।।3।।

गजानना जय गजानना, मूषक आरुढा गजानना ।
गजानना, जय गजानना, मूषक आरुढा गजानना ।
जलधी, वारा, शशी, रवी, हे दास तुझे हो पूजती ।
संकट हारुनी करसी मंगल, नमन तुजला मंगलमूर्ती ।।
नमन तुजला मंगलमूर्ती ।।4।।

एकदंत हो, लंबकर्ण हो, चर्चीत सेंदूर भाळावरती ।
भजती ज्याला तिन्ही लोकही, धन्य रिद्धीसिद्धिच्या पती ।। 5।।

रूप सुंदर, ध्यान मनोहर, अनं मोदक मधुर हाती ।
लंबोदर, दुर्वांप्रिय हरे, जय जय जय गणपती ।।
हो जय जय जय गणपती ।। 6।।

सोंड सरळ, त्रीनेत्र अनं चंदन उटी लल्लाटी ।
चिंतावाहका, चिंतामणी तु, उभा भक्त रक्षणा पाठी ।।7।।

सृष्टीपालक रे, तुही मालकं,तुज नमितो मनोमना ।
प्रथम वंदू प्रथमेश्वरा, जय गणपती नारायणा ।।
जय गणपती नारायणा ।।8।।

गजानना जय गजानना, मूषक आरुढा गजानना ।
गजानना जय गजानना, मूषक आरुढा गजानना ।।

-मनिष आहिरे, 7588069679

## हंस

आठवेना आम्हाला, आम्हीच कोण होतो
हात सोडता कशाला? अंधार जीव घेतो...

ते कालचे पूजारी, आम्हां ठोकतील बेड्या
पक्षी उडून जाता, राहील काय वेड्या...?

छल कपट कारस्थानं, त्यांची जमात मोठी
पोटात पाप आणि, मंत्रोच्चार घेत ओठी...

कमळ चिखलात नाही, शुद्ध पाण्यात येते
निळ्याशार आभाळाचे, स्वछंद गीत गाते...

का एवढा दुरावा? वाऱ्यावर उडल्या पाली
पोटात येक ओठात येक, वेस घट्ट झाली...

गावी कशी अंगाई, या मृत महोत्सवाची..?
हंस उडाला तहानेने, घाई काकड आरतीची...

मज माहित झाले आता, काव्य नसते क्रांती
मौन स्तब्धतेच्या दारी, तेवत ठेवते पणती...

काळ असा का खातो, साप टाकतांना कात
माता विचारत आहे, आपल्या मुलाची जात...

डोळ्यात अमृत धारा, मी फोडलाय टाहो
अविश्वासाने माता, पोरास मारते का हो..?

- राम कोत्तापल्ले

## माणुसकी



माणुसकीच्या जगात,
अमानवी कृत्य तयार,
शहारे अंगावर,
किंचाळयाच्या.

सध्याच्या स्थितीत,
भाऊ-भाऊ वैरी,
वृंदावन दारी,
कधीकाळी.

कमाई किती,
तब्येत बाजूला झाली,
पैशाने रंगली,
माणुसकी.

प्रेमाचे बघा,
खाटावर सजून रंगले,
प्रेम हरपले,
हवसेत.

लक्षात ठेवा,
तिरडीवर पैसा नाही,
गरज मानसाचीही,
मरताना.

-मयुरी प्रधान
विक्रोळी, मुंबई

## गौराई आगमन



गौराई आज माझी
येईल सोनपावलांनी
सजवते अंगण मी
सडारांगोळ्यानी...

ओवाळीते गौराईस
हळदकुंकू लावून
टाकते पाऊल आत
सुखसमृद्धी घेऊन...

गणराया सोबत तु
बहिण, भावाचा मान
खाऊंन भाजी भाकर
वाढे आमुचा सन्मान...

सासुरवाशिणी आनंदात
माहेरी गाणी गातात
आला गौरी, गणपती सण
सुखात चिंब नहातात...

पुरणपोळीचा प्रसाद
तुला असे खास
गौरी, गणपती जाताच
संपतो भाद्रपद मास...

-सीमा मंगरूळे
तवटे वडूज सातारा

## भिकारी...!



पुरे झाले ईश्वरा आता
रोजचे केविलवाणी जगणे,
रोज दारोदारी जाऊन
लाचारीने भीक मागणे.

थकलेल्या पायांना सरळ
वाट ही मिळत नाही,
जन्म-मरणाचे अंतर
आयुष्यभर कळत नाही.

नशीबाने चढविला
अंगात भिकाऱ्याचा साज,
हातात कटोरा घेऊन
केविलवाणी देतो आवाज.

भिक्षा मागतांना होतात
कोरडे पडलेले ओठ,
भूक लागल्याने पाहतो
पाठीला भिडलेले पोट.

भिकाऱ्यांच्या स्वप्नांचे रोज
ऱ्हदयामध्ये जळते सरण,
लाचारी जीवन जगतांना
पाहतो रोजचेच मरण...!

अय्युब पठाण लोहगांवकर
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## साहेब




आमचीही होऊ द्या एकदाची
ती E.D चौकशी ...
हजारो रुपये शेतीत ओतून
शेतातच सडणाऱ्या शेतीमालाची

होऊन जाऊ द्या एकदाची
बोगस बियाणे वाटणाऱ्या दानवांची
साठेबाजार करून रक्त पिणाऱ्या सैतानांची
E.D चौकशी करा त्या विमा कंपन्यांची

बियाणे बोगस, त्यातच नवीन व्हायरस
दुकानात लगेच औषधेही सज्ज
सर्वच करताय शेतकऱ्याचा ह्रास
यांचीही करा E.D चौकशी महाराज

रात्रंदिन राबून शेतकरी माझा उपाशी
बाकीच्याचा होतंय माडीवर माडी
गोडवून मध्ये जाता माल, वाढतात भाव
याचीही एखादी चौकशी करा की राव

एखादी चौकशी करा आमचीही
तोट्यात एकमेव उद्योग करणाऱ्या राज्याची
अन्नाला मोताल झालेल्या अन्नदात्याची
बेहाल झालेल्या शेतकऱ्याची...

-संदिप वाकडे पाटिल
रा. खेडा, ता. कन्नड,
जि. औरंगाबाद, मो. 9766992776

## राष्ट्रध्वज - तिरंगा



22 जुलै, 1947
विशेषता सुदिनाची
राष्ट्रध्वजास मान्यता
संविधान समितीची
ही तिरंग्याची शान
स्मरणात राहील चिरकाळ
श्वासा-श्वासात असे
क्रांतिकारकांचा भूतकाळ
नसानसात आमच्या
राष्ट्रध्वजाचा मान
गुलामीच्या जोखडात
होता देश महान
गातो आम्ही सदैव
स्वातंत्र्याची गाथा
अभिमानाने फुलून
उन्नत आमुचा माथा
स्वातंत्र्य निशाणास वंदन
राष्ट्रध्वजाचा अभिमान
बलिदान न जावो व्यर्थ
जगात भारत राष्ट्र बलवान
एक राष्ट्र, एक ध्वज
अनेकतेत एकता
जातीभाव विसरूनिया
सकलास कळों मानवता
राष्ट्रध्वजास करू वंदन
मज थोर आशीर्वाद दे
उंच फडकत ठेवू सदा
मज एकच वरदान दे
राष्ट्रभक्तीचे वेड तयांना
मातृभूमीचा ध्यास
असंख्य संकटे झेलून
सफल जीवन प्रवास
शत शत प्रणाम करितो
भारतमातेच्या सुपुत्रांना
स्वातंत्र्याच्या महोत्सवी
कृतज्ञतेची मानवंदना
-सौ शुभांगी हेमंत पांगरकर,
औरंगाबाद




# सिद्धिविनायक मंदिर, कर्णपूरा

आधुनिक केसरी



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

औरंगाबादच्या धावपळीच्या जीवनापासून कर्णपुरा परिसर आजही आलीप्त... शांत.. प्रसन्न आहे. हा संपूर्ण परिसरात कर्णपुरात देवीच्या आणि सिद्धिविनायक गणेश मंदिरामुळे पवित्र झालेला आहे. त्यामुळेच या परिसरात गेल्यावर मन शांत.. प्रसन्न होऊन जातं हेच खरं.

सरदार करण सिंहाचा हा करणपुरा 52 पुरांपैकी एक होय. याच करण पुऱ्यात सरदार करणसिंह महाराजांनी तुळजाभवानीचे उपस्थान म्हणून असणाऱ्या भवानी मातेची प्रतिष्ठापना केली. कर्णपुरा देवीस त्यानंतर मोठी प्रसिद्धी मिळाली. त्या देवीच्या मंदिराच्या बाजूलाच गणपतीची छोटी मूर्ती होती. त्यावेळी मंदिरातील तरुण मुलांच्या प्रयत्नातून गणपतीच्या छोट्या मंदिराची स्थापना करण्यात आली. कर्णपुरा देवीच्या परिसरात अन्य देवतांची मंदिरे आहेतच.. पण गणपतीचे स्वतंत्र मंदिर असावे अशा संकल्पनेतून या मंदिराची स्थापना 1988 साली करण्यात आली.



तरी हे मोठे भव्य दिव्य असे सिद्धिविनायकाचे मंदिर उभे राहावे अशी मनामध्ये ओढ असणारी तरुण मंडळी एकत्रित आली त्यांनी मंदिर ट्रस्टची स्थापना केली. त्यांच्या अर्थ प्रयत्नातून आज भव्य दिव्य दिसणारे सिद्धिविनायकाचे हे मंदिर उभे राहिले.

कर्णपुरा देवीच्या बाजूस निसर्गाच्या सानिध्यात उभ्या असणारे हे सिद्धिविनायक संस्थानाचे गणपतीचे मंदिर पश्चिम महाभिमुख आहे. गणपतीची मूर्ती संपूर्ण शेंदूर वर्णीय असून ती फूट उंचीची आहे. गणपतीच्या समोरच उंदराची ही काळ्या पाषाणाची सुंदर मूर्ती आहे. मंदिराच्या पुजाऱ्यांच्या वतीने मंदिरात रोज सकाळी व रात्री साडेसात वाजता पूजा आरती केली जाते. गणेशोत्सवाच्या संपूर्ण दहा दिवसाच्या कालावधीत आणि नवरात्र उत्सवातही गणेश यागाचा यज्ञ या मंदिरात केला जातो. होम हमानाच्या कार्यक्रमानंतर मोठा प्रसाद सर्व भक्त जणांना देण्यात येतो. सिद्धिविनायकाच्या मंदिर ट्रस्ट तर्फे इतरवेळी गोरगरिबांसाठी त्यांच्या मंगल कार्यासाठी मोठी मोलाची मदत केली जाते. त्याचबरोबर मंदिराच्या पैशातून निधीतून सीमेवर लढणाऱ्या आपल्या सैनिकांनाही प्रत्येक वर्षी वीस ते पंचवीस टक्के निधी देण्याचा मंदिराचा संकल्प आहे.असे मंदिर समितीने आम्हाला सांगितले.

कर्णपुरा देवीच्या बाजूस असणारे हे सिद्धिविनायक मंदिर गणेश भक्तांचे श्रद्धास्थान झालेले आहे. त्यामुळे गणेश चतुर्थी.. गणेश जयंती.. संकट चतुर्थी.. अशा दिवशी गणेश भक्तांची या परिसरात रीघ लागलेली असते. ती एका आत्मिक ओढीनं. कर्णपुरातील ही सिद्धिविनायकाची शेंदूर वर्णीय भावपूर्ण मूर्ती तिचे ते प्रसन्न भाव ते डोळे दर्शन घेणाऱ्या प्रत्येक भक्ताला आत्मिक समाधान.. सुख.. शांती.. देऊन जातात हेच खरं...

# Family man (1 & 2)

आधुनिक केसरी

**अलीकडे वेबसिरीज पाहण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यांना सेन्सॉरशिपच्या अटी वा बंधने नसल्यामुळे त्यांमध्ये भरपूर प्रमाणात हिंसेचे प्रसंग, शिवराळ भाषा, सेक्सची दृश्ये असतात. बहुधा डिटेक्टिव्ह किंवा गुन्हेगारी कथांवर या सिरीज आधारलेल्या असतात. इंग्लिश, हिंदी व इतर प्रादेशिक भाषांतही अशा सिरीज बनत आहेत. उत्तर वा मध्य प्रदेश येथील जमीनदार किंवा राजकारणात असलेले एकत्र कुटुंब, त्यांची अवैध व बेकायदेशीर कृत्ये, कुटुंबातली बिघडलेली नाती, गुन्हेगारी संबंधांच्या कथा अनेकदा अशा सिरीजमध्ये दिसल्या आहेत. काही थोड्या कौटुंबिक कथाही होत्या. पण त्यांना फारशी प्रसिद्धी मिळालेली नाही.**

अशा सर्वांमध्ये वेगळी व सध्या गाजत असलेली प्राइम ॲमेझॉनवरची 'द फमिली मन' ही सिरीज तुफान लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. पहिल्या सीझनचे बरेचसे शूटिंग मुंबई, दिल्लीत आणि थोडेफार पाकिस्तान, बलुचिस्तान व काश्मीर इथले आहे. २०१९ साली आलेल्या या सिरीजच्या पहिल्या भागात आधी कळते ती श्रीकांत तिवारी आणि जेकेची मैत्री. ते दोघे एकाच खाजगी संस्थेत काम करतात व एकमेकांना अंतर्बाह्य ओळखत असतात. तपासाच्या मोहिमा ठरवताना, दूरचे प्रवास करताना, हॉटेलमध्ये खाताना, फोनवर बोलताना असे अनेक मजेदार किस्से त्यांच्यात नेहमी घडत असतात. एकमेकांच्या कुटुंबांची काळजी करणे आणि त्यावरून चिडवाचिडवी व भांडणेही होतात, तीही मस्त मनोरंजक आहेत.

सिरीजचे स्क्रिप्ट इतके तंतोतंत आणि जलद पुढे जात राहते की आपण थक्क होतो. आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थिती, त्यातले डावपेच, काश्मिरी जनतेचा संघर्ष, दहशतवाद्यांच्या कारवाया, पाकिस्तानची त्यांना असलेली फूस, सौदी अरेबियाशी असलेले लागेबांधे आणि या सगळ्यांचा तपास लावण्यासाठी अथकपणे लढणारा खाजगी डिटेक्टिव्ह एजन्सीतील शूरवीर, बुद्धिमान व प्रसंगावधानी अधिकारी श्रीकांत तिवारी हा या कथेचा नायक आहे. त्याचे त्याच्या कुटुंबावर अत्यंत प्रेम आहे. तो सतत त्यांचे हित चिंतणारा असला तरी कुटुंबातले सदस्य मात्र त्याच्यावर नाराज आहेत. कारण त्यांच्यासाठी पुरेसा वेळ देणे त्याला शक्य होत नाही. त्याच्या ऑफिसच्या कामांमध्येच तो इतका बुडालेला असतो की त्याचे आरोग्यही त्याने अगदी पणाला लावलेले असते. श्रीकांतची बायको कॉलेजात शिकवते. त्यांचा आठनऊ वर्षांचा चतुर व चलाख मुलगा आणि चौदापंधरा वर्षांची स्मार्ट व हुशार मुलगी यांच्या शाळा, अभ्यास, क्लास, छंद हे सगळं एखाद्या मध्यमवर्गीय घरात असते तसे वातावरण पाहता पाहता संशयग्रस्त होऊ लागते. घरगुती संभाषणांना वेगळेच वळण लागते. घरातले ताणतणाव वाढू लागतात. कामाच्या जागी तर टेन्शन, स्ट्रेस हे सवयीचेच झालेले असतात. त्यातून मार्ग कसकसे काढले जातात, ते प्रत्यक्ष पाहण्यातच मजा आहे. भयंकर हाणामारी व रक्तपाताची दृश्ये ओघात येणे साहजिकच असले तरी अप्रतिम छायाचित्रण, नेमके प्रसंग व अचूक संकलन यांमुळे ते पाहणे फारसे असह्य वाटत नाही. असंख्य पात्रे त्यांचे ओझरते दर्शन असूनही लक्षात राहतात, कारण त्यांचे खास वैशिष्ट्य दाखवणारे क्लोजप्स घेतले आहेत. काश्मीरच्या निसर्गाच्या सुखद सान्निध्यातल्या आतंकवाद्यांच्या क्रूर कारवाया व त्यांचे सांकेतिक भाषेतले निर्दय निष्ठूर बोलणे हा अंतर्विरोध आपल्या हृदयाला भेदून जातो.

अभिनयात मनोज बाजपेयीने अर्थातच बाजी मारली आहे. हिंदी सिनेमात आतापर्यंत मिळाला नसेल इतका अभिनयाला भरपूर वाव या भूमिकेत त्याला मिळाला आहे. त्याला चांगली साथ दिली



आहे प्रियामणी या दाक्षिणात्य अभिनेत्रीने. त्यांचे आंतरप्रांतीय लग्न झाले आहे, त्यांचे प्रेमही आहे. पण हळूहळू त्यांच्यातला सुसंवाद कमी होत जातो, एकमेकांना समजून घेण्यात ते कमी पडतात. त्यांना समुपदेशकाची मदत घ्यावी लागते, हा या काळाचाच महिमा आहे. मात्र त्या समुपदेशकाचे दोघांशी बोलणे ज्या प्रकारे चालते, ते मात्र अजिबात पटत नाही. बायकोचा एक समजूतदार मित्र व सहकारी म्हणून शरद केळकर यांची भूमिका छोटी असली तरी उठावदार झाली आहे. वास्तवातली खरी माणसेच इथे अवतरलेली दिसून येतात.

कथेतली अनेक पात्रे अनेक स्थळे, अनेक गुंतागुंतीच्या घटना यांचा आवाका मोठ्ठा आहे. तिवारीचे सर्व साथीदार, मराठी बॉस दलिप ताहिल, दोन्ही मुले यांनीही यात सहज अभिनयाचे दर्शन घडवले आहे. चुरचुरीत तरीही वास्तव संवादांमुळे आपल्याही मनावरचे ओझे हलके होते. कारणे व सबबी सांगताना, वेळेवर सुचेल तशी कहाणी रचून सांगताना नायक तिवारीने आणलेला गंभीरपणाचा आव आपल्याला हसवून जातो. पकडलेल्या टेररिस्टशी बोलतानाही तो अशी काही सुरुवात करतो की एवढ्या गंभीर परिस्थितीतही आपल्याला हसू आवरता येत नाही. बायकोमुलांशी प्रेमाने बोलताना त्यांच्याकडून तिरकस शेरे ऐकून घेतो तेव्हाचा त्याचा पडलेला चेहरा, मित्राला दुखापत झाल्यावरचा त्याचा हळवा भाव, सहकाऱ्यांशी वागता-बोलताना असणारी जबाबदारीची जाणीव त्याच्या मुद्राभिनयातून अलगदच आपल्यापर्यंत पोचते.

अतिरेक्यांच्या भूमिकांसाठी केलेली निवडही अगदी हुबेहूब आहे. त्यांची अविश्वसनीय थरारक अशी दृश्ये चित्रित केलेली आहेत. ते पाहून नकळत आपण तोंडात बोट घालतो. काल्पनिक कहाणीही सत्य वाटायला लागते. पडद्यावरची गोष्ट इंग्लिशमधून सांगितली जात असली तरी सगळी पात्रे अस्सल भारतीय आहेत आणि त्यांनी बोललेली इंग्रजी भाषा समजायला खूपच सोपी आहे. हां, एखादा हवालदार किंवा वॉचमन इंग्लिश बोलताना ऐकण्याचा अनुभव आपल्याला चांगलाच गमतीदार वाटू शकतो. पण ते इतके सरळसोपे बोलणे असते की मुळीच खटकत नाही, स्वाभाविक वाटते.

दुसरा सीझन अलीकडेच प्रदर्शित झाला आहे. त्याचे जास्तीत जास्त शूटिंग तमिळनाडू व चेन्नईतले असून बाकीचे श्रीलंकेच्या जंगलातले व काही दिल्ली व मुंबईतले आहे. पात्रेही तमिळ (मद्रासी), श्रीलंकन, हिंदी, मराठी व इंग्लिश अशी विविध भाषा बोलणारी आहेत. चेन्नईमार्गे कोलंबोपर्यंत पसरलेले अतिरेक्यांचे जाळे, स्थानिक लोकांशी संधान साधून त्यांचे ब्रेनवॉश करणे, त्यांना ट्रेनिंग देऊन देशद्रोह्यांच्या कारवायांमध्ये सामील करून घेणे, समुद्रतस्करी करणे, राजकारण्यांमार्फत संधी शोधून स्वार्थ साधून घेणे अशा कित्येक बाबतींतल्या चकित करणाऱ्या घडामोडी इथे पाहायला मिळतात.

राजीची भूमिका करणारी सामंथा ही अभिनेत्री अजूनही डोळ्यांसमोरून हलत नाही, इतकी ती खरोखर जणू तेच जगली आहे. तमिळ खेडी, शेते, झोपड्या, शहरी घरे, गल्ल्या यांची प्रादेशिकता उत्तम उतरली आहे. चेन्नई पोलीस व मुंबई पोलीस यांनी एकत्र येऊन दहशतवाद्यांना पकडण्यासाठी केलेले साहसी नियोजन, त्यात अजाणता घडलेल्या काही मानवी चुका, निकराचा लढा देऊन धाडसाने फत्ते केलेली कामगिरी हे सारे स्वप्नवत वाटणारे प्रसंग सविस्तर पाहताना आपण अक्षरशः हेलावून जातो. दिल्लीतल्या एका रासायनिक कारखान्यात घडणारे नाट्य अद्भुत आहे, इकडे हे चालले असताना मुंबईतले दहशतवादी तिवारीच्या कुटुंबालाच वेठीला धरतात. त्याला ताबडतोब घरी येऊन तिथल्या परिस्थितीशी मुकाबला करावा लागतो आणि तोही घरच्यांचा ओरडा ऐकत. अखेर तो तिढा सोडवून पुन्हा आपल्या ड्यूटीवर हजर होताना स्वतःच्या शरीरमनाचा विचार तोसुद्धा करत नाही, इतके ते त्याने स्वतःवर लावून ओढून घेतलेले असते.

तमिळी समाज आणि श्रीलंकन नागरिक यांच्या जगण्यात विलक्षण साम्य आहे. त्यांचे पेहराव, खाद्य हे समुद्री जीवनाशी निगडित आहेत आणि भाषा, राहणीमान यांतही एका सागराच्या लाटेइतकेच अंतर आहे. चेन्नईमधल्या एका पात्राविषयी बोलताना मुंबईकर चटकन म्हणून जातो,

**'अरे... उसकी बोली तो श्रीलंकनवाली तमिल लगती है... वो उधर का ही होगा |'**

झटकन विचार करणे, पटकन निर्णय घेणे व लगेच तो अमलात आणणे या गोष्टींना सरावलेले मुंबईचे डिटेक्टिव्ह्ज म्हणूनच तपासकामात अतिशय माहिर असतात आणि कधीही कशातही हार मानत नाहीत . त्या 4-5 डिटेक्टिव्ह्जमधली एक तीही असते, जी कधीही इतरांनी सांभाळून घेण्याची अपेक्षा करत नाही. विशेष म्हणजे स्त्री जास्त लवचीक असते या गोष्टीचा पुरेपूर उपयोग करून ती बेशुद्ध पडलेल्या सहकाऱ्याला तर तिथून बाहेर काढतेच, इतरांनाही धीर देते पण स्वतः जायबंदी होते.

सद्यकालीन भारतीय समाज, कुटुंबातले व्यक्तिगत नातेसंबंध, राजकीय हालचाली आणि आंतरराष्ट्रीय वातावरण या सर्वांना छेद देणारी अतिरेक्यांची कटकारस्थाने या सिरीजमध्ये अनुभवताना आपल्या मनाचा तळ अक्षरशः ढवळला जात असतो. भावना अनमोल असल्या तरी त्यापेक्षा कर्तव्य आधी महत्त्वाचे आहे, अशी कार्यतत्परता व उत्तरदायित्व प्रत्येक निर्णयाच्या वेळेस श्रीकांत व त्याचे सहकारी नेहमीच दाखवतात. अशा अनेक घटना असतात की त्या वेळेस सीनियर्सना केवळ श्रीकांत तिवारीच आठवतो व लढा देण्यासाठी तोच हवा असतो.

अचानकच एका एपिसोडमध्ये तिवारी नाइलाजाने साधारण नऊ ते पाच कार्यालयात टेबलकाम करणारा एक कर्मचारी होऊन आपल्यासमोर येतो. त्याची कामाची पद्धत आणि बॉसची अपेक्षा यांचा काहीही मेळ बसत नसतो. असे प्रसंग पाहताना आपली हसून हसून मुरकुंडी वळते. गंभीर विषयातही असणारी अशी नर्मविनोदाची पखरण आपला ताण वाढू देत नाही, पण त्याच वेळेस उत्कंठा मात्र शिगेला पोचलेली असते. पहिल्या भागात सरासरी चाळीस मिनिटांचे दहा व दुसऱ्यामध्ये नऊ असे एकूण तेरा ते चौदा तास प्रेक्षकांना गुंगवून टाकण्यात व त्यामुळे खिळवून ठेवण्यात ही सिरीज पूर्णपणे यशस्वी ठरते. स्टोरीचा किंचितही मागमूस न लागू देता वाचकांची उत्सुकता वाढावी इतपतच इथे मी सिरीजबद्दल सांगितले आहे. कलाकार कसलेले, दिग्दर्शक अनुभवी आणि कमेऱ्याची किमयाही अफाट व अचाट आहे. प्राइम ॲमेझॉन या ओटीटी प्लटफॉर्मवर हे दोन्ही भाग (एकूण १९ एपिसोड्स) एकापाठोपाठ सलग पाहता येतील. करोनाकाळात बाहेर फिरण्याऐवजी घरीच ऑनलाइन राहून इंटरेस्टिंग फमिली मनला भेटणे नक्कीच आनंददायी होते !




नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

(पूर्वप्रकाशित)

# आजची शिक्षण पद्धती योग्य की अयोग्य

आधुनिक केसरी

शिक्षण म्हणजे आपला स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान होय. पूर्वीच्या काळी प्रत्येक वर्गासाठी भिन्नभिन्न शिक्षण होते. ब्राह्मण वर्गासाठी वेदविद्याचे, क्षत्रिय यांच्यासाठी शास्त्र विद्येचे आणि वैश्य व शूद्र ही आपल्या वाडवडिलांकडून चालत असलेल्या कलेचे शिक्षण घेत असत. पण आता ही शिक्षण पद्धती पूर्णपणे बदललेली आहे. आजचे शिक्षण हे पूर्णपणे पुस्तकी स्वरूपाचे आहे. पुस्तकातील माहिती ठराविक वेळात उतरून काढणे याला परीक्षा या शब्दाचे रूप मिळाले आहे. पुस्तकाबाहेरील कुठल्याही गोष्टीचा विचार करण्याची संधी आजच्या युगात विद्यार्थ्यांना व शिक्षकाला मिळत नाही. आजच्या शिक्षकांना तरी जनरल ज्ञान देता आले पाहिजे व विद्यार्थ्यांनी ते उत्कृष्टपणे ग्रहण केले पाहिजे. पण तसे न करता विद्यार्थी हा स्वतःच्या बुद्धीचा वापर करत नाही. त्याची खरी गुणवत्ता कळू शकत नाही. त्याला जेवढे आपल्या गुरूकडून मिळते तेवढे सर्व आपल्या जवळ ठेवतो. आता तो काहीच वाढवण्याचा प्रयत्न करत नाही त्यामुळे त्याच्या बुद्धीला चालना मिळत नाही.त्याच्या विचारांची क्षमता ही कमी होत जाते याच कारणामुळे वैद्यकीय अभियांत्रिकी तसेच शैक्षणिक क्षेत्रांमध्ये प्रवेश मिळणे अशक्य झाले. आहे ज्याचे पाठांतर उत्तम तो अत्यंत हुशार असा समज झाला आहे. दिवसेंदिवस महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची संख्या वाढत आहे परंतु त्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा दर्जा वेगाने घसरत आहे त्यामुळे देशाचे नुकसान होत आहे.

आजच्या शिक्षणात औद्योगिकरणाच्यापरिस्थिती व्यावसायिक आणि प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण याची निकडीची गरज आहे परंतु ती गरज पूर्ण होत नाही. त्यामुळे व्यक्तीविकास हा उद्देश डोळ्यासमोर ठेवल्यास नृत्य, गायन, शिल्पकला इत्यादी कला विभागांचाही शिक्षणाचा भाग असला पाहिजे. पण दुर्दैवाने या विषयांकडे बघितले जात नाही. जणू काही एक आपल्या आयुष्यात हे एक जरुरीचे साधन नाहीच. या उद्देशाने या विषयाकडे नजर टाकली जाते. भाकरी मिळवून देणारे सुसंस्कार घडवणारे देशबांधवांना विषयी अभिमान निर्माण करणारे असे शिक्षण असावे. शारीरिक बौद्धिक भावनिक तसेच सर्व विकास साधण्यासाठी ते सर्व दृष्टीने संपन्न होईल असे आजच्या युगात शिक्षण असायला हवे.

आजच्या शिक्षणात मनुष्य फक्त सुशिक्षित होतो पण सुसंस्कृत नाही. तसे पाहता शिक्षण हे पवित्र आहे. त्यामुळे ज्यांनी शिक्षण घेतले ते तर शिक्षित असायलाच हवे पण खरे तर ती माणसे ही स्वार्थी व संकुचित वृत्तीचे असतात. हुंड्याची प्रथा सुशिक्षितांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. अशिक्षित यांच्या घरी पत्नीही गृहलक्ष्मी मानली जाते. सुशिक्षितांमध्ये घरी येणारी वधु ही उपभोग्य वस्तू मानली जाते. फक्त एक हुंडा घेऊन येणारी व्यक्ती समजली जाते. कुठलाही मानव बघा निस्वार्थी होण्यासाठी त्याने पूर्वीचे ऋषीमुनींच्या आचरणातून शिक्षण घ्यायला हवे.

महात्मा गांधींच्या मते "शिक्षण म्हणजे व्यक्तींमधील अध्यात्मिक बौद्धिक अंगाचा विकास करणे". आजची शिक्षण पद्धती ही बौद्धिक विकास करते. शिक्षण हे सर्वांगीण विकास करणारे असते मोठ्या प्रमाणावर डॉक्टर, इंजिनीअर्स, शिक्षक तयार होतात परंतु खेळाकडे दुर्लक्ष झाले आहे. यामुळेच आपल्या भारताला ऑलिंपिकमध्ये फारसे सुवर्णपदक मिळत नाही. याला कारण शिक्षण पद्धतीतील खेळाला असलेले निम्न स्थान होय. निरोगी शरीराचा विकास करणारी शिक्षण पद्धती असावी. यात खेळालाही महत्त्वाचे स्थान असावे.

आज शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला विचारले तू हे शिक्षण का घेत आहेस ? त्याचे उत्तर ज्ञान प्राप्ती करणे किंवा व्यवसाय करायचा आहे असे कधीही होत नाहीत. केवळ नोकरी मिळवण्यासाठी शिक्षण घेत आहोत असेच होते. शिक्षण पद्धतीतील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था तसे कमीच आहेत. प्रत्येकाला कमी श्रमात अधिक पैसा देणारी नोकरी हवी आहे. शिक्षणात उद्योग धंदा व व्यवसाय शिक्षण द्यायला हवे अशी आपली शिक्षण पद्धती हवी. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणारे नैतिक मूल्य रुजणारी व सामाजिक बांधिलकी निर्माण करणारी पद्धती शिक्षण पद्धती असावी.

९५६१५९४३०६

# अनोखे वृक्षारोपण...!

आधुनिक केसरी

अनिल हा आठवीच्या वर्गात शिकत होता. एकदा शाळेमध्ये आठवीच्या वर्गाने सामुदायिक वृक्षारोपण करण्याचे ठरविले. आणि ज्या ज्या मुलांना वृक्षारोपण करण्यास सहभाग घ्यायचा असेल त्यांनी आपल्या हाताने लावलेल्या रोपट्याची काळजी घ्यावी. म्हणजे रोज रोपट्याला खत-पाणी दयावे. त्यामुळे रोपट्याची योग्य देखभाल करून त्याची वाढ होईल. आणि शाळेभोवती झाडे लावल्याने शाळेला शोभा येईल. हा या वृक्षारोपण करण्या मागचा हेतू होता.

ठरल्याप्रमाणे शाळेतून वृक्षारोपण दिंडी काढून वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर विज्ञान शिक्षकाने, "वृक्षारोपण आणि पर्यावरणाचे महत्व" या विषयावर सर्व मुलांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले. त्यामुळे मुलांमध्ये झाडांविषयी आपुलकी निर्माण झाली. प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या रोपट्याला नदींचे नाव देऊन रोज पाणी देण्यास सुरुवात केली. आठवीचे मुले शाळेत आल्यावर रिकाम्या तासात अथवा फावल्या वेळेत लावलेल्या रोपट्याला शाळेच्या हौदातून नळाद्वारे पाण्याची बकेट भरून रोज न चुकता पाणी दयायचे. मात्र सुट्टीचा दिवस वगळून. अनिलने रोपट्याला सर्वांपेक्षा चांगले खत-पाणी देऊन रोपट्याच्या आळ्यामधील गवत - घान नियमीत काढत असे. त्यामुळे अनिलने लावलेल्या रोपटे हे टवटवीत व जोमाने वाढत होते. मात्र त्याने इतर मुलांप्रमाणे रोपट्याला नदीचे नाव न देता. अनिलने आपल्या वडिलांचे नाव दिले होते. क्रिडाशिक्षक रोज लावलेले वृक्ष पाहत आणि कोणाचे वृक्ष कसे वाढले हे आठवीच्या मुलांना आठवड्यातून एकदा सांगत. कारण आठवीच्या वर्गामधील बावीस मुलांनी हे बावीस वृक्ष लावलेले होते.



काही दिवसांनी अनिलने लावलेले वृक्ष हे इतके चांगले वाढले की, ते आता डोक्याच्या उंचीपर्यंत वाढलेले होते. अनिल सुट्टीतही झाडाला खत-पाणी टाकायचा. वृक्षाला हाताने स्पर्श करायचा, आपल्या गळ्याला लावायचा, वृक्षाच्याजवळ कधी-कधी कविता गायन करायचा, गायन करता-करता वडिलांच्या आठवणीत रडायचा. मगच तो घरी जायचा. ज्याचे वृक्ष चांगले आले. त्यास शाळेच्यावतीने बक्षिस देण्यात येणार होते. अनिलने लावलेल्या वृक्षाची योग्य वाढ होऊन ते हिरवेगार व टवटवीत दिसत होते. बावीस वृक्षातून अनिलचे वृक्षाचा प्रथम क्रमांक आला. शाळेच्यावतीने स्नेह संमेलनाच्या कार्यक्रमात अनिलला सन्मानपूर्वक मुख्याध्यापकांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. अनिलने लावलेल्या वृक्षाविषयी घेतलेली काळजी याबाबतीत इतर मुलांना माहिती सांगावी. असे मुख्याध्यापकाने अनिलला सांगितले.

अनिल व्यासपीठावर येताच मुलांनी टाळ्यांच्या गजरात त्याचे स्वागत केले. अनिल वृक्षाविषयी माहिती सांगत होता. पाणी कसे दिले, खतांची मात्रा किती दिली. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे अनिलने लावलेल्या वृक्षाला आपल्या वडिलांचे नाव का दिले होते? हे अनिल सांगत होता, "माझे वडिलांचे माझ्या बालपणीच निधन झाले. म्हणून मी माझ्या वडिलांच्या आठवणीत हे वृक्ष लावले. म्हणून वृक्षाला इतर कोणाचेही नाव न देता मी वडिलांचे नावाने हे वृक्ष वाढविले. सर्व विद्यार्थी शांत होऊन अनिलचे विचार मन लावून ऐकत होती. हे सर्व सांगताना अनिलच्या डोळ्यातून अश्रुही वाहत होते. या गोष्टीचा परिणाम सर्व मुलांवर झालेला होता. सर्वात शेवटी क्रीडाशिक्षकांने सांगितले की, "आठवीच्या वर्गाने केलेले हे वृक्षारोपण एक आनोखे उपक्रम असून ते शाळेतील प्रत्येक मुला-मुलीसाठी प्रेरणादायी असे उपक्रम आहे. क्रीडाशिक्षकाच्या परवानगीने शाळेतील सर्व विद्यार्थी शांतपणे आपापल्या घरी जात असतांना अनिलने लावलेले बहारदार वृक्ष हे सर्व विद्यार्थी पाहत-पाहत जात होती. हे वृक्ष हिरवेगार व टवटवीत जोमाने वाढलेले दिसून ते वाऱ्यासंगे आनंदाने डुलत होते.

अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

## प्रॉमिस डे

आई मला आज प्रॉमीस करशील ना?
पाळणा घरात सोडून जाऊ नकोस ना?

आई आज प्रॉमिस करशील ना?
माझ्यासाठी घरात थांबशील ना ?
आज सुट्टी काढून माझ्याशी गप्पा मारशील ना?

आई मला प्रॉमीस करशील ना?
तुझ्या उबदार कुशीत घेशील ना?
तुझे अंगाई गीत गाशील ना ?
छान छान गोष्टी सांगशील ना ?...

आई मला प्रॉमीस करशील ना?..
तुझ्या हाताने दुधभात भरवशील ना,?
चिऊ काऊच्या गोष्टी सांगशील का?
परीच्या दुनियेत नेशील का?...

आई मला प्रॉमीस करशील ना?
मला लांब फिरायला नेशील ना?
आईस्क्रीम,चॉकलेट देशील ना?
आई मला प्रॉमीस करशील ना?....

-सीमा मंगरूळे तवटे, वडूज सातारा

# एक किलो लोणी...

आधुनिक केसरी

एक शेतकरी आपल्या गावामधून शहराच्या बाजारात लोणी विकण्यासाठी जायचा.

एका दुकानदाराला त्याचे लोणी खूप आवडले.

दुकानदाराने शेतकऱ्याला दररोज एक किलो लोणी घेऊन ये असे सांगितले. शेतकरीसुद्धा हे ऐकून खुश झाला. शेतकऱ्याने त्याच दुकानातून एक किलो साखर आणि इतर वस्तूंची खरेदी केली. सामान घेऊन तो घरी आला. दुसऱ्या दिवसापासून शेतकरी दररोज दुकानावर एक किलो लोणी देऊ लागला.

दुकानदारही दररोज शेतकऱ्याला लोण्याचे पैसे देत होता. काही दिवस असेच चालू राहिले.

एका दिवशी दुकानदाराने शेतकऱ्याने दिलेल्या लोण्याचे वजन केले, तर ते ९०० ग्रॅमच भरले. दुकानदाराला खूप राग आला पैसे एक किलोचे घेतो. आणि लोणी ९०० ग्रॅमच देतो, हे दुकानदाराला अजिबात आवडले नाही. शेतकरी फसवणूक करत आहे, असा विचार त्याच्या मनात आला...

दुसऱ्या दिवशी शेतकरी लोणी घेऊन दुकानात आल्यानंतर दुकानदाराने त्याच्या समोरच लोण्याचे वजन केले तर ते ९०० ग्रॅमच भरले. आता मात्र दुकानदाराच्या क्रोधाचा पारा अधिकच वाढला. तो शेतकऱ्यावर ओरडून म्हणाला, तू मला धोका देत आहेस.

शेतकरी म्हणाला, अहो भाऊ माझ्याकडे वजन करण्यासाठी एक किलोचे मापच नाही, तुमच्याकडून जी एक किलो साखर खरेदी केली होती त्याचे माप



बनवूनच मी लोणी मोजून आणतो.'

शेतकऱ्याचे हे उत्तर ऐकून दुकानदाराची मान शरमेने खाली गेली.

कारण तो स्वतःच चुकीचे काम करत होता.

त्याच्या लक्षात आले की,

आपण जसे कर्म करतो, तसेच फळ आपल्याला मिळते.

या छोट्याच्या कथेची शिकवण अशी आहे की, पेराल तेच उगवेल.

मी जगाला देईन, तसे जग मला देईल, ही भावना प्रत्येकाच्या मनात सतत असावी.

## हरवले बालपण

का कधी कसे ?
अचानक हरवले बालपण
कामाच्या चक्रव्यूहात अडकून
संपले ते अनमोल क्षण

याद राखा वेळ
देणार नाही आपल्याला साथ
खरं तर आपणच
दिली पाहिजे वेळेला साथ

क्रिकेट खेळताना नेहमी
तुटणाऱ्या गाडीच्या घराच्या
काचांचा तो मधुर स्वर
येणार नाही त्याला कशाचीच सर

एका प्रश्नाचे उत्तर
शोधायला लागायचे तासनतास
आता मोठे झाल्यावर
होतो त्यातच निजल्याचा भास

घेतला नाही आम्ही
कधी सुखद् खट्याळ क्षणांचा आस्वाद
म्हणूनच प्रत्येकाच्या जीवनात
बालपण असते नेहमी खास निर्विवाद

नशिबाची साथ नव्हती
म्हणून बालपणाच्या मस्तीत जगलो नाही
आता वाटते बालपणा शिवाय
चाकोरीतल्या जीवनाला काही अर्थ नाही
चाकोरीतल्या जीवनाला काही अर्थ नाही

कु श्रेयस प्रकाश भोंगाळे
इयत्ता 3 री
भारत माता इंग्लिश मीडियम स्कूल
मायणी, ता. खटाव जि. सातारा

## मामाच्या शेतात

मामाच्या शेतात
आमराई दाट
कैऱ्याला बहर
भरमसाठ

मामाच्या शेतात
पक्ष्यांची गाणी
खळखळ वाहतय
पाटाचं पाणी

मामाच्या शेतात
वानरांची शाळा
झाडावर व्हायची
एक एक गोळा

मामाच्या शेतात
डोलतोय मका
हवेच्या तालावर
दोडका घेतोय झोका

मामाच्या शेतात
नागमोडी वाट
आंब्याच्या झाडाची
सावली दाट

मामाच्या शेतात
मन रमते भारी
वाटते रहावे
न यावे घरी



रवींद्र व्ही. चालीकवार
संपर्क क्र. 9011559106





# चतुर आणि हुशार 'मोबाईल गँग'च्या पराक्रमाची गमतीशीर सफर



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मानवी जीवनातील सर्वात सुंदर काळ म्हणजे बालपण. सुंदर, निरागस आणि बिनधास्त जगण्याचा भाग म्हणजे बालपण. भविष्याची चिंता नाही, कोणाबद्दल आकस, राग, ईर्षा, द्वेष नाही, प्रेमाने - मिळून - मिसळून एकत्रितपणे वर्तमान खऱ्या अर्थाने जगण्याची संधी म्हणजे बालपण. खोडया करणं हा तर जन्मसिद्ध हक्कच नाही का ? दंगा- मस्ती, धडपड, पळापळ, खाऊगिरी, लुटूपुटूची भांडणं आणि प्रश्नांची सरबत्ती हा मुलांचा रोजच्या दिनक्रम. लहानपणापासून आपण ऐकत आलो आहोत की, 'मुलं म्हणजे देवाघरची फुलं'. हिच फुलं खूपच हुशार झाली आहेत हो आता ! मुलांचं मन निर्मळ असतं. मुलं म्हणजे ओल्या मातीचा गोळा, जसा आकार देऊ तसे घडत जातात. या कोऱ्या मनावर चांगले संस्कार घडत असताना मुलांचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडत जातं. मुलांना पडणारे अनेक प्रश्न म्हणजे एखाद्या गोष्टीबाबत पूर्ण माहिती जाणून घेण्याची त्यांची जिद्द असते. हे असे का ते तसे का ? यामागील ठोस कारण जाणून घेतल्याशिवाय मुलांना चैन पड़त नाही.**

मुलं खुप मस्ती करतात, दंगा करतात असे नाही, तर आपल्या उत्सुकतेने आणि हुशारीने अनेक योग्य कार्ये सुद्धा घडू शकतात, याची प्रचिती देणारे म्हणजे लेखक संजय जोशी लिखित 'मोबाईल गँग' हा कथासंग्रह! १४ कथांनी सजलेला हा कथासंग्रह पुन्हा बालपणीची सफर घड़वणारा आहे. व्यास क्रिएशन्सने हा कथासंग्रह प्रकाशित केला आहे. पुस्तकाचे शीर्षक मनात उत्सुकता निर्माण करणारे आहे. ही मोबाईल गँग नेमकी आहे तरी कोण ?
लेखक संजय जोशी यांनी किशोर मासिकातून बच्चे कंपनीसाठी लेखन केलं. त्यांच्या भन्नाट कल्पनाशक्तीमुळे ही मोबाईल गँग नावारूपास आली. आणि या कथांचं सदर सुरु झालं आणि आता याच कथा एकत्रितपणे पुस्तकरूपात अवतरल्या आहेत. मनोरंजनासोबतच मौलिक संदेश या कथांमधून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुलांनी आपल्या बुद्धीचा, हुशारीचा चतुराईने उपयोग केला तर अनेक समाजोपयोगी कार्ये होऊ शकतात आणि स्वतःचं संरक्षणही करू शकतात, हा विचार या कथासंग्रहातून उदधृत केला आहे.
आजकाल प्रत्येकाकडे मोबाईल असतोच असतो. ती काळाची गरज आहे. लहान मुलं सुद्धा या मोबाइलाकडे आकर्षित होतात. मुलांच्या हातात ही मोबाइल दिसून येतात. पण याच मोबाईलचा योग्य वापर केला तर अनेक विधायक कामे मुलांकडून होऊ शकतात. हेच सांगण्यासाठी ही मोबाईल गँग आपल्या भेटीला आलेली आहे. १४ कथा, साधी- सोपी भाषाशैली, आकर्षक रचना, प्रथमपुरुषी निवेदनशैली यामुळे हे पुस्तक मुलांना नक्की आकृष्ट करेल हे नक्की. चला तर मग या मोबाईल गँगची ओळख करून घेऊ.
पुण्यातील कोथरुड भागातील एका सोसायटीत काही लोकांचे मोबाईल चोरीला जातात. हे चोरीला गेलेले मोबाईल शोधून काढण्यासाठी सोसायटीतील निक्की, मंटू, सुन्या ही मुलं पुढे येतात आणि आपल्या अक्कल - हुशारीने चोराला शोधून काढतात. या पराक्रमासाठी बक्षीस म्हणून तिघांनाही छोटे मोबाईल दिले जातात. या मोबाईच्या नावाप्रमाणे निक्की नोकिया, मंटू मोटोरोला आणि सुन्या सैमसंग अशी नावे पडतात आणि मग या गैंगला 'मोबाईल गँग' हे नाव मिळतं. आहे ना गंमत!!
या मोबाईल गँगमधील सिद्धू कांबळे हा ह्या कथांचा निवेदक असून या 'मोबाईल गँग' ने मिळून अनेक गोष्टींचा छडा कसा लावला, हे वाचताना मजा येते. मनात एकदा का प्रश्न निर्माण झाला, शंका वाटली की ही मोबाईल गँग शांत बसत नाही. त्या गोष्टीमागचे कारणही शोधून काढते. जणू क़ाय गुप्तहेरच आहेत !
'मोबाईल गँगच्या डरकाळया' या कथेत निक्कीच्या गावी केलेली धमाल - मस्ती अनुभवायला मिळते. 'मोबाईल गँग आणि पत्रातील गंमत' या कथेत नंदूकाकाने घातलेले कोड़े ही मोबाईल गँग पत्रांच्या माध्यमातून कशी सोडवते, ही सुद्धा एक गंमतच आहे.
निक्कीच्या काकाच्या गावी ही मोबाईल गँग आगबाबा ह्या ढोंगी बाबाचं पितळ कसे उघड़े पाडते, हे जाणून घेण्यासाठी हा कथासंग्रह वाचायला हवा. ही मोबाईल गँग फक्त हेरगिरी करत




नाही तर स्वयंपाकाचे धड़े सुद्धा गिरवताना दिसते. मोबाईल गँगमधील ही मुलं फक्त बुद्धिमान, ज्ञानी, हुशार, चतुर नाहीत तर धीट आणि साहसी सुद्धा आहेत. 'मोबाईल गँगचे अपहरणनाट्य', 'सिंहगड़ावर मोबाईल गँग', 'बोटीवर मोबाईल गँग', 'मोबाईल गँगचे हवाई धाडस' या कथांमधून या मोबाईल गँगच्या साहसी वृत्ती सुद्धा अनुभवता येते.
प्रत्येक कथा नवीन उत्सुकता निर्माण करणारी आहे. पुढे क़ाय ? ही उत्कंठा निर्माण करणारी लेखकाची शैली विशेष आहे. वाचकाला पूर्ण पुस्तक वाचण्यासाठी प्रेरणा मिळायला हवी, मनात उत्कंठा निर्माण झाल्यानेच पुस्तकात पुढे क़ाय होणार आहे, हा एक धागा वाचकाला त्या पुस्तकाशी बांधून ठेवतो. आताच्या पिढीशी समरस होऊन, त्यांना समजेल अशा पद्धतीने या मोबाईल गँगची ही साहसीकथा सुंदररित्या लेखकाने रचल्या आहेत.
मुलांना मोबाइल, फेसबुक, व्हाट्सएप्प, यूटूब या गोष्टींपलिकडे पुस्तकाचे जग आहे, याची जाणीव करून दयायला हवी. मुलांच्या मनात वाचनाचे संस्कार रुजवण्यासाठी उत्तमोत्तम साहित्य त्यांनी वाचायला हवे. त्यांच्यात जिद्द, मेहनत, ध्यास याची प्रेरणा देताना मुलांच्या बौद्धिकतेला चालना मिळेल, विनम्रता,प्रामाणिकपणा यासोबतच धीटपणा, साहसीपणा आणि चतुराई, हुशारीचा योग्य उपयोग कसा करावा, याचा अनुभवही मिळायला हवा. फक्त मुलांमधील मानसिकता, संवेदनशील भाव जपला पाहिजे. हाच उद्देश मनात ठेवून मुलांना भेट म्हणून हा पुस्तकरूपी खाऊ नक्की द्या !



# हिंदी चित्रपटसृष्टीतील नत्थूलालजी : मुकरीआली...

आधुनिक केसरी

**"मूछें हो तो नत्थूलालजी जैसी हो वरना ना हो" शराबी मधला अमिताभ बच्चन यांचा डायलॉग आणि मुकरीचा निरागस चेहरा. आज ही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. एकूण ६०० चित्रपटातून काम करणारे मुकरी यांचा काझी ते विनोदवीर हा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. आज ४ सप्टेंबर मुकरी यांचा स्मृतिदिन. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त थोडक्यात त्यांना जाणून घेऊयात.**

मुकरी हे दिलीपकुमार यांचे शाळकरी मित्र. मोहम्मद उमर मुकरी यांचा जन्म उरण येथे कोकणी मुस्लिम कुटुंबात झाला होता. मुकरी हे काझी होते. एका मदरशात ते शिकवीत होते पण कुटुंब मोठं असल्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. एकदा अचानक दिलीप कुमार आणि मुकरी यांची भेट झाली. मुकरी यांनी आपली आर्थिक परिस्थिती सांगितली आणि सिनेमात काम मागितले. तेव्हा दिलीप कुमार बॉम्बे टॉकीजच्या मालकीण देविका राणी यांच्याकडे काम करीत होते.. देविका राणी यांनीच दिलीप कुमार यांना चित्रपटात आणले होते. मुकरी यांना दिलीपकुमारने देविका राणी यांची भेट घडविली. आधी मुकरी यांनी असिस्टेंट म्हणून काम पाहिलं नंतर अभिनय ही करू लागले. १९४५ मध्ये दिलीप कुमार यांच्या सोबत "प्रतिमा" चित्रपटात द्वारे त्यांच्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात केली. दिलीप कुमार आपल्या प्रत्येक चित्रपटात मुकरी यांना घ्यायचे तशी निर्मात्याकडे अटच ठेवायचे.



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

दिलीपकुमार सोबतच अमिताभ बच्चन यांच्या सोबत ही मुकरी यांची जोडी प्रचंड गाजली होती. बॉम्बे टू गोवा (१९७२) अमर अकबर एंथनी (१९७७) लावारिस (१९८१) शराबी (१९८४) अमर अकबर एंथनी चित्रपटातील तय्यब अली ही व्यक्तिरेखा प्रचंड गाजली होती. आजही ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. शराबी चित्रपटातील "नत्थूलाल जी" ला कोण विसरू शकतं. "मूछें हो तो नत्थूलालजी जैसी हो वरना ना हो" शराबी मधला अमिताभ बच्चन यांचा डायलॉग आणि मुकरीचा निरागस चेहरा. आज ही प्रेषक विसरू शकले नाहीत. आपल्या पन्नास वर्षाच्या कारकिर्दीत ६०० हून अधिक चित्रपटामध्ये मुकरी यांनी काम केले आहे. काझी ते विनोदवीर हा त्यांचा प्रवास थक्क करणाराच आहे. आपले दातहिन स्मित, क्षीण उंची आणि अचूक विनोदाने हिंदी चित्रपटसृष्टीत सहा दशकाहून अधिक काळात ६०० हून अधिक चित्रपटामध्ये प्रेक्षकांचे मनोरंजन केले. चित्रपटांमधील त्यांची कारकीर्द दिलीप कुमार यांच्याशी समांतर चालली. जो मुकरीचा शाळकरी मित्र होता. असा हा महान विनोदवीराचे वयाच्या ७८ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. या महान विनोदवीराला माझा सलाम.

# आली गवर आली...

आधुनिक केसरी

**सण वरसानं आला गं सजलेल्या अंगणी,**
**उमा पार्वती घेऊन आले माहेरची पाहुणी**
**आली गवर आली आली सोनपावली आली**

**चार ओळी गुणगुणत आज डोळ्यासमोर अंगणातील ती पवित्र तुळस डोळ्यासमोर आली. नुक ताच कमी झालेला पाऊस अन् ते उतरायला लागलेलं ऊन आणि ताटातले ते सुंदर अशा पिसात नाकात नथ आणि बाजूनी लावलेली एकदानी असलेले मुखवटे आणि डोक्यावर पदर घेऊन प्रेमाने गौराईला घरात आणणारी आई, आणि वाड्यातल्या दगडी फरशीवर कुंकवानी उठवले ले ते हाताचे ते ठसे, त्यात काहीतरी विशिष्ट असं म्हणजे शब्दात नाही सांगता येतं.**

**रूप ते जणू किती साजिरे,**
**हळदी कुंकवाच्या ताटात**
**उठून दिसते जणू गोड गोजिरे.**
**आतुरतेने उभी, अंगणीची तुळस,**
**हसूनी फुलली बहरली, जणू तिच्या स्वागतास.**

आमच्याकडे आम्ही लहान होतो तेव्हा गौरी आवाहन दिवशी दुपारी ताटे चमच्यानी वाजवत वाजवत गौराईचे स्वागत होते.

**"गौराई गौराई कशापायी आली"**
**"धन धान्य पायी आली."**
**"मुला बाळा पायी आली"**
**"गुर ढो रा पायी आली"**

असे म्हणत म्हणत तुळशी पासून चमच्यानी ताट वाजवत वाजवत तिचे पारंपरिक पद्धतीने गौ राईचे स्वागत होत असे. जिथे गौ राई बसवायची तिथे बाजूलाच शेतातील पिकांची म्हणजे काराळा, भुईमुग, आगडा, हराळी, हायब्रीड, इत्यादी पिकांच्या एक एक डहाळी बाजूला ठेवायची. पाना फुलांत पिकात जणू लक्ष्मी आली आहे असे वाटायचे.
पहिल्या दिवशी शेपूची भाजी आणि ज्वारीच्या भाकरीचा नैवेद्य दाखवावयाचा. ती शेपूची भाजी एका विशिष्ठ पद्धतीने करायची म्हणजे त्याच्यात भोपळ्याचे पान, कोवळ्या चवळी आणि चवळी चे पान असे घालून ती भाजी बनवाव् याची आणि त्याच्या सोबतीला ज्वारीची भाकरी असा नैवेद्य पहिल्या दिवशी असतो.
दुसऱ्या दिवशी गौरी पूजन त्या दिवशी नेहमीप्रमाणे पुरणपोळीचा नैवेद्य आणि सायंकाळी गौरी जागर असायचा त्या दिवशी ची एक छोटीशी आठवण सांगते. म्हणजे माझी मोठी ताई, आई, आणि काकू एक पितळी पातेले घेऊन त्याच्यात मापात बसेल असे आपल्या हायब्रीड किंवा ज्वारीच्या कानासाचे ताट (कडब्याचे सर काळे) त्या पातेल्यात आडवे अगदी ताठ बसायला हवे असे. थोड्या थोड्या वेळाने पाण्यात हात बुडवून त्या सर काळा वरून अलगद हात फिरवत राहायचे, काही वेळाने त्यातून खूप सुंदर आवाज ऐकू येतो. आणि त्या आवाजावर पूर्वीची काही जुनी गाणी गात तो जागर होत असे. गाणी ही अगदी मार्मिक आणि अर्थपूर्ण अशीच, त्यातली काही आठवतात. ती टाकते इथे.

**अंगणी तापते दूध**
**दूध पिवळी शाय**
**लेकी गवरी बाय**
**एवढं जेवूनी जाय.**
**आता काय करू बाय**
**शंकर आले, मासुळ्या**
**द्यायला उशीर झाला.**
**अंगणी तापते दूध**
**दुधा पिवळी शाय,**
**लेकी गवरी बाय**
**एवढं जेवुनी जाय.**
**आता काय करू बाय**
**शंकर आले जोडवी**
**द्यायला उशीर झाला.**

असे एक एक करत सगळे दागिने घेत घेत गाण्याचा शेवट, असेच दुसरेही एक गीत आहे.

**रांजा मागली तुळस**
**पाची पानांनी फुलली,**
**जोडव्याच्या भाराणी नि बाई**



**गौराई माझी लवली.**
**रांजा मागली तुळस**
**पाची पानांनी फुलली,**
**कंबर पट्ट्याच्या भाराणी**
**नि बाई,**
**गौराई माझी लवली.**

असे करत करत सगळे दागिने घ्यायचे. खूप सुंदर सुंदर पारंपरिक गाण्यांनी हा जागर केला जायचा.

**पाटाची हराळी बाई**
**पाण्यानं तुंबली,**
**आमची गौराई इथ का**
**बसली.**
**पैंजनासाठी रुसली म्हणून**
**इथं बसली.**
**नगरच्या सोनारा सांगावा**
**धाडिते**
**पैंजन घडविते अन्**
**गौराईला घालिते गौराईला**
**घालिते.**
**हातात पाटल्या नाकात**
**नथणी कानात बुगड्या**
**केसात वेणी, बसायला**
**चंदनी पाट अहो बसायला**
**चंदनी पाट.**
**आई गौराईचा किती थाट माझ्या गौराईचा थाट गं.**
**करांड्यावर करंडा**
**क रंड्याव र मोर,**
**माझ्याशी खेळते बघा**
**चंद्राची कोर बाई चंद्राची कोर.**

आईने प्रेमाने तिला दाखवलेला चहाचा अगदी नैवेद्य ही कधीतरी डोळ्यासमोर येतो. याची म्हणजे अजून हि दाखवते. पण त्यामध्ये आता काही आधुनिक गोष्टींचाही समावेश झाला आहे. असे करता करता दोन दिवस कसे निघून जायचे ते कळायचे ही नाही. घरातील वातावरण किती पवित्र उत्साही आणि अगदी आनंदी असायचे. याच्यावरून कधी कधी विचार येतो की खरचं आपली भारतीय संस्कृती खरचं खूप छान आहे, याचा प्रत्यय येतो.

**वैशाली महाडिक**

# अमृत काळाची प्रेरणादायी सुरुवात !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**देशाच्या इतिहासातील गौरवाचे एक सोनेरी पान म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा काळ. सामान्य जनांपर्यंत आपला ध्येयवाद आपल्या आचरणातून कसा पोहचवता येतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे त्यांचे जीवन. प्रेरित करणारा हा इतिहास ! अनेकांना तो इतिहास आणि महाराज हे फक्त महाराष्ट्र राज्याचा वाटतात. खरे तर महाराष्ट्र या नावाने कुठलेही राज्य त्यावेळी अस्तित्वात नव्हते. त्यामुळे त्यांच्या स्वराज्याच्या सीमा संकुचित नव्हत्या त्या आसेतु हिमाचल होत्या, महाराजांचे स्वप्न हे हिंदवी स्वराज्याचे होते आणि आजची संघ राज्यव्यवस्थाच जणू ते स्थापन करू इच्छित होते, याचा पुरावा म्हणजे त्यांनी मिर्झा राजे जयसिंग याना लिहलेले पत्र होय ! काशीच्या विशवनाथ मंदिराच्या जिर्णोद्धाराची त्यांना आस होती. त्यांचा राज्यभिषेक हा हिंदू राजा होऊ शकतो हा आत्मविश्वास हिंदू जनमानसात निर्माण करण्यासाठी होता. दुर्दैवाने महाराज तसे अल्पायुषी ठरले आणि त्यानंतर हिंदू समाजाचा पुन्हा संघर्ष सुरू झाला.**

महाराजांच्या जीवनातील सुरतेची लूट हे प्रकरण चुकीच्या पद्धतीने सांगितले गेले त्या सुरत मध्ये सर्वप्रथम महाराजांचा पुतळा उभे करणारे होते नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी. आग्र्याच्या किल्ल्यातून बाहेर पडल्यावर समोर महाराजांचा भव्य पुतळा उभा करून कल्याणसिंग यांनी आग्र्याहून महाराजांनी स्वतःची करून घेतलेली सुटका हा दैदिप्यमान अध्याय चिरस्थायी प्रेरणेचा स्रोत बनवला. इतिहासतील प्रेरणा जिवंत करण्यासाठी असे उपक्रम करायचे असतात. हे दोघेही ज्या विचारातून आणि संस्कारातून पुढे आले तो विचार आणि संस्कार महाराजांना राष्ट्रपुरुष मानणारा विचार आहे आणि महाराजांचे कर्तृत्व वैश्विक उंचीचे आहे यावर विश्वास ठेवून गेली ९७ वर्षे काम करणारा विचार आहे. राष्ट्रपुरुषांना जातीत कोंडणारे, प्रादेशिक बनवणारे आणि हे करताना त्या राष्ट्रपुरुषाची उंची कमी करणारे याना हे समजणे अवघड आहे आणि त्यामुळे स्वतः काही करू न शकल्याचे शल्य त्यांना जळफळाट व्यक्त करण्यास बाध्य करत आहे.

आज नौदलाचा बदल केला गेलेला झेंडा आणि त्यात वसाहतवादी वृत्तीच्या पंचम जॉर्ज ऐवजी शिवमुद्रा स्थापित होणे याचा अर्थ या पृष्ठभूमीवर समजून घेण्याची गरज आहे. देशाचे आत्मभान जागे करून, त्यातून निर्माण होणाऱ्या आत्मप्रेरणा या उद्याचा आत्मनिर्भर भारत बनवणार आहेत. देशाच्या सीमा संरक्षणाचे महत्व ओळखून सागरी सीमा या पण सीमाच असतात आणि भविष्यात होणारी आक्रमणे ही सागरी मार्गाने असणार आहेत हे ओळखणारे पाहिले राज्यकर्ते शिवाजी महाराज होते. भारतातील पाहिले आरमार उभे करण्यासाठी कान्होजी आंग्रे या हिऱ्याला पैलू पाडून नौदल उभे करत सिंधुदुर्ग, विजयदुर्ग हे जलदुर्ग उभे करणारे आणि इंग्रजाना व्यापार करायला आले आहात फक्त व्यापारच करा असे निक्षून सांगणारे आमचे शिवाजी महाराज होते. आणि त्यामुळे नौदलाच्या ध्वजात शिवमुद्रा स्थापित होणे हे अत्यन्त स्वाभाविक काम नरेंद्र मोदी सरकारने केले आहे त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.




धर्मनिरपेक्षता, उदार मतवाद आणि भोंगळपणा याला महाराजांच्या राजनीतीत कुठेही स्थान नव्हते, होती ती केवळ विजगेषु वृत्ती ! पण हे सांगण्याची हिम्मत देशात स्वातंत्र्यानंतर सत्तेत आलेल्या लोकांची नव्हती. म्हणूनच महाराष्ट्रात किल्ल्यांची परवड होत असताना प्रतापगडावर अफजलखानाची कबर आणि संभाजीनगरला औरंगजेब याची खबर मात्र मोठी होत गेली. राजकारण आणि जातकारण करणाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी महाराजांचे नाव वापरले पण महाराजानी निर्माण केलेल्या प्रेरणा पुढच्या पिढीकडे सोपवण्यासाठी काहीच प्रयत्न केले नाहीत किंबहुना अफजलखान वधाचे दृश्य बंदी योग्य ठरवताना त्याला सीमेचा संरक्षक म्हणवण्याइतकी या मंडळींची मजल गेली. उलट जे या महाराजांच्या खऱ्या पुरुषार्थी प्रेरणा जागृत करत होते त्यांना बदनाम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले.

पण आज विक्रांत या स्वदेशी बनावटीच्या नौकेचे राष्ट्राला अर्पण आणि नाविक दलाच्या ध्वजाला पुनर्चित करून मोदी सरकारने एक इतिहास घडवला आहे. एकीकडे तेजस 2 या स्वदेशी लढाऊ उत्पादनाला गती देताना दुसऱ्या बाजूने नाविक दलातील ही घटना खूप प्रेरक, आश्वासक आणि आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीत महत्वपूर्ण टप्पा ठरणारी घटना आहे. यातून देशाचा आत्मविश्वास आणि आत्मगौरव वाढण्यास मदतच होणार आहे. अर्थात यामुळे मोदी विरोधाचे डोस पिऊन आपली उपजीविका करणारे नेहमीप्रमाणे अस्वस्थ होत त्यांना जी गरळ ओकायची ते ओकत आहेत. पण देशातील आम जनता मोदीजी आणि त्यांचे सहकारी भारताला व्यवस्थेच्या, सत्तेच्या माध्यमातून जी मानसिक स्वातंत्र्याची अनुभूती देत आहेत त्याने सुखावत आहेत आणि देशाच्या अमृत काळाची हीच खरी सुरुवात आहे.



लय भारी
## सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# पंचखाद्य

आधुनिक केसरी

बाप्पा येणार म्हटलं की वातावरण कसं भारी होतं... आल्यावर तर सगळं घर आनंदाने भरून जाते... वेगळ्याच सकारात्मक लहरींचे वलय निर्माण होते...





रिती, परंपरा सजावट, मखर, लाइटिंग, हार, फुले, दुर्वा नैवेद्य... दिवस कसा भरून जाणारा... विघ्नहर्ता आणि बुद्धीची देवता म्हणून कुठल्याही समारंभात आधी गणेशाचं पूजन करण्याची प्रथा आपल्याकडे आहे. गणपती बाप्पा हे सगळ्यांच्या सोयीनं आपला मुक्काम ठेवतात. कुणाकडे दिड दिवस, पाच दिवस, तर खुप जणांकडे दहा दिवस असा सगळ्यांच्या पद्धतीने गणपती बाप्पा त्या-त्या घरी राहातो. या दिवसात घरोघरी सकाळ-संध्याकाळ आरती, घंटा, टाळ, टाळ्यांच्या आवाज ऐकू येतात. आरतीनंतर प्रसाद तर हवाच. आज आपण परंपरागत "पंचखाद्य" ची रेसिपी बघणार आहे. त्यात खरंतर खोबरे खसखस, खारिक, खडीसाखर, बदाम हेच मुख्यतः वापरतात.

**पंचखाद्य**

**साहित्य –** एक वाटी खिसलेले खोबरे, चार ते पाच चमचे कल्पी खडीसाखर, आठ ते दहा खारका, पाच ते सहा बदाम, चार ते पाच काजु, दोन चमचे खसखस, एक -दोन वेलदोडयाचे दाणे, खिसमिस ईत्यादी

**कृती –** खिसलेले खोबरे कोरडे कुरकुरीत होईपर्यंत भाजुन घ्यावे. आता त्याच कढईत खसखस भाजुन घ्यावी. खारकेतल्या बिया काढून त्याचे बारीक तुकडे करून घेवून ते पण भाजून घ्यावेत. खोबरे, खारिक व खसखस भाजुन थंड झाले की वेलदोड्याचे दाणे कुटून घ्यावेत व त्यात घालावेत काजु, बदाम, बारीक तुकडे करून घ्यावेत. आता ही सामुग्री एकत्र करा. त्यात कल्पि खडीसाखर आणी खिसमिस घालावे. पंचखाद्य तयार... ह्याला खिरापत पण म्हणतात प्रसाद म्हणून पंचखाद्य तयार.

# शारीरिक शिक्षणाचा तास सुदृढ व बलवान भारत निर्माण करेल



पूनम सोनवणे
शारीरिक शिक्षण शिक्षिका, नाशिक

आधुनिक केसरी

**नाशिक- २०२० नंतर भारतीय समाजात आरोग्याबाबत बऱ्याच प्रमाणात जनजागृती झाली आणि हा सकारात्मक बदल होणं भारतासाठी अतिशय अपेक्षितच होतं, खरंतर मानवाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावरचं भारतीय समाजाची प्रगती अवलंबून आहे, विकसित राष्ट्रांनी शारीरिक व मानसिक आरोग्याला दिलेलं महत्व हे त्यांच्या विकासासाठी कारणीभूत ठरले असं मला वाटतं. कारण लोकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहील तेव्हांच ते तन,मन,धन आणि शरीराने विविध क्षेत्रात सहभागी होत आपलं योगदान देऊ शकतील व त्यामुळे देशाचा सर्वांगीण विकास होईल आणि आपला भारत देश सुदृढ व बलवान होईल. आजच्या धावपळीच्या जीवनात मानवाच्या दैनंदिन जीवनशैलीत आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो, २१ व्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडियाचा वाढता अवलंब, तंत्रज्ञानाची वाढती गरज, आहाराकडे सतत होणारे दुर्लक्ष, मानवाच्या सवयीमध्ये झालेला बदल, आरामदायी जीवनशैलीचा वाढलेला दर्जा अशा विविध प्रकारे मानवाच्या जीवनशैलीत बदल झाल्यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्यावर बऱ्यापैकी परिणाम झाला आहे. आणि सध्या स्थितीत मानवाचे आरोग्य हे काचेच्या भांड्यासारखं झालं आहे असं म्हटलं तर हरकत नाही आणि ते टिकवून ठेवण्यासाठी मानवाचा संघर्ष म्हणजे आज तारेवरची कसरत ठरलेली आहे.**

असो पण आज समाजात शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत होणारी जनजागृती ही देशाच्या विकासासाठी अतिशय सकारात्मक बाजु ठरेल आणि आपला भारत देश जगात सुदृढ व बलवान देश म्हणून महासत्ता बनेल यात शंका नाही पण त्यासाठी शालेय स्तरावर शारीरिक शिक्षणाचा वाढता अवलंब करणं गरजेचं ठरेल.

खरंतर शारीरिक व मानसिक आरोग्याविषयीची वाटचाल ही शालेय स्तरापासूनचं झाली पाहिजे,शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना दररोज ३० मिनिटे किंवा १ तास शारीरिक शिक्षण तासिकाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक सक्रिय ठेवलं तर सुदृढ व बलवान भारताचे स्वप्न १००% साकार होऊ शकेल, त्याचबरोबर शालेय स्तरावरुनचं फिटनेस बाबतीत समाजात जागरूकता निर्माण व्हावी यासाठी शारीरिक शिक्षणाचा पाया शालेय स्तरावर मजबूत करणं महत्वाचं आहे असं मला वाटतं,आज भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींजीच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रीडा क्षेत्र हे उंचावलं आहे यात कोणतीही शंका नाही,खेलो इंडिया या शालेय उपक्रमांमुळे ग्रामीण भागात खेळांचे महत्त्व समजू लागले आहे,शहरी भागात घरा-घराघरात खेळाडू होऊ पाहत असल्याने आपो-आप फिटनेस बाबतीत भारतीय लोकांमध्ये जागृत भूमिका होत असल्याचे समोर येत आहेत,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय खेळाडूंची कामगिरी सुध्दा उंचावली,भारतीय खेल प्राधिकरणात झालेले सर्व बदल हे आधुनिक युगात खेळाडूंच्या दुष्टीने अधिक फायदेशीर ठरत आहे,विविध क्रीडा संघटना बळकट व्हाव्या यासाठी सकारात्मक पाऊले उचलली जात आहे,आंतरराष्ट्रीय स्तरावर योगाचे महत्त्व पटवण्यासाठी केलेले संपूर्ण प्रयत्न १००% यशस्वी झाले आणि FIT INDIA MOVEMENT च्या माध्यमातून समाजात फिटनेस क्रांतीची ज्योत पेटवली आणि ती ज्योत *"भारताला सुदृढ व बलवान महासत्तेच्या दिशेने घेऊन जाणारी असेल."* आज जर्मनी, ब्रिटन,जपान,रशिया,स्पेन,चीन ह्या देशांची प्रगती जलद व बलाढ्य स्वरूपाची होत असतांना ह्या देशांनी आपल्या समाजाला सुदृढ व बलवान ठेवण्यासाठी *"फिटनेस क्रांती अर्थात फिटनेस बाबतीत अभियान"* राबविल्यामुळे तेथील लोकांचे जीवमान उंचावत त्याचे आरोग्य तंदुरुस्त आणि सुदृढ आहे यात अजिबात शंका नाही,भारतीय क्रीडा मंत्रालयाच्या माध्यमातून २०१७ पासून FIT india ह्या उपक्रमाची अप्रत्यक्ष बीजे रोपत २०१९ मध्ये FIT india movement ची सुरूवात झाली आणि ह्या उपक्रमाला २०२० मध्ये १ वर्षे पूर्ण होत करोडो लोकांपर्यंत fit india हा उपक्रम पोहचला आणि या उपक्रमाला भारतीय लोकांनी सकारात्मक प्रतिसाद देत *"फिटनेस क्रांती अर्थात फिटनेस अभियानाची सुरवात भारतात होत भारत सुदृढ व बलवान महासत्तेच्या दिशेने वाटचाल करतांना जाणवत आहे."* Fit India dialogue ह्या ऑनलान उपक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते क्रीडा मंत्रालयाने तीन वयोगटातील व्यक्तीसाठी तयार केलेले प्रोटोकॉल बुक ऑनलाइन प्रकाशित करण्यात आली यात ५ ते १८ , १८ ते ६५, ६५+ ह्या तीन वयोगटातील प्रोटोकॉल ह्या पुस्तकात दिलेली आहेत WHO(जागतिक आरोग्य संघटना) ने ह्या प्रोटोकॉलची स्तुती करत *Fit india* ह्या महत्वाकांक्षी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. Fit india उपक्रमा-अंतर्गत देशात अनेक वेगवेगळ्या



स्वरूपाचे कार्यक्रम यशस्वी झाले,महामुर्ख कोरोना काळातही अनेक लोकांनी स्वतःला फिट ठेवण्यासाठी घरातील साहित्याचा वापर करत,घरात,घराच्या छतावर विविध व्यायामाधारीत हालचाली करत स्वतःला फिट ठेवण्यासाठी अनेक लोकांनी यशस्वी प्रयत्न केले,कोरोनावर मात करायची असेल तर स्वतःची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवणे हाचं एकमेव पर्याय लॉकडाऊनच्या काळात व आताही आहे,पोषक-संतुलित आहार, सक्रिय व सुरक्षित व्यायाम हे मानवाचे आरोग्य उत्तम ठेवतात यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केला पाहिजे.... खरं तर २१ व्या आधुनिक शतकात मानव हा तंत्रज्ञानाचा वापर इतका करू लागला की त्या तंत्रज्ञानाचा थेट परिणाम आरोग्यावर होतांना दिसत आहे. रक्तदाब,डायबिटीज असेल किंवा ह्रदयाचा समस्या असतील असे अनेक रोग-आजार जन्माला येत मानवाच्या आरोग्याला हानी पोहचवत आहे,रासायनिक खतांचा अतिवापर होत आहाराचा प्रभाव आरोग्यावर विष सारखा होऊ लागल्याने मानवाचे आरोग्य हे संकटात आहे,अनेक क्षेत्रात ५५% च्या वरती आधुनिकीकरण झाल्याने मानवाला मानसिक ताणतणावाच्या समस्या निर्माण होऊ लागल्याने हे भारतीय समाजासाठी धोक्याची सूचक घंटा आहे" हे लक्षात घेऊन "Fit india ह्या उपक्रमाला प्रतिसाद देणे अति महत्त्वाचे आहे. Fit india dialogue ह्या ऑनलाइन कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिटनेसच्या जो मंत्र दिला त्या मंत्राची सक्रिय सुरुवात शालेय स्तरापासून झाली तर भारत देशाला सुदृढ व बलवान होण्यापासून कोणीच रोखू शकणार नाही.*

त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीने रोज ३० मिनिटे किंवा १ तास शारीरिक हालचाली व सक्रिय व्यायाम केला तर आरोग्याच्या समस्या निर्माण होणार नाही,रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत होत स्वतःचा फिटनेस राखण्यास आपण यशस्वी राहणार असे अनेक वेळा आरोग्य मंत्रालयाकडून,क्रीडा मंत्रालयाकडून व जागतिक आरोग्य संघटनाने सांगितले आहे. खरंतर शालेय स्तरावर शारीरिक शिक्षणाच्या तासिका १००% राबविल्या तर FIT INDIA MOVEMENT ला १००% चालना मिळत सुदृढ व बलवान समाज निर्माण होईल यात शंका नाही. शालेय विद्यार्थ्यांना फिटनेस बाबतीत जागृत केलं तर हे शालेय विद्यार्थी आपल्या परिवारातील सदस्यांना फिटनेसबाबतीत जागरूकता निर्माण करण्यास यशस्वी ठरतील, माजी केंद्रीय क्रीडामंत्री श्री. किरण रिजुजी यांनी शालेय स्तरावर क्रीडा हा विषय अनिवार्य करण्याचे जरी संकेत दिले होते तरी क्रीडा हा विषय अनिवार्य न करता शारीरिक शिक्षण हाचं विषय अनिवार्य करत १००% राबवा आणि शारीरिक शिक्षणाच्या तासिका वाढवा जेणेकरून क्रीडामय वातावरण शालेय स्तरावर निर्माण होत फिटनेस विषयी विद्यार्थी जागृत होतील कारण क्रीडा हा विषय राबविला तर शालेय स्तरावर वर्गातील ६० विद्यार्थ्यांमधून १५ विद्यार्थ्यांचा समावेश होईल.

आणि शारीरिक शिक्षण ह्या तासिकेत वर्गातील ६० विद्यार्थ्यांमधील ६० विद्यार्थ्यांचा समावेश होतो हे लक्षात घेऊन शालेय स्तरावर शारीरिक शिक्षण हा विषय अनिवार्य करत सुदृढ व बलवान भारत निर्माण करण्यासाठी शासनाने अधिक प्रभावी अंमलबजावणी करावी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या " फिटनेस का डोस, आधा घंटा रोज" या मंत्राचा विसर न पडू देता शालेय स्तरावर शारीरिक शिक्षण मजबुत करण्यासाठी योजना आखाव्या.

# देशाच्या विकासात शिक्षकांची भूमिका...



दीपक मुरलीधर उमाळे
संपर्क क्र : 9921246261

आधुनिक केसरी

**ज्या देशातील नागरिक शिक्षित तो देश लवकर प्रगती करू शकतो. सुशिक्षित नागरिक एखाद्या देशाचे भविष्य निर्माण करू शकतात म्हणूनच ज्ञानदानाची जबाबदारी पार पडणाऱ्या शिक्षकांवर पर्यायाने राष्ट्र निर्मितीचे आवाहन आहे. राष्ट्रनिर्मितीच्या महत्प्रयासाच्या कार्यात मुलांना घडविण्याचे कार्य करणाऱ्यांना आपण गुरु, अध्यापक, शिक्षक या नावाने संबोधत असतो पण खरंच तो शिक्षक जर आदर्श असला तर त्या देशातील मुलं घडतील व पर्यायाने राष्ट्रनिर्मितीला विलंब लागणार नाही.**

भारतात प्राचीन काळापासूनच शिक्षकांकडे सन्मानाने बघितले जाते कारण प्राचीन काळात चाणक्य सारख्या शिक्षकाने आपल्या कर्तव्याचे तंतोतंत पालन करत चंद्रगुप्त मौर्य सारख्या साधारण बालकाला सम्राट बनवण्याच्या योग्य बनविले यावरून शिक्षकाचे महत्त्व अधोरेखित होते. प्राचीन काळापासून तर आजतागायत ज्ञानदानाचे कार्य योग्य आणि परिपूर्ण व्यक्तींनाच सोपवल्या गेले आहे. असे म्हणतात आदर्श शिक्षक हा जन्मालाच यावा लागतो कारण आदर्श शिक्षक हा पुस्तके वाचून निर्माण होऊ शकत नाही तर त्याच्या अंगी आदर्शत्वाचे उपजत गुण असले पाहिजे. बालकांच्या हेड, हार्ट आणि हॅन्ड चा विकास करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते परंतु हे जरी फक्त 'थ्री एच' दिसत असले तरी या मूल्यांची रुजवणूक बालकांमध्ये करण्यासाठी तो शिक्षक निश्चितच आदर्श असावा लागतो. आदर्श शिक्षक हा कायम विद्यार्थी असावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे, "मनुष्य आयुष्यभर जरी शिकत राहिला तरी तो ज्ञान सागराच्या कडेला असलेल्या गुडघाभर पाण्यापर्यंतच पोहचू शकतो" या उक्तीला शिक्षक सुद्धा कसा अपवाद असू शकेल बरं ! हे तंत्रज्ञानाचे युग आहे त्यामूळे स्वतःच्या व्यवसायिक विकासासाठी शिक्षक सतत झटत असला पाहिजे. काळानुसार शिक्षक काने सुद्धा स्वतः ला बदलवायला पाहिजे.

नवनवीन तंत्रज्ञान, डिजिटल शैक्षणिक साधणे, ई. लर्निंग चा वापर करून आपल्या विद्यार्थ्याला आजच्या स्पर्धेच्या युगात जो टिकवेल व यशस्वी बनवेल तो खरा आदर्श शिक्षक. वर्ग अध्यापन करताना आपल्या विषयाचे सखोल ज्ञान त्याला असावे पूर्वतयारी करूनच शिक्षकाने आपल्या तासिकेची सुरुवात करायला हवी. विद्यार्थी निरंतर शिक्षकांचे अनुकरण करत असतात त्यामुळे वर्गात अध्यापन करताना शिक्षकांनी खरे व वास्तववादी विचार मुलांसमोर मांडावे. विविध उदाहरणांसह रंजक पद्धतीने विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे द्यायला पाहिजे. शिक्षक हा सभ्य समाजाचा निर्माता असतो जसा कुंभार मातीला आकार देऊन सुंदर मडके घडवितो तसे शिक्षक सुद्धा बालकांमधील दुर्गुण दूर करून त्यांना सुंदर बनवितात म्हणून आदर्श शिक्षक हा सुद्धा प्रामाणिक व स्वभावाने विनम्र असला पाहिजे. शिक्षक हा स्पृश्य-अस्पृश्यतेता मारणारा नसावा, निःपक्षपातीपणा, चिंतनशीलता, आत्मविश्वास इ.गुण त्याच्या अंगी असावे. सर्वांना समानतेची वागणूक देऊन त्याग, करूणा, सहनशीलता ईमानदारी, सदाचरण इत्यादी मुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणारा असावा. शिक्षक हा सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारा असावा कारण बरेच वेळा वर्ग अध्यापन करताना काही विद्यार्थी हे अभ्यासात मागे राहतात अशा विद्यार्थ्यांच्या प्रति सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांना इतर हुशार विद्यार्थ्यांसोबत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन सर्वांना सोबत घेऊन पुढे चालणारा असावा.

शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या मित्र, मार्गदर्शक व सल्लागार असतो त्यामुळे शिक्षक हा चरित्र संपन्न, शीलवान, निर्व्यसनी व आदर्शाचे पालन करणारा असावा. शिक्षक नेहमी शिस्तप्रिय व वेळेचे बंधन पाळणारा असावा. शिक्षक जसा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो तसा तो समाजाला सुद्धा मार्गदर्शन करणारा दुवा असतो. अध्यापन करताना शिक्षकाने आपले वैयक्तिक मत विद्यार्थ्यांवर लादू नये. शिक्षकाची भूमिका ही नेहमी अंधश्रद्धा निर्मूलनाची असली पाहिजे. शिक्षक हा विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेणारा असावा कारण जोपर्यंत विद्यार्थी बोलणार नाहीत तोपर्यंत त्यांच्या चुका लक्षात येणार नाहीत जेणेकरून त्यांना योग्य, अचूक मार्गदर्शन करता येईल. शिक्षकाची भूमिका नेहमी सुलभकाची असली पाहिजे. शिकणे व शिकविणे ही जरी नैसर्गिक प्रक्रिया असली तरी मुलं आजूबाजूच्या परिसरातुन, वातावरणातुन सुद्धा बऱ्याच गोष्टी शिकत असतो त्यामुळे शिक्षकाने विद्यार्थ्यांना योग्य, अयोग्याची सतत जाणीव करून द्यावी.

एकंदरीत शिक्षकाचा व्यवसाय हा जगातील सर्वोत्तम व आदर्श व्यवसाय मानला जातो कारण तो केवळ व्यवसाय नसून ते एक कर्तव्य सुद्धा आहे शिक्षकांनी निस्वार्थीपणे एखाद्याचे आयुष्य घडविण्यासाठी सेवा दिली तर त्याच्या समर्पित कार्याची तुलना इतर कोणत्याही कामाशी होऊ शकणार नाही खरच जो शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये संयम, सहिष्णुता, प्रामाणिकपणा, राष्ट्रप्रेम इ. मूल्य रुजवेल तोच खरा आदर्श शिक्षक व तेंव्हाच तो देश विकसित देश म्हणून नावारूपास यईल एवढे मात्र खरे !

# गौरी-गणपती उत्सव आनंदाचा-सुखाचा



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301


आधुनिक केसरी

**जगातील सगळ्यात प्राचीन दुरदृष्टी असणारी व सर्वश्रेष्ठ अशी संस्कृती म्हणून आपल्या भारतीय संस्कृतीचा नामोल्लेख केला जातो. आणि ते वास्तविक सत्य आहे. अनेक नानाविध गुण वैशिष्ट्याने नटलेली विविधतेत एकतेचे प्रदर्शन घडविणारी अनेक सण-उत्सवांची खाणं असणारी आपली संस्कृती व परंपरा. त्याचे आपण सगळे आजही अगदी मनोभावे धार्मिक पद्धतीने पालन करून सण उत्सव साजरे करतो. या अविस्मरणीय सणांतून जो अप्रतिम आनंद निर्माण होतो. त्यांचे भागीदार होण्याचे भाग्य आपणा सगळ्यांना लाभलं हाच आनंद खुप विशाल असतो. एकंदरीत आपले जे सर्व सण-उत्सव साजरे करतो. त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, आध्यत्मिक महत्व हे वेगवेगळे आहे. पण त्यामधील आनंद मात्र सारखाच आहे.**

आपल्या संस्कृतीनुसार प्रत्येक सण-उत्सवांचे स्वरूप व परंपरा ही वेगवेगळी असुन देशाच्या विविध भागात आपआपल्या प्रथेनुसार सर्व जण सण-उत्सव साजरे करतात. या सर्व उत्सवाचे अलौकिक असे आध्यत्मिक महत्व आहे. अगदी अनेक वर्षापासून म्हणजे पुरातन काळापासून आपण व आपल्या पिढ्या न पिढ्या हे धार्मिक सण उत्सव अगदी उल्हासामध्ये सर्व सुख दुःख, भेदभाव, कटुता, राग, द्वेष, विसरून अगदी आनंदात मग्न होऊन तल्लीन होऊन साजरे करतो. हेच भारतीय संस्कृतीच महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

एकदा गणपती बाप्पाचे आगमन झाले की मग काय आनंदाला पारावार उरत नाही. आणि त्यामध्ये लगेच आगमन होते ते गौराईचे....! आणि मग तर घरोघरी उत्सव. काय ती लगबग, काय तो आनंद काय तो उत्सव, सगळं काही स्वर्ग सुख निर्माण करणारच. भौतिक सजावट किती सुंदर आणि आकर्षक करता येईल. यासाठी अखाडे-अराखडे आणि बेत तर अप्रतिमच आसतात. त्यातही गौराई या लक्ष्मीच्या पावलांनी येतात. मग तर सगळं विलक्षणच भन्नाट. गौरीच्या स्वागताला अख्खं कुटुंब लहान-थोर अगदी लगबगीने गौराईला आपल्या घरात आणतात. मग सुरुवात होते ती गौराई यांच्या सजावटीची. सजावट, आकर्षक अभुषणे, वेगवेगळे साहित्य आणि धनधान्यांच्या राशी, विविध फळे, गौरवशाली गौराई समोर अगदी विलक्षण दृश्य, त्यानंतरची मग गोराईची भोजन व्यवस्था. आपल्याकडे साधारणतः तीन दिवस गौराई असतात.

पहिल्या दिवशी आगमन, दुसऱ्या दिवशी भोजन, आणि तिसऱ्या दिवशी आपण गौराईना आनंदाने निरोप देतो. आणि पुढच्या वर्षी परत येण्याचं निमंत्रण देतो. पहिला दिवस येण्याचा उत्सव, दुसऱ्या दिवशी मात्र सकाळी अगदी चाहपाणी-नाष्टा, दुपारी अल्पोपहार, आणि संध्याकाळी मात्र भव्य-दिव्य असा उत्सव म्हणजे पंच वा अष्टपक्वानी भोजन सोहळा. सगळ्या पद्धतींचे मिष्टान्न, आणि वेगवेगळ्या पद्धतीच्या राण भाज्या, ज्यामध्ये पंधरा-सोळा प्रकारच्या राण भाज्या समाविष्ट असतात. आणि वेगवेगळ्या पद्धतीचे फराळ साहित्य, करून अगदी मनोभावे



पुजन करून दिप प्रज्वलन करून गौराईंची पुजा करून पक्वान्नांचा नैवेद्य दाखवला जातो. दरम्यान गौराई यांच्या डोक्यावर हरळी, आघाडा, याची पेंढी करून डोक्यावर ठेवली जाते. हे हरळी-आघाडा अगदी दूरदुर शेतात फिरून शोधून आणावं लागतं. आणि मग आरती करून घरातील लहानथोर मंडळी भोजन गृहण करतात. तिसऱ्या दिवशी घरोघरी गौरी पाहण्यासाठी महिलांची झुंबड उडालेली असते. जशी पंचमीला झोका खेळण्यासाठी आणि भुलईसाठी असते. मग अख्खा दिवस आणि मध्यरात्री पर्यंत गौराई दर्शन. हा असा अप्रतिम सोहळा अशा पद्धतीने साजरा केला जातो. आणि मग भक्तीभावाने आरती करून गौराई यांना निरोप दिला जातो.

आपल्या संस्कृती नुसार एकता, मानवता, वृद्धिंगत करण्याबरोबरच आनंदी क्षणाची पर्वणी यानिमित्ताने आपल्याला मिळते. आणि संस्कृती व प्रथा परंपरा ह्या किती मजबूत आहेत याच दर्शनही यामधुन घडतं. अगदी गरीब, श्रीमंत, लहान-थोर प्रत्येकाच्या घरी गौरी-गणपती असतात आणि मग प्रत्येकजण आपापल्या ऐपतीप्रमाणे व्यवस्था करून गौरी-गणपती यांच आदरातिथ्य करतो. आपल्या संस्कृती मधील हा विलक्षण आणि आनंदी क्षण आहे. आपण सगळेच दर वर्षी प्रमाणे याही वर्षी वाट पाहत असतो. तो क्षण काल आलेला आहे. आज त्याचा दुसरा दिवस. तेंव्हा आपली संस्कृती, परंपरा आणि आपला धर्म मजबुत करण्यासाठी प्रत्येकाने या आनंदी पर्वाचा हिस्सा होऊन या उत्सवातील आनंद द्विगुणित करयाचा आहे......!!.

# अन् बाप आग्या मोहळाशी भिडला...

आधुनिक केसरी

**मी सातवीला होतो त्या वेळी आमच्या गावात ब्लॅक अँड व्हाईट टी.व्ही. एक दोघांनी नुकतेच घेतले होते अन सारं गाव त्यांच्या घरी टी. व्ही. पाहण्यासाठी जात असे. रविवारची शाळेला सुट्टी असल्यामुळे आई-वडील, दोन्ही भाऊ व गुरुबहिण यांच्यासोबत मी मळ्यात गेलो .नुकतीच पावसाळी बाजरी सोंगून झाली होती व पुढं गहू पेरण्यासाठी बाजरीचे धसकटे वेचून रान तयार करण्याचे काम चालू होते. मळा नदीच्या काठावर असून मळ्यात पेरूचा बगीचा तसेच दहा-बारा आंब्याचे झाडे तसेच काही बोरी बाभळी अन लिंबाच्या झाडांबरोबर इतर ही छोटे मोठे खूप झाडे होती.**

दुपारी आम्हीं सर्व जण पेरूचा बागेत जेवणासाठी गेलो खरे तर मला आंब्याच्या झाडाखाली जेवायचे होते परंतु आई म्हणाली की त्या झाडावर भलं मोठं आग्यामोहळ बसले आहे मग उगीच कशाला जोखीम घ्यायची म्हणून थोडं दूर पेरूच्या बगिच्यात उसाच्या पाचटाची झोपडी जी पावसाळ्यात निवाऱ्यासाठी केली होती तिथं जेवणास बसू म्हणून झोपडीत बसून जेवण केले.. जेवण झाल्यानंतर सर्व जण पुन्हा धसकटे वेचण्याच्या कामाला लागले. रविवारी संध्याकाळी टी.व्ही.वर मराठी चित्रपट असतो म्हणून मी भावासोबत चार वाजता घरी आलो व शेजारच्या घरी जाऊन टी.व्ही.वर मराठी चित्रपट पाहत बसलो.

इकडे मळ्यात पाच वाजेच्या सुमारास बनशिकरया नावाच्या एका मोठ्या पक्ष्याने आंब्याच्या झाडावरील आग्या मोहळाच्या पोळीला चोच मारली व उंच आकाशात पळून गेला पण चवताळलेल्या मधमाश्या इकडे तिकडे पाहू लागल्या व त्यांना असे वाटले की खाली जवळ शेतात काम करीत असलेल्या याच माणसांनी दगड मारला म्हणून त्यांनी माझे आईवडील भाऊ व गुरुबहीण यांचा चावा घ्यायला सुरुवात केली.

जीवाच्या आकांताने हे सर्वजण ओरडत होते पण जवळच्या शेतात काही शेतकरी असूनही मदतीला येऊ शकत नव्हते कारण मधमाश्या चवताळून इकडे तिकडे फिरत होत्या.. वडिलांनी क्षणांचा विचार न करता पेरूच्या बागेत असलेल्या झोपडीत पळण्याची सूचना करून सर्व जण वरून मधमाश्या डसत असतांना पळत पळत झोपडीत आले पण तिथं ही या माश्या मागे लागून आल्या तर आता खिशातून आगपेटी की जी बिड्या पिण्यासाठी सोबत असायची ती काढून उसाच्या पाचटाची झोपडी पेटवून देण्यासाठी खिश्यात हात घालणार तर पाहतो तर सदरा त्याच ठिकाणी काढून ठेवला होता व त्यात मधमाश्याचा हल्ला चालू तर या भयाण परिस्थितीत डोळ्यावरील मोठमोठ्या मधमाश्या हाताने झटकून वडिल पुन्हा त्या ठिकाणी जिथं सदरा ठेवला होता तिथपर्यंत पळत गेले व आगपेटी घेऊन परत झोपडीत आले अन झोपडी पेटवून दिली.. जंगलात मोठा वणवा पेटावा तसा जाळ आभाळाला शिवत होता शेजारचे तीनचार पेरुचे झाडे त्यात होरपळत होती व इकडे बापाच्या अंगावर आता जागाही शिल्लक राहिली नव्हती मधमाश्याना डसण्यासाठी.... व मोठा जाळ झाला म्हणून त्या तिथून निघून गेल्या... मरणाच्या धास्तीने. शेवटी प्रत्येक जीवाला आपला प्राण प्रिय




असतो..

दुरून ही सर्व घटना पाहणारी माणसे की ते ही खूप घाबरून गेले होते. आता ते जवळ येऊ लागले. आमचे चुलते की ज्यांना आम्ही 'आप्पा' म्हणायचो. त्यांनी बापाच्या अंगावरील बरेच काटे काढले व गाडीबैलात बसवून घरी आणले व आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावी सायकल चालवत डॉक्टरांना आणण्यास गेले. रात्री मोटार सायकलवर डॉक्टर साहेब आले त्यांनी वडिलांना सलायन लावून मेडिकल दिले. बाकी माणसे म्हणजे आई, भाऊ व बहीण यांना कमी माश्या डसल्या होत्या. त्यांच्यावर ही उपचार करून डॉक्टर निघून गेले व आप्पांना जातांना सांगितले की वडिलांना तात्काळ पुढील उपचारासाठी दवाखान्यात घेऊन या.. इकडे वडिलांना आता थोडं बरं वाटू लागलं पण अंगाची खूप आग होत होती.. आप्पा म्हणाले की आता दवाखान्यात जायचे पण वडील म्हणाले की आता बरं वाटतं उद्या सकाळी लवकर जाऊ.. म्हणून आप्पाचा नाईलाज झाला.

आप्पानी भल्या पहाटे गाडीला बैल जुंपले व थेट वडिलांना घेवून सकाळी दवाखान्यात पोहचले.. डॉक्टर रामभक्त असून श्रीरामाच्या मंदिरात पूजेसाठी निघाले होते पण वडिलांना पाहताच थांबले त्यांच्यावर पुन्हा उपचार केले व रागावून आप्पांना म्हणले की मी रात्री तुमच्या कानात सांगितले होते की पेशंट गंभीर असून रात्रभर उपचार करून ही जगण्याची आशा नाही कारण संपूर्ण शरीरात विष गेले आहे. अन असे असूनही पेशंट रात्री दवाखान्यात न आणणे हे बेजबाबदारीचे लक्षण आहे..

अन तरी ही डॉक्टरांना आनंद झाला की पेशंट जगले अन ते बोलून गेले की आज खऱ्या अर्थाने श्रीरामाची केलेली भक्ती सफल झाली... कारण जिथं मधमाश्याच्या विषारी चाव्याने ढोरंगुरं ही जगत नाही तिथं माणूस जगला होता.

ज्ञानेश्वर गायके
कन्नड, मो. ९४०३३८४८८९




# चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत


आधुनिक केसरी

**अ) गणिताची मूलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार**



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

**15) अपरिमेय संख्या** : अपरिमेय संख्यांचे दोन प्रकार पडतात.
i) साध्या अपरिमेय संख्या : ज्या संख्यांचे वर्गमूळ काढता येत नाही (निघत नाही) अशा संख्यांना साध्या अपरिमेय संख्या म्हणतात.
उदा. J5, J29, J41, J91 ... इत्यादी.
**ii) दशांश रुपातील अपरिमेय संख्या :** ज्या संख्यांचे दशांशरुप अखंड असते परंतु आवर्ती नसते, अशा संख्यांना दशांशरुपातील अपरिमेय संख्या म्हणतात.
उदा. J10 = 3.162277660168379...




**16) वास्तवसंख्या** : परिमेय संख्या आणि अपरिमेय संख्या मिळून ज्या संख्या तयार होतात, त्यांना वास्तवसंख्या म्हणतात.
म्हणजे धन, ऋण, शून्य, अपूर्णांक, अपरिमेय यांचा समावेश असतो.
उदा. 15, -7, 3/5, 0, J26 ... इत्यादी.

**ब) गणिताची मूलभूत संकल्पना प्रश्नसंच :**
1) वर्गमूळ काढता येत नाही त्या संख्या कोणत्या ?
2) दशांशरुपातील अपरिमेय संख्यांची व्याख्या सांगा ?
3) वास्तव संख्यात कोणकोणत्या संख्या असतात ?
4) J49 ही अपरिमेय संख्या आहे का? सकारण सांगा ?
5) 2.01001000100001... ही कोणत्या प्रकारची संख्या आहे ?
6) 8, 7/12, -27, 0, J33 या संख्यांचा समावेश कोणत्या संख्येच्या प्रकारात होतो ?

**क) उखाणा :**
1) पत्नी शब्दाला कांता हा समानअर्थी शब्द वापरतात, ज्या संख्येचे वर्गमूळ काढता येत नाही, त्या अरिमेय संख्या असतात.
2) प्रघात शब्दाला रीत हा समानअर्थी शब्द वापरतात, परिमेय आणि अपरिमेय संख्या मिळून तयार होणाऱ्या संख्यांना वास्तव संख्या म्हणतात.
**ड) कविता - 11 क्रमांक**

(क्रमशः)

# साथीच्या आजारांपासून जनावरांच्या बचावासाठी लसीकरण नितांत गरजेचे



आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड :** लंपी हा स्कीन आजाराचा मोठ्या प्रमाणात जिल्ह्यात प्रसार होऊ नये म्हणून अंबाजोगाई, परळी, आष्टी, शिरूर कासार, पाटोदा या तालुक्यातील जनावरांचे बाजार भरवण्यासाठी पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे. तसेच जनावरांच्या वाहतुकीवर निर्बंध घातले आहे, याबाबत जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी आदेश दिले आहेत.

**आर्ध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात "लंपी" ची साथ**

बीड जिल्ह्यातील आर्ध्याच्या वर भागात मोठ्या प्रमाणात जनावरात विशेषतः गाय व म्हैस वर्गामध्ये "लंपी स्कीन" या विषाणूजन्य रोगाची लागण झाल्याचे निदर्शनास आले आहे. बीड जिल्ह्यातील धसवाडी ता.अंबाजोगाई येथे लंपी स्कीन या रोगाचे जनावरे आढळून आले आहेत. तसा अहवाल सहायुक्त पशुसंवर्धन रोग अन्वेषण विभाग पुणे यांनी दिला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र सत्येंद्र प्रताप सिंग राज्य पुणे यांनी जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांच्याशी चर्चा करुन रोग नियंत्रण करणेबाबत चर्चा केली आहे.त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके जिल्हा परिषद बीड सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार गटविकास अधिकारी पंचायत समिती, पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त एच.पी.बोयाळ जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख तसेच पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती सर्व यांच्याशी लंपी स्कीन या आजारावर नियंत्रण प्रतिबंधात्मक उपाय, उपचार घ्यावयाची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले असून, यंत्रणेने पशुपालकांमध्ये या आजाराबाबत जनजागृती करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत. सर्व यंत्रणेने वरील निर्बंधाचे पालन करण्यासाठी जिल्हाधिकारी बीड यांनी आवाहन केले आहे. व पशुपालकांनी पशुधनाची काळजी घेणे बाबत खालील प्रमाणे कळविले आहे.

**अशी घ्यायची जनावरांची काळजी : एच.पी.बोयाळ**

सदरचा आजार हा डास, माशा, गोचीड, चिलटे मार्फत प्रसारित होत असल्यामुळे बाधित पशुधन हे इतर पशुधनापासून वेगळे ठेवण्यात यावे. बाधित पशुधन इतर पशुधनासोबत एकत्र चालण्यास व पाणी पिण्यास सोडू नये. बाधित पशुधनाच्या अंगावर 40 मि.ली. नीमतेल व करंजतेल सम प्रमाणात 10 लिटर पाण्यात साबणाच्या भुकटी सोबत द्रावण करून लावावे. डास, माशा, गोचीड, चिलटे निर्मूलनासाठी सायफारमेथ्रीन, डेल्टामेथ्रीन किंवा इतर कीटकनाशके उदाहरण इथर 20 टक्के क्लोरोफार्म फोर्मालीन 1 टक्का, फेनोल (2%--15 मिनिट), सोडियम हायपोक्लोराईट (2-3 %), आयोडीन कंपाऊंड (1.33 द्रावण ) आणि अमोनिया कंपाऊंड (0.5% ) ची गोठ्यात व परिसरात फवारणी करावी. अशा पद्धतीने एकंदरीत आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी असे आवाहन पशुसंवर्धन उपआयुक्त बोयाळ यांनी केले आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे किटकनाशक फवारणीसाठी ग्रामपंचायतींना सक्त आदेश**

जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी कीटकनाशके फवारणीसाठी लागणारा निधी ग्रामपंचायत मार्फत उपलब्ध करून देण्यासाठी सर्व ग्राम विकास अधिकारी /ग्रामसेवक यांना जिल्हाधिकारी यांनी आदेशीत केले आहे. आपल्या गावात किंवा परिसरात या रोगाचे रुग्ण आढळून आले असल्यास तातडीने दवाखाना किंवा ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा असे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी विजय देशमुख जिल्हा परिषद बीड यांनी केले आहे....!



विद्यानगर भागातील विजयनगर येथे ज्या भागात गेल्या अनेक वर्षाणुवर्षे जलवाहिनी नव्हती. त्या ठिकाणी जलवाहिनी टाकण्याचा कामाचा शुभारंभ जागृत हनुमान ट्रस्ट चे अध्यक्ष अर्जुन गायके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विधानसभा संघटक रेणुकादास वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रसिद्ध उद्योगपती जागृत हनुमान ट्रस्टचे अध्यक्ष अर्जुन गायके यांच्या वाढदिवसानिमित्त रेणुकादास वैद्य यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वश्री नंदकिशोर वर्मा, पंजाबराव तौर, मनीष चिचाणी, आंनदजी लाहोटी, ओमप्रकाश अग्रवाल, सुशील सिंग, डॉ.तुषार इधाटे, सुरेश रोटे, श्रीकांत रापतवार, सुरामराव घुगे, हिरामन पाटील, प्रसाद साडेकर, विजय पाटील, प्रमोद कुलकर्णी, आदित्य राणा, बी.पी.सरकटे, जयप्रकाश जाजू, गंगाधर बोंगाने, अनिता बोंगाने, राजु चव्हाण, अल्पसंख्यांक संघटक अखिल भाई शेख, दत्ता निंबाळकर, राम केकान, कैलास तिवळकर, गणेश कांबळे, पियुष कोयाळकर, बंटी कचकुरे आदींची उपस्थिती होती.

# सुवर्णा पवार साहित्यरत्न गौरव पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**इचलकरंजी :** भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच कोल्हापूर-इचलकरंजीच्या उपाध्यक्षा व जेष्ठ कवियत्री सुवर्णा विश्वास पवार यांना भीमक्रांती सोशल फौंडेशन, हरोली ता.शिरोळ या संस्थेच्यावतीने क्रांतीदिन व अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त "भारतीय क्रांतीरत्न- आदर्श महिला साहित्यरत्न गौरव पुरस्कार" जालनाचे माजी आमदार मदनलाल दिगंबर कुलकर्णी यांच्याहस्ते सन्मान चिन्ह व सन्मानपत्र प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व माजी उपसभापती संजय माने, संजय गांधी योजना कमिटीचे रमेश शिंदे, यड्रावचे युवा सरपंच कुणालराजे नाईक-निंबाळकर सरकार, शिरोळचे जेष्ठ पत्रकार व सिनेअभिनेते दगडू माने, व्यसनमुक्तीदुत डॉ.विकास पाटील, गझलकार सिराज शिकलगार, राष्ट्रसेवादलचे बाबासाहेब नदाफ, भीमक्रांतीचे संस्थापक बाळासाहेब कांबळे, दत्तवाडचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवगोंडा पाटील, पत्रकार शिवाजी येडवान, महिला पत्रकार मार्था भोसले, कवयित्री वृशाली होगाडे, प्रा.प्रतिभा पैलवान,



डॉ.राजमा नदाफ, कवि सरकार, साताप्पा सुतार, हास्यसम्राट राजू शेख आदी प्रमुख मान्यवरांसह विविध क्षेत्रातील सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुवर्णा पवार यांच्या महाराष्ट्र, गुजरात, गोवा येथील अनेक कविसंमेलनातील सहभागाची व दैनिक महासत्ता, विविध साप्ताहिक व मासिकामधून प्रसिद्ध झालेल्या कथा, कविता लेखन कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांना सदर पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.



# बाप्पाच्या महाआरती म्हणण्याचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नांदेड सिटीत रोज सर्वत्र घरोघर बाप्पाची रोज महाआरतीची संकल्पना सुरु झाली आहे. साधारण 110 इमारती आणि 15 हजार फ्लॅटमध्ये रहिवासी रहातात. गेल्या तीन वर्षापासून महारतीला सुरुवात झाली 50 ते 60 जण जमून आरती म्हणतात. सुरुवातीला काही घरीच आरती होत होती. आता अनेक इमारती / सोसायटीमध्ये ज्येष्ठ पुरुष व महिला एकत्र येऊन अथर्वशिर्ष, अष्टविनायकाची नावे सर्व आरत्या म्हणतात एका ठिकाणी एक तास हा जल्लोश चालतो. रोज फक्त दोन घरी या आरत्या म्हटल्या जातात. नांदेड सिटीतील सर्व सोसायटीत हा उपक्रम सुरु झाला आहे. एकूण आठ सोसायट्या आहेत.

लोक वस्ती साधारण 50 हजार आहे. पुणे शहरात या उपक्रमाचे खूप स्वागत होत आहे, अशी प्रथा सर्वत्र सोसायटी परिसरात सुरु व्हावी, असा प्रयत्न होत असल्याचे माधव जोशी, नांदेड सिटी, आसावरी प्रभात शाखा सिंहगड रोड, पुणे यांनी सांगितले.

# श्री सरस्वती माध्यमिक शाळेत विद्यार्थी शिक्षक दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ५ सप्टेंबर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिन आपण शिक्षकदिन म्हणून साजरा करतो, त्याच निमित्ताने विद्यार्थी एक दिवस शिक्षकांची, प्राचार्या, उपप्राचार्य, शिपाई यांची भूमिका उत्साहाने पार पाडतात. अनुभवांची शिदोरी सोबत घेवून जीवन पार करतात. याच निमित्ताने सरस्वती माध्यमिक विद्यालय, सिंधुनगर पुणे -४४ या शाळेतील इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन साजरा केला.



त्यांना आलेले अनुभव आपल्या शब्दातून व्यक्त केले आणि विशेष म्हणजे त्यांचे मोठेपनी शिक्षक होण्याचेच स्वप्न आहे. जिवंत व्यक्तींशी संवाद साधता येतो, आपलेपणा अनुभवायला मिळतो, हा अनुभव त्यांनी आज घेतला. या प्रसंगी ज्योती सोनवणे, मोनु पवार, रुपाली शिंदे, श्रावणी भंडारी, भाग्यश्री निलगी, गायत्री पाचारे, तनुजा मलंगनेर, आयेशा मुलाणी, वैभवी रुद्राक्ष, वैभव कांबळे इत्यादी विद्यार्थी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दाभाडे यांनी स्वीकारले, तसेच प्रमुख उपस्थिती शाळेच्या प्राचार्या दातीर, उपप्राचार्य बच्चे, पर्यवेक्षक काळोखे, पर्यवेक्षिका आहेर उपस्थित होते. आहेर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता सातवीचे वर्गशिक्षक चौधरी, भालेराव, बनसोडे, काळे प्रतिमा आणि प्रदीप गायकवाड यांनी केले. विद्यार्थी शिक्षक यांना खाऊ वाटप करण्यात आला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आ. बंब म्हणजे उथळराव, त्यांनी आधी स्वत:च्या मतदारसंघाचा विकास करावा : आ. सतिश चव्हाण

## शिक्षक व पदवीधर मतदारसंघ कायमस्वरूपी रद्द करण्याची आ. प्रशांत बंब यांची मागणी हास्यास्पद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जिल्ह्यातील गंगापूर/खुलताबादचे आ.प्रशांत बंब यानी शिक्षक व पदवीधर आमदारक्या कायमस्वरूपी रद्द करण्यात याव्या, अशी मागणी केली असल्याचे समजते. मात्र आ. बंब यांची ही मागणी हास्यस्पद असल्याचे मत औरंगाबाद पदवीधर मतदार संघाचे आ. सतिश चव्हाण यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.

आमदार बंब यानी आधी विधानसभेत कमी शिकलेले आमदार असायचे त्यामुळे शिक्षक, प्राध्यापकांचे प्रश्न मांडण्यासाठी या मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली होती आता बहुतांश आमदार हे शिकलेले सुशिक्षित आहेत. त्यामुळे शिक्षक, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची गरज राहिलेली नाही, असेही बंब म्हणाले आहेत. मात्र बंब यांनी अगोदर सरकारकडे शिक्षकांची अवांतर कामे बंद करावीत, मुख्यालयी राहण्यासाठी शिक्षकांना त्या गावात भौतिक सोयीसुविधा,



राहण्यायोग्य घरे देण्यासाठी विधानसभेत आवाज उठवला असता तर आत्तापर्यंत हा प्रश्न मार्गी लागायला मदत झाली असती असे सांगून शिक्षकांना मुख्यालयी राहण्याचा अट्टाहास का असाही प्रश्न आ. चव्हाण यानी उपस्थित केला असून शिक्षक कौटुंबिक कारणामुळे मुख्यालयी न राहता शाळेत वेळेवर येत असतील जर शिक्षणाची गुणवत्ता राखत असतील तर शिक्षकांना मुख्यालयी राहण्याचा अट्टाहास का त्यापेक्षा आमदार बंब यानी त्यांच्या मतदारसंघाचा विकास करावा असेही आ.बंब यांना टोला लागवला आहे.

### आ. सतिश चव्हाण यांचे पदवीधारकांसाठी काय योगदान : मीना पांडव

गंगापूर खुलताबादचे आमदार प्रशांत बंब यांनी अनेक योजना गंगापूर/खुलताबाद तालुक्यातील अनेक गावात राबवल्या असून 800 कोटीच्या गंगापूर जलउपसा सिंचन मंजूर केली असून त्यामुळे गंगापूर तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलीताखाली येणार असून आरापूर येथील एम.आय.डी.सी.ची मंजुरी, गंगापूर शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून विकासकामे, कोरोनोकाळात मित्रमंडळी व स्वखर्चाने लासूर स्टेशन येथे सर्व सोयीनियुक्त गीताबन कोव्हीड हॉस्पिटलची व्यवस्था करून हजारो रुग्णांचे प्राण वाचवले, असे एक ना अनेक कामे आ.बंब यांची आहेत मात्र याउलट मराठवाडा पदवीधरचे आ. सतिश चव्हाण यांचे पदवीधारकांसाठी काय योगदान आहे. शिक्षकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी त्यांनी काय केले किंवा त्यांच्याच संस्थेच्या अनेक शाळा व महाविद्यालये यांच्यातून दरवर्षी हजारो युवक/युवती पदवी घेऊन महाविद्यालयातून बाहेर पडतात. लाखो



सुशिक्षित बेरोजगार सध्या मराठवाड्यात फिरत आहे. त्या पदवीधारकांच्या रोजगाराच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी विधानपरिषदेत आवाज उठवला का? त्यांच्या शिफारशीने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळासह इतर सर्व समाजासाठी असणाऱ्या महामंडळाकडून त्यांचेच मतदार असलेल्या किती पदवीधारक युवकांना त्यांनी व्यवसायासाठी आर्थिक साहाय्य मिळवून दिले? किती पदवीधरक बेरोजगारांच्या हाताला काम देऊन नोकरी दिली किंवा त्यासाठी काय प्रयत्न केले याचे आत्मपरीक्षण करावे व आमदार प्रशांत बंब यांच्यावर आरोप करावे, असेही लासूर स्टेशनच्या सरपंच मीनाताई संजय पांडव यांनी खडसावले आहे.

# तालुकास्तरीय कृषी अन्नप्रक्रिया कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** कृषी विभागामार्फत तालुकास्तरीय कृषी अन्नप्रक्रिया कार्यशाळेचे आयोजन दि. ३० ऑगस्ट रोजी कृषि प्रक्रिया जागृती पंधरवडा निमित्य येथे प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत वसंतराव नाईक स्मृति प्रतिष्ठानच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती उपविभागीय कृषी अधिकारी डॉ. पी.जी. नाईक, तालुका कृषी अधिकारी एस.आर. धुळधुळे, प्रमुख मार्गदर्शक, तंत्र अधिकारी अविनाश सूर्यवंशी, जिल्हा संसाधन व्यक्ती सचिन माळकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ कृषी अधिकारी बी.डी.चेके यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन आत्माचे बी.टी.एम. एस.डी. मोरे यांनी केले. बँकेचे शाखा व्यवस्थापन नरेश सहारे यांनी प्रकल्प प्रस्ताव कशाप्रकारे सादर करावा व प्रकल्प प्रस्ताव नामंजूर होण्याची कारणे याबाबत माहिती दिली. उमेदचे तालुका अभियान व्यवस्थापन गौरव कांबळे यांनी महिलाबचत गटांना अर्ज करणेबाबत आवाहन केले. कृषिमित्र यांचे सहकार्य लाभले. या कार्यशाळेला मंडळ कृषी अधिकारी ए.बी. राठोड, व्ही.बी. राठोड, कृषि पर्यवेक्षक एन.बी. नरवाडे, वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी उत्पादक गटाचे लाभार्थी, महिला बचत गटाच्या शेतकरी भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# निसर्ग रक्षणाचा 'श्रीगणेश', गाईच्या शेणापासून बनवल्या पर्यावरणपूरक मुर्ती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा व्हावा यासाठी संदीप अग्रवाल कुटुंबीयांतर्फे शेणापासून गणेश मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. व या मुर्त्या संपूर्ण महाराष्ट्रात वाटप करण्यात येत आहे. आज बाळापुर या गावी श्रीराम मित्र मंडळ व दत्त ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दीपक वाघ यांना प्रथम शेणापासून बनवलेली पर्यावरण पूरक विघ्नहर्ताची मूर्ती देण्यात आली आहे.

ओम श्री ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड चे संचालक संदीप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून निसर्ग रक्षणाचा गायीच्या शेणापासून बनवलेल्या पर्यावरण पूरक असा गणपती बनवण्यात आला आहे व त्या गणपतीचे संपूर्ण महाराष्ट्रात वाटपही करण्यात येत आहे. तर आज बाळापूर येथील श्रीराम मित्र मंडळ व दत्त ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्ते व संदीप अग्रवाल यांचे सहाय्यक माधवराव भगवान पाटील यांच्या हस्ते पत्रकार दीपक वाघ यांना प्रथम पर्यावरण ही पूरक मूर्ती देण्यात आली आहे.

**विसर्जनानंतर झाडांना संजीवनी**



शेणापासून बनविलेल्या गणेशमूर्तीचे विसर्जन नदी किंवा इतर ठिकाणी करण्याची गरज नाही. घरी बादलीभर पाण्यातदेखील विसर्जन करून हे पाणी घरातील झाडांना किंवा बागेतील झाडांना देऊ शकता. यातून झाडांना चांगले शेणखत मिळून संजीवनी मिळते. व गणरायाची विटंबना होणार नाही, अशी माहिती ही माधवराव पाटील यांनी दिली आहे. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते माधवराव भगवान पाटील, पत्रकार दीपक वाघ व प्रवीण पाटील, किरण मराठे, राजेंद्र मराठे, माधव पाटील, स्वप्नील पाटील, राकेश मोतीराळे, भटू पाटील, कल्पेश पाटील आदी यावेळी उपस्थित होते.




# भारताची लॅबग्रोन डायमंड अँड ज्वेलरी प्रमोशन कौन्सिल आणि थायलंडच्या 10,000 कोटींच्या निर्यात व्यवस्थेत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** थायलंडच्या रत्न व आभूषणांना भारतातून वाढती मागणी म्हणून, थायलंडच्या वाणिज्य मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या, डिपार्टमेंट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड प्रमोशन (डीआयटीपी), जेम अँड ज्वेलरी इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे (जीआयटी) प्रतिनिधी आणि थाई ट्रेड सेंटर, मुंबई यांनी संयुक्तपणे, ७ ते ११ सप्टेंबर दरम्यान बँकॉकमध्ये होणाऱ्या ६७ व्या बँकॉक जेम्स अँड ज्वेलरी फेअर च्या आयोजनाला प्रोत्साहन म्हणून "लेट्स गो टू बँकॉक" या विशेष रोड शोचे मुंबईत आयोजन केले. या रोड शो आणि व्यापार मेळासाठी भारतीय ज्वेलर्सच्या मोठ्या मेळाव्यास आमंत्रित करण्यात आले होते.

प्रदर्शनाच्या यंदाच्या आवृत्तीतून २५,००० हून अधिक अभ्यागतांचा प्रतिसाद आणि १,२०० दशलक्ष थाई बाटची कमाई अपेक्षितभारताच्या लॅब ग्रोन डायमंड अँड ज्वेलरी प्रमोशन कौन्सिल (LGDPC) आणि DITP मध्ये देखील दोन्ही देश एकमेकांच्या विशेष संसाधनांचा वेगाने कसा फायदा घेऊ शकतात यावर एक करार झाला. LGDJC 10,000 कोटी किमतीचे लॅब ग्रोन डायमंड्स, गोल्ड, सिल्व्हर आणि रुबीज थायलंडला निर्यात करेल आणि त्या बदल्यात थायलंड त्यांचे माणिक,चांदी आणि पांढरे सोने भारताला निर्यात करेल. हे दोन्ही देशांतील मूळ रहिवाशांना एकमेकांच्या डोमेन कौशल्याचा संपूर्णपणे नमुना घेण्यास आणि कदर करण्यास मदत करेल. थायलंडच्या रत्न व आभूषणांच्या निर्यातीसाठी, विशेषतः चांदीच्या दागिन्यांसाठी भारत ही प्रमुख बाजारपेठ आहे. गेल्या वर्षीपासून या निर्यात व्यापारात +१५८.२१ टक्क्यांच्या दराने वेगवान वाढ सुरू आहे. अनेक सहस्राब्दीपूर्वी जन्मलेल्या अनोख्या संस्कृतीची पार्श्वभूमी हा दोन्ही देशांना सांधणारा मुख्य दुवा आहे. अलिकडच्या वर्षांत म्हणूनच हे दोन्ही शेजारी देश विविध क्षेत्रात उत्कृष्ट बहुपक्षीय आणि व्यावसायिक संबंध वृद्धींगत झाल्याचे अनुभवत आहेत.

डीआयटीपीच्या अलीकडील अहवालानुसार, थायलंडची रत्ने आणि दागिन्यांची निर्यात (सोने वगळता) जानेवारी ते जून २०२२ दरम्यान ३,८८४.२१ दशलक्ष अमेरिकी डॉलर इतकी झाली आहे, जी मागील वर्षाच्या तुलनेत ४०.९६ टक्क्यांनी वाढली आहे. अमेरिका, हाँगकाँग आणि जर्मनी या सारख्या प्रमुख बाजारपेठांपैकी भारतीय बाजाराने सर्वाधिक निर्यात मूल्य निर्माण केले आहे, हिरे, रत्न, मोती, दागिने, सिंथेटिक खडे, मौल्यवान धातू आणि इतर यासारख्या उत्पादनांच्या निर्यातीत भारताने एकूण १४९.२१ टक्के वाढ साधली आहे. अनेक वर्षांपासून बीजीजेएफ मेळ्याला भेट देणाऱ्या देशांमध्ये भारत अग्रस्थानी राहिला आहे. यंदाच्या ६७व्या आवृत्तीसाठीही भारतीय अभ्यागतांची नोंदणी क्रमांक एकवर आहे आणि अद्याप नोंदणी सुरूच आहे. बीजीजेएफ हा विशेषतः भारतीय प्रदर्शकांसाठी एक अतिशय महत्त्वाचा व्यापार मंच आहे.

मुख्यतः शेजारचा देश असल्यामुळे, दोन्ही देशांना केवळ राहणीमान आणि खानपानाच्या सवयींच्या बाबतीतच नव्हे तर फॅशन आणि जीवनशैलीच्या बाबतीतही जवळजवळ समान संस्कृती आणि वारसा लाभलेला आहे. भारतीय खरेदीदार किंवा आयातदारासाठी हे प्रदर्शन थायलंडने अद्वितीयपणे तयार केलेल्या रत्न आणि दागिन्यांच्या नवीनतम श्रेणीत व्यवहाराचे जवळचे आणि तयार व्यासपीठ प्रदान करते. बीजीजेएफ हा केवळ आशियातीलच नव्हे तर जगभरातील सर्वात मोठा रत्न आणि आभूषणांचा मेळा आहे. डीआयटीपीने थायलंडच्या रत्न आणि आभूषण उद्योगाला जागतिक स्तरावर चालना देण्यासाठी सतत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बीजीजेएफ २०२२चे आयोजन इम्पॅक्ट चॅलेंजर हॉल, मुआंग थोंग थानी, बँकॉक येथे होत असून, ८०० हून अधिक प्रदर्शक आणि १,८०० दालनांतून येथे रत्न व आभूषणे प्रदर्शित केली जातील. यंदाच्या आवृत्तीतून १० हजारांहून अधिक अभ्यागत आणि १,२०० दशलक्ष थाई बाट्सची कमाई अपेक्षित आहे. जगभरातील प्रस्थापित खेळाडू आणि उद्योजक थायलंडमधील उत्पादक, खरेदीदार, आयातदार, वितरक आणि निर्यातदारांसह रत्न, दागिने, मौल्यवान खडे, सोने, चांदी ते पॅकेजिंग, उपकरणे, साधने आणि यंत्रसामग्रीच्या सर्व श्रेणींमध्ये व्यावसायिक संबंध जोडण्यास उत्सुक असतील.

डोनाविट पूलसावत, कॉन्सुल-जनरल, रॉयल थाई कॉन्सुलेट-जनरल, मुंबई या संबंधाने म्हणाले, भारताच्या पर्यटन आणि व्यापार या दोन्ही बाबींना थायलंडसाठी करोना साथीपूर्वी आणि नंतरही विशेष स्थान आहे. भारताने थायलंडच्या रत्ने आणि आभूषण उत्पादनांच्या निर्यातीत मोठे योगदान दिले आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील तुम्हा सर्वांसमवेत असणे आणि बीजीजेएफ च्या ६७व्या आवृत्तीसाठी तुम्हाला आमंत्रित करणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी आहे. मुंबई हे नेहमीच या देशाच्या जेम अँड ज्वेलरी क्षेत्राचे केंद्रस्थान राहिले आहे आणि दरवर्षीप्रमाणे आम्ही या स्वप्नांच्या शहरातून जास्तीत जास्त सहभाग मिळविण्यासाठी उत्सुक आहोत.



# किरकोळ कामांकडे महावितरण कार्यालयाचे दुर्लक्ष

## निम्म्यापेक्षा जास्तकाळ अंधारात राहण्यामागे हेच एक कारण

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** महावितरणच्या एकंदरीत कामकाजावर लक्ष केंद्रीत केले असता समोर आलेल्या निरीक्षण-परीक्षणावरुन मुख्यतः प्रकर्षाने जाणवत असलेली उणीव अशी की, अगदी किरकोळ कामांमुळेच अनेकदा वीज खंडित होते. ते कारण ईतके किरकोळ असते आन विनाकारण ४-४::६-६ तास वीज पुरवठा खंडीत करण्यात येतो.

**काय आहेत ती किरकोळ कामे...??**

मान्सूनपूर्व मेंटनस, अतिरीक्त वाढलेल्या, तारांना भिडलेल्या फांद्या कापणे, कोणतीही इमर्जन्सी आल्यास बॅकअप सप्लायचे नियोजन नसणे, वेळेत डी.ओ.न बदलणे, वीजेच्या मागणीनुसार अतिरिक्त दाब असलेल्या डी.पी.वरील भार कमी करुन नवीन स्वतंत्र डी.पी. बसविणे, गुत्तेदारांचा लाड कमी करुन त्यांच्याकडून वेळेत काम करुन घेणे, जिर्ण-जीर्ण झालेले काही पोल व तारा यांची वेळेत बदली न करणे ई. अशा एक ना अनेक किरकोळ कामांमध्ये नियोजनबद्धतेचा बराच अभाव असल्याने आतापर्यंत जेवढ्या वेळा वीज खंडित झाली आहे. तेवढ्या वेळेस निम्म्यापेक्षा जास्त वेळा वीज खंडित होण्याची कारणे ही अशी अत्यंत किरकोळ आहेत. मग याला जबाबदार कोण....? याबाबतीत कोणाला जाब विचारायचा......?? की हा विजेचा लपंडाव आणि अधिकारी-कर्मचारी यांचा शिवणापाणीचा खेळ असाच सहन करायचा का......??? असा सवाल अंबाजोगाई शहर आणि परिसरातील जनता करत आहे. महावितरणचे अधिकारी-कर्मचारी गलेलठ्ठ पगार घेऊन नुसते कार्यालयात येऊन दुपारचे जेऊन काही मोठा बिघाड झाला तर तो दुरुस्त करण्यापुरते कारण देऊन वीज पुरवठा खंडीत करणे आणि काम करुन तो सुरळीत करणे. ऐवढेच काम त्यांचे आहे का......?? कारण अशा अडचणीच्या वेळी जनताही गप्प राहते. कारण ते कारण त्या पद्धतीचे असते. परंतु इतरवेळी सातत्याने या ना त्या कारणाने खंडित होणा-या खंडित वीजपुरवठ्या मागचे नेमके गौडबंगाल काय....? तर ते आहे किरकोळ कामाकडील दुर्लक्ष वा दिरंगाई.....!

**अधिकारी-कर्मचारी गलेलठ्ठ असले तरी आजी-माजी लोकप्रतिनिधी ईतके कसे मठ्ठ**

शासनाच्या अनेक खात्यांपेक्षा जास्तीचा पगार महावितरण-पारेषण कंपनीत आहे. त्यामुळे आपसूकच त्यांना गलेलठ्ठ पगाराचा नौकर वर्ग असे संबोधले जाते. बरं तो निर्णय त्यांचा आणि कंपनीचा विषय. परंतु या गलेलठ्ठ अधिकारी-कर्मचारी यांना या अशा हाईगाईमुळे ऐन सणासुदीच्या काळात व परिक्षा काळात जनतेला व विद्यार्थ्यांना आणि विशेषतः छोट्या छोट्या व्यावसायिकांना जो नाहक त्रास सातत्याने विनाकारण सहन करावा लागतो. त्याबद्दल हे आजी-माजी लोकप्रतिनिधी ईतके मठ्ठ कसे....?? याचे मात्र कुतूहल वाटते. केवळ निवडणुकांच्या तोंडावर मोठमोठी आश्वासने द्यायची आन अगदी टोकाचे थोतांड लबाड बोलुन निवडून यायचे आणि मग जनतेला वा-यावर सोडून आपल्या पुरते घबाड गोळा करायचे. ऐवढेच लोकप्रतिनिधींचे काम आहे का.....??? असा सवाल ही यानिमित्ताने विचारला जात आहे. तेंव्हा जरी करता काहीही गोंधळ असला तरी अंबाजोगाई महावितरण कार्यालयातील अनागोंदी कारभार आणि नियोजनातील सावळागोंधळ कधी दुर होणार....?? याकडे कुणी लक्ष देणार का.....??? याकडेच आता शहर-तालुक्यातील मायबाप जनता लक्ष लागून आहे.

# सावळदबारा परिसरात वीस दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पाऊस झाल्याने पिकांना मिळाले जीवदान


आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात डाभा, नादातांडा, देव्हारी, मोलखेडा, टिटवी, घाणेगांव तांडा, सावळदबारासह पावसाने १ सप्टेंबर रोजी हजेरी लावली. या पावसाने वीस दिवसांचा खंड दिल्यानंतर गुरुवारी सावळदबारा परिसरात व दिलासादायक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले होते.

सावळदबारा व परिसरात खरिपाचे जुलै सोयाबीन, मका, मुग, ज्वारी व कपाशीसह इतर पिके जोमात होते. मात्र ऑगस्ट महिण्यात तब्बल पावसाचा वीस दिवसांचा खंड पडल्याने पिकांची पावसाअभावी वाढ खुंटली होती तसेच रोगराईचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत होता. पिके उन्हामुळे शेतकऱ्याच्या हातून जाण्याच्या मार्गावर होती, यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण तयार झाले होते. मात्र गुरुवारी रात्री सायंकाळच्या सुमारास पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये दिलासादायक वातारावर निर्माण झाले होते तसेच शेतीपिकांचे पावसाअभावी थांबलेल्या पुढील कामाच्या मशागतीस शेतकरी पुन्हा जोमात सुरुवात करणार असल्याचे चित्र सावळदबारा परिसरात निर्माण झाले आहे.

**पाऊस दिलासादायक झाल्याने शेतकरी फवारणी कामाला जोमात लागले आहे. नाहीतर शेतीपिकाचे पावसाअभावी शेतकरी थांबले होते. आता मात्र सोयाबीन, मका, कपाशी या पिकाच्या फवारणीच्या कामांना वेग आला आहे.**

**राज रामराज ठाकूर**
**सामाजिक कार्यकर्ते देवळगांव गुजरी**



# देवगिरी किल्ल्यावरील श्री गणेश मंदिरात संकटनायक गणपतीच्या उत्सवाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** देवगिरी किल्ल्यावर ऐतिहासिक असे प्राचिन गणेश मंदिर आहे. या ठिकाणाची गणेश मुर्ती अत्यंत विलोभनीय असून मुर्ती ही पुर्वमुखी व उजव्या सोडीची आहे. ही गणेश मुर्ती म्हणजे संकटाला धावुन येणारा गणपती म्हणून देवगिरीच्या संकटनायकाची ख्याती आहे. देवगिरी किल्ल्यावरील श्री गणेश मंदिरात संकटनायक गणपतीच्या उत्सवाला सुरवात झाली आहे. देवगिरी किल्लावर मेढा तोफेपासुन पुढे आधारीतुन वर गेल्यावर किल्ल्या मध्य भागात हे ऐतिहासिक गणेश मंदिर आहे. या गणेश मंदिराचा व संकटनायक गणेशाचा इतिहास ही ऐतिहासिक आहे. महापराक्रमाने पुनर्स्थापित झालेला देवगिरीचा श्रीसंकटनायक हा गणपती म्हणजे देवगिरीच्या इतिहासाची सांश आहे. श्रीगणेशाचे प्रिय भक्त श्रीभक्तराम मल्हारी यांच्या श्रीगणेश क्षेत्रांवरील प्रसिद्ध छपन्न कटावामध्ये देवगिरीवरील श्रीगणेशाला संकटनायक असे म्हटलेले आहे. शेकडो वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या या पद्य स्तोत्रात या संकटनायकाचा उल्लेख असला तरी सध्याच्या मंदिरातील श्रीमूर्ती सन १९४८ साली या मंदिरात प्रतिष्ठापीत झालेली आहे त्यामागे फार मोठा इतिहास आहे.

श्रींची मूर्ती अत्यंत जागृत असून अनेक गणेशभक्त श्रीदर्शनासाठी आवर्जून येतात. दरवर्षी स्थानिक देवगिरीचे ग्रामस्थ परिसरातील भाविक मोठ्या उत्साहात 10 दिवस श्री संकटनायकाचा गणेश उत्सव सोहळ्यात साजरी करतात.



# प्रा.डॉ. शिवाजी हुसे यांना लायन्स क्लब ऑफ औरंगाबादचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर


आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख व मराठी संशोधन केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ. शिवाजी हुसे यांना त्यांच्या शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदानाबद्यल लायन्स क्लब ऑफ औरंगाबादचा आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२२ जाहीर झाला आहे.



डॉ. हुसे हे जालना जिल्ह्यातील देशगव्हाण या गावचे रहिवाशी असून कन्नड येथे १९९९ पासून मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ते उत्तम कवी, लेखक, प्रभावी वक्ते, संपादक, पत्रकार असून गेल्या पंचवीस वर्षापासून शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात कार्यरत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी महत्वपूर्ण योगदान देऊन अनेक विद्यार्थी घडविले आहे. साहित्य व शेतकरी चळवळी बरोबरच सुखना नदी बचाओ चळवळीचे प्रणेते आहेत. तिफण या त्रैमासिकाचे संपादक म्हणूनही ते ओळखले जातात. आजपर्यंत त्यांनी तिफणचे १८ विशेषांक प्रसिद्ध केले आहेत. त्यांची १२ पुस्तके प्रसिद्ध आहेत. विविध साहित्य संमेलनात त्यांनी निमंत्रित म्हणून सहभाग घेतला आहे. भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे ते कार्याध्यक्ष असून तिफण कविता महोत्सवाचे संयोजक आहेत. विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणूनही ते सूपरिचीत आहेत. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून...

आधुनिक केसरी

**प्लॅनिंग ऑफ हनिमून**

आता ही आणखी एक महत्त्वाची गोष्ट हो. आत्ताच्या काळात अनेक वेळा लग्न झालेले विवाहित जोडपं हे नोकरी करणारं असतं. त्यामुळे लग्नानंतर लगेचच त्यांना मुल होणं अपेक्षित नसतं जर असं असेल तर त्यांनी सुनियोजित प्लॅनिंग करणं आवश्यक असतं. अनेक वेळा भावनेच्या भरात ही बाब लक्षात येत नाही आणि इच्छा नसतांना गर्भधारणा होते. त्यामुळे हनिमूनच्या प्लॅनमध्ये या गोष्टीचा प्रामुख्याने विचार असणं खूप महत्त्वाचं आहे.

यातलीच दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे सेफ सेक्स, नैसर्गिक अवस्थेत, कोणत्याही साधनांचा वापर न करता सेक्सचा आनंद घेण्याची इच्छा... मात्र यासाठी अनेक गोष्टींची माहिती असणं हे पुरुष आणि स्त्री दोघांसाठीही महत्त्वाचे आहे.

**सेफ पीरेड :** मासिक पाळी आणि गर्भधारणा याचा खूप जवळचा संबंध आहे. दर महिन्याला स्त्रियांच्या शरीरातून अनावश्यक द्रव्य बाहेर टाकण्याची ही क्रिया आहे. याकाळात गर्भपिशवीचे तोंड उघडते जाणे आणि बंद होणे ही क्रिया घडत असते. ३० दिवसांच्या या सायकलमध्ये ११ वा दिवस ते २० वा दिवस हा काळ पीक पिरियड म्हणून संबांधला जातो. म्हणजेच याकाळात स्त्री-पुरुष संबंध झाल्यास गर्भधारणा होण्याची शक्यता ही जास्त असते. पण शेवटचे १० दिवस आणि मासिक पाळीनंतरचे ५ दिवस हा सेफ पिरेड मानला जातो. जरी असे असले तरी हा एक ठोकताळा आहे यात अपवादात्मक घटना घडू शकतात. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# पाण्यात बुडून पंधरा वर्षीय मुलाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** पैठण तालुक्यातील रांजणगाव खूरी येथील गुनगुली नदीमध्ये करण गायकवाड सह तीन मुले पोहण्यासाठी गेले होते पाण्याचा अंदाज न आल्यामुळे करण अंकुश गायकवाड वय 15 वर्ष या मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक 2 सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास घडली.

नववी वर्गात शिकत असलेला करण गायकवाड व त्याचे तीन मित्र हे सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास गुनगुली नदीमध्ये पोहण्यासाठी गेले होते. पोहोत असताना करण गायकवाड हा खोल पाण्यामध्ये डूबु लागला. त्याच्या मित्राने आरडाओरडा केला मात्र करण हा पाण्यामध्ये पूर्ण डुबला होता. नागरिकांनी शोधला असता करण मिळून आला नाही. घटनेची माहिती बिडकीन पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी घटनास्थळी धाव घेतली. औरंगाबाद महानगरपालिका अग्निशामक दलाला माहिती देण्यात आली. अग्निशामक दलाच्या साह्याने करण यांचा मृतदेह एक तासानंतर पाण्याबाहेर काढण्यात आला. याप्रकरणी बिडकिन पोलिस ठाणे येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असुन सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in